◆ सप्टेंबर २००५
◆ वर्ष पाचवे
◆ अंक नववा

मेहता मराठी ग्रंथजगत

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— अनुक्रमणिका —

संपादकीय - ४
साहित्यवार्ता ८
पुस्तक परिचय
भारतीय शिल्पवैभव : डॉ. सु. र. देशपांडे ४२
छत्रपती राजर्षी शाहू महाराज : तु. बा. नाईक ५०
ययाती : वि. स. खांडेकर ५८
चला! उठा! कामाला लागा!! : स्वाती शैलेश लोढा ६६
साधंसुधं : प्रमोदिनी वडके-कवळे ७२
पुरस्कार ७८
दीप योजना ८८
वाचकांचा प्रतिसाद ९४
बालनगरी ९६

✠ मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

-अशा अनुवादकांच्या शोधात आम्ही आहोत...

जागतिक साहित्यक्षेत्रात सध्या अनुवाद प्रक्रियेला मोठे स्थान मिळालेले आहे. जागतिकीकरण आणि उदारीकरण यामुळे वेगवेगळ्या देशांमधील व्यापारव्यवहार, पर्यटन आणि आदानप्रदान वाढत आहे. इंटरनेटसारख्या माध्यमामुळे देशादेशामधील अंतर गळून पडले आहे; आणि संज्ञापनक्षेत्रात तसेच माहितीतंत्रज्ञानक्षेत्रात परस्पर सहकार्याची नवीच व्यवस्था आकार घेत आहे. परदेशातील वृत्तपत्रे आणि टेलिव्हिजन चित्रपट, ॲनिमेटेड फिल्म्स, तसेच पुस्तके यांची उपलब्धता सर्वत्र सुलभ होत आहे; त्याचबरोबर त्या त्या देशातील स्थानिक लोकांची गरज लक्षात घेऊन चित्रपट, टीव्ही कार्यक्रम, कार्टून्स, ही स्थानिक भाषांमध्ये डब करून नव्या प्रेक्षकवर्गाला आकृष्ट करीत आहेत.

पुस्तकांच्या क्षेत्रातही अनुवादाच्या रूपाने ही प्रक्रिया वेगवान होत आहे. इंग्लंड-अमेरिकेत वा अन्यत्र बेस्टसेलर ठरलेल्या किंवा खळखळ उडवून देणाऱ्या पुस्तकांचे अनुवाद आता मोठ्या प्रमाणावर होत असून, त्या दृष्टीने नवनव्या योजना वा संस्था कार्यप्रवण होत आहेत. उदाहरणार्थ वॉल्ट डिस्ने याच्या संस्थेने भारतात आपले पाय रोवण्याच्या दृष्टीने जंगी तयारी चालवलेली असून आपली कार्टून्स, आपली कॉमिक्स, आपले बालसाहित्य भारतीय भाषांमध्ये डब करून किंवा अनुवादित करून सर्वदूर ते सहजपणे मिळावे म्हणून गावोगाव आपली वितरणयंत्रणा उभी करण्याच्या योजना आखल्या आहेत. मुलांसाठी दोन टीव्ही चॅनल्सही सुरू केली आहेत. भारत आणि चीन या दोन मोठ्या बाजारपेठा आहेत आणि त्यात पाय पसरायला भरपूर वाव आहे हे पाश्चात्य बहुराष्ट्रीय कंपन्यांना क्षणभरही नजरेआड करता येत नाही.

'हॅरी पॉटर' च्या नव्या पुस्तकाच्या एक लाखावर प्रती वितरणाच्या दिवशी येथे खपतात; ज्युरॅसिक पार्क सारख्या अमेरिकन चित्रपटाला शेकडो चित्रपटगृहांतून एका आठवड्यात तीस चाळीस कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकते; मॅकडोनाल्ड, कॉफीडे, बॅरिस्टा यासारख्या खाद्यपदार्थ व पेये पुरवणाऱ्या 'साखळी' विक्रेत्यांना भारतात शेकडो शाखा काढण्याची प्रेरणा होते - हे सर्व कशाचे लक्षण आहे हे आपण जाणून घेतले पाहिजे; आणि या नव्या संधीचा लाभ आपणास कसा घेता येईल याचाही विचार करायला हवा. 'मंगल पांडे' या चित्रपटाच्या जागतिक

वितरणाद्वारे हा लाभ घ्यायची आपली इच्छा आणि तयारीही प्रकट झाली आहे. वितरणाच्या पहिल्याच दिवशी भारतात ६५० प्रिंटस गावोगाव दाखवण्याची सोय झाली तशीच ३५० प्रिंटस यूरोप-अमेरिकेतील वेगवेगळ्या शहरांमधील चित्रपटगृहातून लावण्यात यश आले. सर्वत्र पहिल्या आठवड्याचे बुकिंग हाऊसफुल झाले; पहिल्याच झटक्याला इतक्या प्रिंटस आजवर दुसऱ्या कोणत्या पिक्चरच्या निघाल्या नव्हत्या. या चित्रपटाला त्यामुळे विक्रमी उत्पन्न मिळाले तर आश्चर्य वाटायला नको. खरे म्हणजे प्रत्यक्ष वितरणाच्या आधीच या चित्रपटाच्या निर्मितीचा खर्च वसूल झाला होता असे प्रसिद्ध झाले आहे. वेगवेगळ्या सर्किटसमध्ये वितरणाचे हक्क विकून आलेली रक्कम ही निर्मिती खर्चापेक्षाही जास्त मिळाल्याने, पुढेही त्याला चांगला फायदा होत राहील हे नक्की! ...आपण आपला माल - मग तो चित्रपट असो, सॉफ्टवेअर असो, बीपीओच्या स्वरूपातील असो किंवा पुस्तकांच्या स्वरूपातील असो, - जगभर विकू शकतो; केवळ भारतापुरतेच आपले कार्यक्षेत्र व प्रभावक्षेत्र मर्यादित नाही ही जाणीव आपल्याला नवा आत्मविश्वास, नवा उत्साह देणारी आहे.

ग्रंथप्रकाशन आणि साहित्यक्षेत्राचा विचार केला तर अशीच मोठी संधी आपल्यापुढे सताड खुली आहे असे वाटते. आजही आफ्रिकन-आशियाई देशात भारत अब्जावधी रुपयांची पुस्तके निर्यात करतो. परभाषांतील साहित्य आपल्या प्रादेशिक भाषांमध्ये अनुवादित करून उपलब्ध करून देणे ही प्रक्रिया यापुढे सर्व स्तरांतून गतिमान होण्याची गरज आहे. भारतात त्या दृष्टीने उत्तम मुद्रण आणि ग्रंथनिर्मिती व्यवस्था आकाराला येत आहे. 'इंडिया टुडे'सारखी नियतकालिके जागतिक दर्जाची निर्मिती मूल्ये प्रकट करतात; थॉमसन प्रेस, नवनीत मुद्रणालय वगैरेंचा दर्जा आंतरराष्ट्रीय पातळी गाठणारा आहे. त्यामुळे अनेक परदेशी प्रकाशनसंस्था ग्रंथसंपादन ग्रंथनिर्मितीच्या दृष्टीने भारतात आपल्या शाखा उघडत आहेत. येथील वेतनश्रेणी किफायतशीर असल्याने अमेरिकेत पुस्तक छापण्यासाठी जो खर्च होतो, त्याच्या निम्म्या खर्चात भारतात भागते अशी आकडेवारी नुकतीच मांडली गेली आहे. त्यामुळे या क्षेत्रात जाणकार तरुणांनाही मोठा अवसर असणार आहे. इंग्रजी व विशिष्ट भाषा उत्तम जाणणाऱ्या आणि डीटीपी-संपादन इत्यादी कामात गती असणाऱ्या प्रतिभावंतांना जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवता येईल अशी चिन्हे दिसत आहेत. एकापेक्षा अधिक भाषांवर प्रभुत्व असणे ही गोष्ट यापुढे नोकरीधंद्याच्या दृष्टीनेही फायदेशीर ठरणारी आहे. तसेच संगणकाचे ज्ञान, ॲनिमेशन व ग्राफिक कलांचे ज्ञान लाभदायक होणार आहे.

त्याचबरोबर वर म्हटल्याप्रमाणे अनुवादप्रक्रियेला भावी काळात खूपच मोठा वाव असणार आहे. इंग्रजीमध्ये स्वतंत्र लेखन करणे, इंग्रजीत इतर भाषांतून अनुवाद करणे, इंग्रजीवरून मराठी व तत्सम प्रादेशिक भाषांमध्ये अनुवाद करणे,

प्रादेशिक भाषांतील साहित्य चिनी, जपानी, फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन वगैरे भाषांमध्ये नेणे- हे सगळे यापुढे अधिकाधिक प्रमाणात होत राहणार आहे; आणि ते काम भरपूर प्रतिष्ठा तसेच द्रव्यही मिळवून देणार आहे; हे लक्षात घेऊन अनुवाद प्रक्रियेवर प्रावीण्य मिळवण्याचा, ते करीयर करण्याचा प्रयत्न व्हायला हवा.

आज उत्तम अनुवादकांची उणीव पदोपदी जाणवते.

इंग्रजीवरून भारताच्या एखाद्या प्रादेशिक भाषेमध्ये अनुवाद करणारे बरेच लोक आढळतात; परंतु एका प्रादेशिक भाषेतून दुसऱ्या प्रादेशिक भाषांत अनुवाद करणारे लोक शोधूनही सापडत नाहीत. त्यामुळे इंग्रजीतील पुस्तके जितक्या सुलभतेने आज प्रादेशिक भाषांमध्ये मिळतात, तितकी अन्य भारतीय भाषांतील पुस्तके आपल्या भाषेत वाचायला मिळू शकत नाहीत. ही कोंडी फोडल्याशिवाय भारतातील ग्रंथव्यवहार खऱ्या अर्थाने फोफावणार नाही.

मेहता पब्लिशिंग हाऊसने अनुवादाचे हे महत्त्व जाणून टी बुक क्लबची योजना गेली अनेक वर्षे राबवलेली आहे आणि सुदैवाने तिला मराठी वाचकांचा आरंभापासूनच भरघोस प्रतिसाद लाभत आला आहे. अनेक नवोदित अनुवादकांना त्यामुळे प्रेरणा मिळाली; संधी मिळाली आणि अनुवाद हे आकर्षक क्षेत्र आहे याची प्रचीती आली. इंग्लंड-अमेरिकेतील तसेच रशिया इ. देशातील बेस्ट सेलर लेखकांच्या कलाकृतींचा सुलभपणे आस्वाद घेण्याची संधी वाचकांनाही स्वागतार्ह वाटली. त्याचप्रमाणे हिंदी, गुजराती, कानडी, बंगाली वगैरे प्रादेशिक भाषांमधील काही गाजलेल्या पुस्तकांची मराठी भाषांतरे प्रसिद्ध करण्यातही मेहता पब्लिशिंग हाऊसने स्वारस्य दाखवलेले आहे. **परंतु त्यामध्ये चांगल्या अनुवादकांची वाण सतत जाणवत आली आहे. अनुवादासाठी अनेक पुस्तके समोर असूनही चांगले अनुवादक नसल्याने, ही प्रक्रिया अपेक्षित वेग घेऊ शकत नाही.** बंगाली, कानडी, हिंदी, तमिळ, तेलगू पंजाबी वगैरे भाषांतील जाणकारांची त्यासाठी गरज आहे. अर्थात त्यांसाठी शैलीदार मराठीत लेखन करण्याची हातोटीही आवश्यक आहे. मराठी अनुवाद वाचताना कुठेही अडखळल्यासारखे होता कामा नये. अनुवाद ही एका अर्थाने पुनर्निर्मिती असते. त्या भाषेची प्रकृती जाणून अनुवाद झाला तरच तो वाचनीय ठरतो. केवळ शब्दाला शब्द ठेवून चालत नाही.

महादेवी वर्मा यांनी एके ठिकाणी म्हटले आहे, ''स्वाध्याय से अधिक प्रयास साध्य होने पर भी अनुवाद अंततः अपूर्णता की अनुभूति ही देता है। कारण स्पष्ट है। भाषा, विचारों और मनोभावों का परिधान है और इस दृष्टिसे एक विचारक या कवि की उपलब्धियाँ जिस भाषा में व्यक्त हुई है, उससे उन्हें दूसरी वेषभूषा में लाना असंभव नहीं तो दुष्कर अवश्य रहता है। अपरिचित परिधान कभी कभी उनके व्यक्तिमत्त्व की विशेषता को आच्छादित कर उसे उपेक्षित या कौतुकमात्र बना देता है।''

अनुवाद-कला दोन्ही भाषांची सांस्कृतिक, सामाजिक जाण नसेल तर तो

अनुवाद हास्यास्पद व निर्जीव होतो. वाक्यावाक्यावर ठेचा खायला लावतो.

अनुवादकला ही एक गंभीर गोष्ट आहे; सांस्कृतिक महत्त्वाची गोष्ट आहे हे लक्षात घेऊन उत्तमोत्तम पुस्तकांचे अनुवाद होण्याची गरज आहे. तसा आत्मविश्वास आणि व्यासंग असणाऱ्या, परिपूर्णतेचा ध्यास असणाऱ्या अनुवादकांच्या शोधात आम्ही आहोत.



नोंदणी १ सप्टेंबर २००५ पासून सुरू!

महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वात दीर्घकाळ रणावरची आग सोसणारा रणवीर

संभाजी

विश्वास पाटील

सह्याद्रीच्या निबिड अरण्यांनी, दऱ्याखोऱ्यांनी, खाड्यांनी आणि सागरकिनाऱ्यांनी,
उपलब्ध पण दुर्लक्षित सच्च्या कागदपत्रांनी सांगितलेली शिवपुत्राची अद्भुत, चित्तथरारक पण वास्तव महागाथा

विश्वास पाटील यांची नवी महाकादंबरी

किंमत : ३८०रु.
प्रकाशनपूर्व सवलत : २८०रु.
सभासदांना : २६०रु.
पोस्टेज : ३०रु.

ड्राफ्ट अथवा मनिऑर्डर पाठवा व आपली प्रत आजच नोंदवा!

प्रत मिळण्याची तारीख १ डिसेंबर २००५

मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी पुणे ३०. फोन : २४४७६९२४

साहित्यवार्ता

* प्रशासकीय सेवा परीक्षांमध्ये महाराष्ट्राच्या यशात 'मराठी'चा वाटा सिंहाचा!

मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत, महाविद्यालयांना मराठी विषयाचे वर्ग बंद करावे लागत आहेत. मराठीचे अध्ययन करणाऱ्या शिक्षकांना आणि प्राध्यापकांना नोकरीची शाश्वती उरलेली नाही. मराठी पुस्तकांची विक्री रोडावत आहे. मराठी मासिकांचं भवितव्य क्षीण होत चाललं आहे आणि मराठी चित्रपटांना महाराष्ट्राच्या राजधानीत थिएटर्स मिळत नाहीत. असे असताना लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमार्फत प्रशासकीय सेवांची दारे मराठी तरुणांना धडाधड खुली करून देण्याचे काम, गेल्या दीड दशकामध्ये मराठी भाषेनेच मोठ्या प्रमाणावर चालवले आहे, ही विश्वास बसण्यासही कठीण जावे अशी गोष्ट आहे.

सनदी अधिकारी बनून मराठी तरुण प्रशासनिक सेवांमध्ये मोठ्या प्रमाणावर जावेत यासाठी महाराष्ट्र शासनाने १९७६ साली राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था स्थापन केली, यंदा तिला ३० वर्षे पूर्ण होतील. शिक्षण संचालकांच्या अधिपत्याखाली पुण्यामध्ये या परीक्षांसाठीचे तयारी वर्ग सुरू केले. देशाची आर्थिक राजधानी महाराष्ट्रात, देशाच्या आर्थिक नाड्या मुंबईत; पण देशाच्या राजधानीत महाराष्ट्राची लॉबी नाही आणि देशाच्या आर्थिक नाड्यांवर नियंत्रण ठेवील अशी सनदी अधिकाऱ्यांची फळी नाही; या अंत:स्थ वेदनेतून हे वर्ग सुरू झाले. पण पहिल्या तीन-चार वर्षांत या संस्थेमधून एकही विद्यार्थी उत्तीर्ण होऊन प्रत्यक्ष सनदी सेवेत जाऊ शकला नाही. तेव्हा शासनाने पुण्याचे वर्ग बंद करून मुंबईत प्रत्यक्ष मंत्रालयाच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र संस्थाच सुरू केली. तिथेही पहिली तीन वर्षे या संस्थेला यश मिळाले नाही. पहिली सहा वर्षे निष्फळ ठरल्याने शासनाने संस्थेचे कार्य स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

परंतु संस्थेची मालमत्ता मोठी होती. प्रशासकीय अधिकारी महाविद्यालयाच्या संचालकपदाची जबाबदारी तेव्हा श्री. गो. काशीकर यांच्यावर होती. देखभालीच्या निमित्ताने संस्थेच्या कार्याचा अभ्यास करून काशीकर यांनी शासनाला संस्था पुनरुज्जीवित करण्याची सूचना केली १९८० साली कोंडी फुटली. पहिल्याच वर्षी लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यातल्या दोघांना आयएएस केडरही मिळाले.

पहिल्या दहा वर्षांत १५२ विद्यार्थी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेतून सनदी सेवांमध्ये दाखल झाले. त्यातले १६ आयएएस, २ आयएफएस, आणि २ आयपीएस झाले. या १५२ जणांपैकी २६ जणांनी परीक्षेसाठी दोन ऐच्छिक विषयांपैकी एक विषय मराठी लिटरेचर हा घेतला होता. या २६ जणांपैकी फक्त चौघेजण असे होते की, ज्यांचा दुसरा विषय साहित्याशी संबंधित नसून त्यांच्या मूळ विद्याशाखेशी संबंधित होता. (उदा. मॅनेजमेंट, लॉ, ॲग्रिकल्चर)

मराठी विषय घेणाऱ्यांची संख्या त्यानंतरच्या काळात वाढत गेली ती राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षणसंस्थेला लाभलेल्या उत्तमोत्तम प्राध्यापकांमुळे! प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके, विजया राजाध्यक्ष, रमेश तेंडुलकर, यास्मिन शेख, दिगंबर पाध्ये, सुभाष सोमण या प्राध्यापकांनी मराठी लिटरेचरच्या ६०० मार्कांच्या प्रश्नपत्रिकांचा बारकाईने अभ्यास करून त्यातल्या स्कोअरिंग प्रश्नांवर विद्यार्थ्यांना लक्ष केंद्रित करायला लावले. ते प्रश्न विद्यार्थ्यांकडून घोटून घोटून तयारी करून घेतली.

मराठी विषय घेऊन सनदी सेवा परीक्षेतवरचा क्रमांक मिळवून दाखविण्याची खरी कोंडी फुटली ती १९९० नंतरच्या दशकात. या दशकात २६१ विद्यार्थी SIAC-State Institute of Administrative Careers या संस्थेतून प्रशासनिक सेवापरीक्षा उत्तीर्ण झाले. या २६१ पैकी १०० जणांनी या परीक्षेसाठी एक ऐच्छिक विषय म्हणून मराठी साहित्याची निवड केलेली होती ही येथे उल्लेखनीय बाब होय.

इ.स.२००० सालापासून उत्तीर्ण झालेल्या १०८ पैकी मराठी लिटरेचर विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३४ आहे. ८०च्या दशकात भूषण गगराणी हे मराठी लिटरेचर हा विषय घेऊन भारतात तिसरे आले; ९० च्या दशकात अश्विनी कुळकर्णी मराठी लिटरेचर हाच विषय घेऊन भारतात नवव्या आल्या; २००० साली प्रशांत लोखंडे भारतात २९ वा आला. यंदा श्रावण हर्डीकर मराठी लिटरेचर घेऊन भारतात सातवे आले.

'मराठी लिटरेचर'ला आणि मराठी भाषेला मिळालेले हे यश सद्य:स्थितीमध्ये उत्तुंग ठरणारे आहे.

* खतांविषयीचा कोश राष्ट्रपतींना सादर

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर यांनी १२ जुलै रोजी खतांविषयीचा कोश (द फर्टिलायझर एनसायक्लोपीडिया) राष्ट्रपती डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांना सादर केला. ''या कोशाचे भारतीय भाषांमध्ये भाषांतर व्हावे.''अशी अपेक्षा डॉ. कलाम यांनी व्यक्त केली.

भाषांतरासाठी भारतीय कृषी संशोधन मंडळातर्फे निधी उपलब्ध करून दिला जाईल. असे आश्वासन कृषिमंत्री शरद पवार यांनी दिले. राष्ट्रपती भवनात हा

कार्यक्रम झाला.

डॉ. कलाम म्हणाले, ''गेले दोन दिवस हा विश्वकोश मी चाळत आहे. त्यात बरीच आकडेवारी, समीकरणे, आलेख आहेत. कोशाची निर्मिती हे जागतिक दर्जाचे काम आहे. डॉ. गोवारीकर जे काम हाती घेतात, ते यशस्वीपणे पार पाडतात.''

संबंधित कोशाचे मराठी, तमिळ, तेलगू, बंगाली व हिंदी या पाच भाषांमध्ये भाषांतर करण्याची योजना असून, त्या संबंधीचा प्रस्ताव आपण लवकरच श्री.पवार यांच्याकडे पाठवू. असे डॉ. गोवारीकर यांनी सांगितले.

ते म्हणाले,''हे भाषांतर झाले, की देशातील ८५ टक्के जनतेपर्यंत हा कोश पोचेल. जगातील हा पहिलाच खताविषयक कोश असून, त्याची देशात व परदेशांत विक्री करण्यासाठी, तसेच त्यात दर वर्षी नवनवीन माहितीची भर टाकण्यासाठी दहा कोटी रुपयांचा कायमस्वरूपी निधी उभारावा लागेल. सध्याचा कोश इंग्रजीमध्ये असल्याने त्याचा लाभ कृषी विद्यापीठे, विद्यार्थी; तसेच तज्ज्ञांना होईल; परंतु तो शेतकऱ्यांपर्यंत जाऊन पोचला पाहिजे, हे आमचे उद्दिष्ट आहे.''

कोशाचे लेखक व प्रमुख संपादक डॉ. गोवारीकर असून, याव्यतिरिक्त सुधा गोवारीकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. व्ही. एन. कृष्णमूर्ती व डॉ. एम. एन. धानोरकर यांनी संपादनसाह्य केले आहे. कोशाशी संबंधित असलेले ४१ जण या वेळी उपस्थित होते. त्यात श्रीमती कल्याणी परांजपे, ज्योती चौगुले, अवंती शेवाळकर, अनय गोखले, आदीर रावत, व्ही.डी. वेलणकर, 'टिफॅक'चे माजी कार्यकारी संचालक वाय.एस.राजन, तसेच सध्याचे कार्यकारी संचालक आनंद पटवर्धन, डॉ. लक्ष्मण प्रसाद, ज्ञान प्रबोधिनीचे संचालक गिरीश बापट, डॉ. बी. सी. विश्वास, बद्रिनारायण पारवाले व डॉ. जे. जे. भगत आदींचा समावेश होता.

* मराठीत मूल्यवर्धित साहित्य हवे.

समाजात शाश्वत मूल्ये मांडणारे साहित्यिक मोठे असतात. मात्र, स्वत:ला चळवळीत झोकून देणारे अशा प्रकारचे साहित्यिक मोजकेच आहेत. त्यामुळे मूल्यवर्धित साहित्याची निर्मिती फार कमी झाली आहे, अशी खंत डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केली.

चिंचवडगावातील एस.के.एफ. युनियन सभागृहात राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद आणि बंधुता परिवार आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या हस्ते डॉ. कोत्तापल्ले यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेचे अध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले, अशोक शीलवंत, उद्धव कानडे, मीना शिंदे, प्रकाश रोकडे, प्रकाश जवळकर, प्रवीण नहाटा आदी उपस्थित होते.

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, विचारमूल्यांशिवाय साहित्य निर्माण होत नाही. मोजक्या मराठी लेखकांनी स्वत:ला विविध चळवळीत झोकून दिले, त्यामुळे साहित्याची मूल्यवर्धित निर्मिती झाली नाही. राष्ट्रीय जाणिवेच्या मूल्यांवर साहित्याची निर्मिती करण्यात आली पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

* माणसांतील मैत्र हीच लेखन प्रेरणा

'माणसामाणसातील मैत्र ही संकल्पना सर्व नातेसबंधांच्या मुळाशी आहे, अशी माझी धारणा आहे आणि माझे लेखन याच संकल्पनेशी निगडीत आहे.' असे उद्‌गार कथालेखिका सानिया यांनी तिसरा विभावरी पाटील वाङ्मय पुरस्कार स्वीकारताना काढले. अनुष्टुभ प्रतिष्ठानचा ११ हजार रुपयांचा हा पुरस्कार साहित्य संमेलनाध्यक्ष प्रा. केशव मेश्राम यांच्या हस्ते सानिया यांना देण्यात आला.

अनुष्टुभ द्वैमासिकाचे माजी संपादक प्रा. म. सु. पाटील यांच्या पत्नी विभावरी यांच्या स्मृत्यर्थ देण्यात येणाऱ्या या पुरस्कारासाठी प्रा. डॉ. विजया राजाध्यक्ष व डॉ. अरुण टिकेकर यांच्या समितीने कथासंग्रह, 'भूप' (मोनिका गजेंद्रगडकर), ललितलेख संग्रह 'कवडसे पकडणारा कलावंत' (विजय पाडळकर), कादंबरी 'शाळा' (मिलिंद बोकील), व दीर्घ कथासंग्रह 'ओमियागो' (सानिया) या पुस्तकांचा विचार केला. त्यातून 'ओमियागो'ची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

प्रा. मीनाक्षी दादरावाला यांनी 'ओमियागो' मधील कथांचे रसग्रहणात्मक विवेचन केले. प्रा. प्रभाकर बागले यांनी प्रास्ताविक तर डॉ. भारती निरगुडकर यांनी आभार प्रदर्शन केले.

* ग्वाल्हेर घराण्याचे संगीत

''रागांचा आणि तालांचा परिपूर्ण विचार आणि शुद्ध मोकळा स्वर ही ग्वाल्हेर घराण्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.'' असे प्रतिपादन ग्वाल्हेर घराण्याचे ज्येष्ठ गायक पं. माधव इंगळे आणि विकास कशाळकर यांनी केले.

गानवर्धन ललित कला केंद्राचे पं. भीमसेन जोशी अध्यासन आणि अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालयातर्फे आयोजित मुक्त संगीत चर्चासत्रात ते बोलत होते. मंजिरी आलेगावकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

ग्वाल्हेर घराण्याचा इतिहास सांगताना श्री. कशाळकर म्हणाले,''ही सर्वात जुनी गानपरंपरा आहे. या घराण्याची गायकी महाराष्ट्रात पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांनी आणली. त्यात काही बदल होत झाले आहेत. ते होत राहणे आवश्यकही आहे. ग्वाल्हेर घराण्याची गायकी ऐकायला सुलभ वाटत असली, तरी गायला कठिण आहे.'' या घराण्याच्या गायकीच्या इतर अंगांचेही पं. इंगळे यांनी सप्रयोग विवेचन केले.

लेडीज कूपे

अनिता नायर

अनुवाद : अपर्णा वेलणकर

२५०रु.

स्वत:च्या शोधात निघालेल्या स्त्रीची आरपार कथा

ही आहे कथा स्वत:चंच आयुष्य विंचरून पाहणाऱ्या एका स्त्रीची, अखिलनंदेश्वरी ऊर्फ अखिला. वय वर्षे पंचेचाळीस. अविवाहित. जगता जगता इतकी ओझी येत गेली खांद्यावर की, तिचं स्वत:च्या मर्जीनं स्वत:साठी जगणं.. जगणं राहूनच गेलं. पण एके दिवशी कशी कोण जाणे, स्वत:चीच हाक ऐकून अखिला निघाली.. कन्याकुमारीच्या प्रवासाला– एकटीच. आयुष्यात पहिल्यांदाच मोकळा श्वास घ्यायला...

रेल्वेच्या प्रवासात तिला भेटतं एक वेगळंच जग. लेडीज कूपेच्या धावत्या आडोशात भेटतात आणखी पाच जणी. बघता बघता परकेपणाची बंधनं गळून पडतात. सहा जणींच्या आयुष्याच्या सहा दिशा पकडून गाडी भरधाव सुटते. जखमा मोकळ्या होतात. गुपितांच्या गाठी सुटतात. सहा वेगळी आयुष्यं सहा जणींत वाटली जातात.

प्रत्येकीची कहाणी ऐकता ऐकता अखिला त्यांच्या आयुष्यातले अत्यंत खाजगी.. वेदनांनी कळवळणारे... सुखाने विव्हळणारे... अंधारे कोपरे चाचपत राहते. प्रत्येकीचं सुख भोगते. प्रत्येकीचं दु:ख सोसते. धावत्या चाकांबरोबर 'लेडीज कूपे'तल्या गप्पा धावत राहतात. अखेरीस आयुष्यभर अखिलाचा छळ मांडणारा एक प्रश्न खपली निघावी तसा उघडा पडतो. लेडीज कूपेमधून प्रवास करताना तिला भेटलेल्या पाचही जणींना अखिला विचारतेच,

'पुरुषांच्या आधाराशिवाय बाई एकटी राहू शकते? सुखाने, आनंदाने जगू शकते? की बाईला पुरुष हवाच असतो शेवटी?

सन्स ऑफ फॉर्च्यून

जेफ्री आर्चर

अनुवाद : अजित ठाकूर

३५०रु.



भिन्न जगात वाढलेल्या जुळ्या भावांची खिळवून ठेवणारी विलक्षण कहाणी...

"एका इस्पितळातील प्रसूतिविभागात कमालीची सामसूम होती - नुकतंच जन्मलेलं एक अर्भक दगावलं होतं - पण त्याच वेळी तिथे एक जुळ जन्माला आलं. सकाळ झाली तेव्हा प्रसूतीसाठी आलेल्या एका आईला सांगण्यात आलं की तिचं आता प्रथमच तग धरून राहिलेलं बाळ ठीक-ठाक आहे - आणि दुसऱ्या खोलीत असलेल्या एका आईला सांगण्यात आलं की जुळी झाली होती; पण दुर्दैवाने एक बाळ कालवश झालं.

नाथानील कार्टराइट आणि फ्लेचर डेव्हनपोर्ट खरं म्हणजे जुळे भाऊ म्हणून जन्माला आले; पण दोघे अगदी भिन्न भिन्न जगात वाढले आणि त्यांच्या पिढीमधील अत्यंत हुशार आणि बुद्धिमान तरुण म्हणून दोघेही आपापल्या जीवनात पुढे गेले. त्यांच्या प्रत्येक दु:खाच्या आणि आनंदाच्या क्षणात, प्रेमाच्या संबंधात असो की कामकाजाच्या संदर्भात- आयुष्यात केलेल्या प्रत्येक निवडीमध्ये त्यांच्या जीवनात आश्चर्यकारकपणे एकमेकांचे प्रतिबिंब आढळत असे! वेगवेगळ्या मार्गाने वाटचाल करीत असताना अचानक एका गाजलेल्या खून खटल्यामुळे ते दोघे एकत्र येतात. उच्च राजकीय पदासाठी दोघेही एकमेकांचे प्रतिस्पर्धी बनतात. अनेक दशकांपूर्वी दडवून ठेवलेलं सत्य अचानक उघडं होतं - आपापल्या कर्तबगारीने वर आलेल्या या दोन शक्तींपुढे खरे वास्तव उभे राहते आणि........

* प्रतापराव पवार यांची वाटचाल

'वाटचाल' या पुस्तकात प्रतापराव पवार यांच्या अनुभवाचा ठेवा संकलित झाला आहे. त्यामुळे हे अनुभव व्यवस्थापनाच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक म्हणून लावले गेले पाहिजे, असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केले.

दैनिक 'सकाळ'चे व्यवस्थापकीय संचालक प्रतापराव पवार यांच्या 'वाटचाल' या लेखसंग्रहाचे प्रकाशन 'द हिंदू'चे सहव्यवस्थापकीय संचालक एन. मुरली या यांच्या हस्ते झाले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. माशेलकर बोलत होते. अध्यक्षस्थानी निवृत्त न्यायमूर्ती यशवंतराव चंद्रचूड होते.

'प्रतापराव यांच्या लेखनात बुद्धिमत्ता आणि अभ्यासवृत्तीचे प्रतिबिंब दिसते. मी त्यांच्या लिखाणाचा चाहता आहे,' असे सांगून डॉ. माशेलकर म्हणाले, '२५ वर्षांपासून माझा त्यांच्याशी परिचय असून, त्यांच्या व्यक्तिमत्त्वात मला परिपूर्ण माणूस दिसतो. वृत्तपत्राचा वापर समाजहितासाठी कसा करायचा, याचा वस्तुपाठ त्यांनी घालून दिला. या वाटचालीत आलेले अनुभव त्यांनी जसेच्या तसे मांडले आहेत. ते सर्वांनाच शक्य नसते. आपल्याला बरेच काही वाटत असते. ते प्रत्येकजण लिहिलच असे नाही; पण प्रतापरावांनी आपले अनुभव प्रांजळपणे मांडले आहेत. त्यामुळेच त्यांचा अनुभव पुस्तकातच न राहता अधिक लोकांपर्यंत पोहोचला पाहिजे. त्यांनी इतिहास लिहिण्यापेक्षा भविष्यात काय घडणार आहे किंवा काय घडले पाहिजे, यावर भर दिला आहे,' असे ते म्हणाले.

एन. मुरली म्हणाले, प्रतापराव हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. दूरदृष्टी, साधी भाषा आणि अनुभव ही त्यांच्या लिखाणाची वैशिष्ट्ये आहेत. राजकारणाची घुसखोरी न होऊ देता ते सामाजिक कार्यात सहभागी झाले. दुसऱ्याकडून शिकण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या लिखाणात सातत्याने जाणवते. त्यांनी आपले लिखाण यापुढेही सुरू ठेवावे.

मराठी मध्यमवर्गीय समाज आणि शेतकरी डोळ्यांसमोर ठेवून आपण लिखाण केल्याचे प्रतापराव पवार यांनी सांगितले. वाचकांचा त्याला मोठा प्रतिसाद मिळाला. माझे आई-वडील, कुटुंबीय आणि सहकारी यांना या पुस्तकाचे सर्व श्रेय आहे, असे सांगताना पवार यांना गहिवरून आले. उत्तम कांबळे यांनी प्रास्ताविक केले.

* मराठी साहित्य संमेलन सोलापुरात

एकोणऐंशीवे अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलन सोलापुरात होणार असल्याची घोषणा अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष सुरेश द्वादशीवार यांनी सोलापूर येथे पत्रकार परिषदेत केली. जानेवारीच्या अंतिम आठवड्यात संमेलन होईल, असे ते म्हणाले. कविराय राम जोशी, कवी कुंजविहारी, महाकवी द.रा. बेंद्रे, संजीव, रा. ना. पवार, शाहीर अमर शेख यांच्यापासून ते आजचे

साहित्य अकादमी पुरस्कारविजेते ज्येष्ठ लेखक त्र्यं. वि. सरदेशमुख, डॉ. निर्मलकुमार फडकुले, ज्येष्ठ समीक्षक डॉ. गो. मा. पवार, प्रा. निशिकांत ठकार, सुरेखा शहा, विजया जहागिरदार, तेलुगू मराठीचे तौलनिक अभ्यासक डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली, लोकप्रिय कवी नारायण सुमंत अशी लिहिणाऱ्यांची मोठी परंपरा सोलापूरला आहे. याखेरीज बी. एस. कुलकर्णी, पन्नालाल सुराणा, आनंद कुंभार, शरणकुमार लिंबाळे, डॉ. प्रमोद सलगरकर इत्यादी मान्यवर लेखक सोलापूरकर आहेत.

हरिभाई देवकरण प्रशालेच्या परिसरात हे संमेलन होणार असून ६४ वर्षांनी सिद्धरामेश्वराच्या नगरीत ते भरत आहे. १९८० मध्ये बार्शी येथे ज्येष्ठ विचारवंत, लेखक प्रा. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षतेखाली खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील पहिले अखिल भारतीय साहित्य संमेलन भरले होते. त्या संमेलनासाठी सोलापुरमधील साहित्यप्रेमी व्यक्तींनी मोठे सहकार्य केले होते. महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ व सुरवसे प्रशाला या दोन संस्थांनी हे आमंत्रण दिले आहे. संमेलने आता मोठ्या खर्चाची व थाटामाटात होत असल्यामुळे मोठा निधी उभा करावा लागतो आहे. गेल्या वीस वर्षात सोलापूरच्या वस्त्रोद्योगाला मोठे ग्रहण लागले. मात्र तरीही या व्यवसायात जाणीवपूर्वक सामाजिक सांस्कृतिक उपक्रम राबविणारे अनेक नेते व उद्योजक आजही आहे. या संमेलनाच्या निमित्ताने मराठी, तेलुगू आणि कन्नड या तिन्ही भाषा-संस्कृतींचे अनोखे दर्शन घडेल, अशी अपेक्षा आहे.

"वैचारिक साहित्यनिर्मितीला चालना, सर्वसाधारण माणसांसंबंधी लिहिणाऱ्यांना प्रतिष्ठा आणि साहित्य व समाजाचे अनुभव अध्यक्षीय व्यासपीठावरून सांगण्यासाठी आपण आगामी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी उभे राहणार आहोत.'' असे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी जाहीर केले.

आपल्या उमेदवारीची तीन कारणे आहेत, असे ते म्हणाले, "मराठीत विचारप्रवर्तक साहित्याची एक परंपरा होती. लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, शि.म. परांजपे, आचार्य जावडेकर, गं.बा. सरदार, पु.ग. सहस्रबुद्धे ही त्यांतील काही ठळक नावे आहेत. वैचारिक साहित्याची ही परंपरा अलीकडच्या काळात क्षीण झाली आहे. तिला चालना आणि चेतना देण्याचे आवाहन आपल्याला करायचे आहे. संमेलनाच्या व्यासपीठावरून या आवाहनाला अधिक वजन प्राप्त होते.''

"अध्यक्षीय व्यासपीठावरून साहित्य आणि समाज यांच्या संदर्भातील आपले अनुभव आपण सांगू शकतो. माणूस आणि त्याची सामाजिक परिस्थिती याभोवती साहित्य फिरले पाहिजे. अशा प्रकारच्या साहित्याला मूल्य असते. कवी, लेखक हे समाजाच्या घटनेचे शिल्पकार वा निर्माते आहेत ही प्रतिष्ठा साहित्याला व साहित्यकाराला आली पाहिजे असे वाटते.

* 'मानसिक आरोग्य राखल्यास प्रकृती उत्तम राहण्यास मदत'

''प्रकृती चांगली राहण्यासाठी शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्यही उत्तम ठेवणे गरजेचे आहे. मनात घडणाऱ्या सर्व घटनांचे परिणाम शरीरावर होत असल्याने मनाच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे आवश्यक असते.'' असे मत डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी व्यक्त केले.

'कॅंसर से मुकाबला' या डॉ. स.म. परळीकर यांनी अनुवादित केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करताना ते बोलत होते. पुस्तकाचे मूळ लेखक डॉ. अरविंद कुलकर्णी, 'लोकसत्ता'चे निवासी संपादक मुकुंद संगोराम या वेळी उपस्थित होते.

डॉ. सरदेसाई म्हणाले,''मनाचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी चांगल्या गोष्टीसाठी शाबासकी मिळवणे, वेळेचे नियोजन करून कार्यमग्न राहणे व ध्यान करणे महत्त्वाचे असते. शरीराची काळजी घेण्यासाठी सकस व संतुलित आहार, नियमित व्यायाम, स्वच्छता या गोष्टींची गरज आहे.''

अल्पमाहितीमुळे समाजात कर्करोगाबद्दल भीती निर्माण होते. रोग निर्माणच होऊ नये, यासाठी उपाय योजणे गरजेचे आहे, असे श्री. संगोराम यांनी सांगितले. डॉ. पद्मजा घोरपडे यांनी सूत्रसंचालन केले.

* सलग ७ प्रयोगांची विक्रमी 'लावण्यवेल'

प्रभादेवीच्या सिद्धिविनायकाचा अशीर्वाद घेऊन सर्व कलावंत, तंत्रज्ञ बुधवार रात्री आठ वाजता गिरगावच्या साहित्य संघ मंदिरात हजर झाले. मध्यरात्र उलटताच १२ वाजून पाच मिनिटांनी तिसरी घंटा होऊन 'लावण्यवेल'च्या पहिल्या प्रयोगाला सुरुवात झाली. त्यानंतरच सुरू झालेला सात सलग प्रयोगांचा सिलसिला संपला तेव्हा गुरुवारची मध्यरात्र झाली होती आणि 'लावण्यवेल' च्या दुसऱ्या विश्वविक्रमाची नोंद झाली.

एका दिवसात सहा प्रयोग करण्याचा आपलाच विक्रम 'लावण्यवेल' च्या कलावंतांनी मोडला. 'महाराष्ट्र सांस्कृतिक अभियान न्यास' या संस्थेने निर्मिती केलेला हा कार्यक्रम नियंत्रण रेषेवरील जवानांसाठी सादर करण्यात आला होता.

मराठमोळ्या लावण्यांचा आविष्कार करणाऱ्या या कार्यक्रमाचे एका दिवसात सलग सात प्रयोग करण्याची कल्पना संस्थेचे समन्वयक संतोष परब यांनी आखली आणि २१ जुलै रोजी मुसळधार पाऊस असूनही अमलात आणली. कार्यक्रमाच्या चमूतील गायक, वादक, नर्तक अशा एकूण ५७ कलावंतांना घेऊन त्यांनी मध्यरात्री १२.०५ पहाटे साडेतीन वाजता साहित्य संघ, सकाळी साडेसातला दामोदर हॉल, ११ वाजता शिवाजी मंदिर व त्यानंतर दुपारी अडीच, सायंकाळी सहा व रात्री नऊ वाजता पुन्हा दामोदर हॉल असे लागोपाठ सात प्रयोग रसिकांच्या उपस्थितीत सादर केले.

प्रमुख लावणी नृत्यांगना सीमा पाटील-कराडकर यांच्यासह कोमल गुरव, मीनल मोहिते, कामिनी अहिरे, रसिका दाते, अनिता शिंदे, अर्चना पांचाळ, भक्ती वैद्य, सुचिता ढोलम, प्रीती, योगेश गुरव, मयुर मोरे, वैभव पांचाळ, अमोल मेणे आणि रुपांजली हे नृत्य कलावंत आणि वंदना निकाळे, शाहीर संजय पिंगळे, बाळा पांचाळ, अनुराधा नाडकर्णी, लक्ष्मी घाडी, प्रीती लोंढे या गायक गायिकांनी सर्व प्रयोगांत आपला उत्साह टिकवला.

शुभेच्छा देण्यासाठी अखिल भारतीय मराठी वाद्यवृंद संघटनेचे ४२ वाद्यवृंद निर्माते उपस्थित होते.

* 'खलनायकी' चित्रणात छाप कोरड्या, स्वार्थी समाजाचीच!

सभोवतालचा समाज एवढा कोरडा, निर्दयी, स्वार्थी होता की, 'खलनायकी' भूमिका साकारणं फारसं जड गेलं नाही, असे मत ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांनी पुणे श्रमिक पत्रकारसंघ आयोजित वार्तालापाच्या कार्यक्रमात व्यक्त केले.

समाजवादी चळवळीत कार्यरत असताना पूर्णवेळ सेवादलाचं कार्य करण्याचा मानस होता. योगायोगानं चित्रपटात दाखल झालो अन् सुरुवातीच्या चित्रपटापासूनच 'खलनायकी' प्रवास सुरू झाला, असं त्यांनी सांगितलं. या भूमिका साकारताना फारसे कष्ट पडले नाहीत. कारण मी सज्जन असलो तरी आजूबाजूचं जग सज्जन नव्हतं. त्यामुळे हाच अनुभव चित्रपटांतून विविध भूमिकांद्वारे मांडला, असं त्यांनी सांगितलं. मात्र, त्याचवेळी 'खलनायकी' भूमिकांमुळे अनेक संकटेही ओढवून घेतल्याची आठवण ही त्यांनी कथन केली.

चित्रपटांचं जग वरकरणी बरंच सुखी वाटत असलं, तरी त्यामध्ये सध्या अनेक वाईट गोष्टींचा अंतर्भाव होतोय. चुकीच्या मार्गांनी येणारा सर्व पैसा सध्या दुर्दैवाने चित्रपटसृष्टीत येतोय, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे पूर्वीचं ६० टक्के कला आणि ४० व्यवसाय हे समीकरण आता ८० टक्के व्यवसाय आणि उर्वरित कला, असं झाल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

आजच्या पिढीला दगडाचं काळीज झालेल्या सरकारविरोधात लढायला शिकवलं नाही हे आमचं चुकलंच, अशी भावनाही त्यांनी काही दिवसांपूर्वी विजय तेंडुलकर यांनी केलेल्या विधानांचा संदर्भ देत व्यक्त केली. मात्र, त्याचप्रमाणे समाज आसपासच्या परिस्थितीविषयी जागरूक झाल्यावर अधिक शहाणा होईल अन् सध्याचं निराशाजनक चित्र पुसून टाकेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सध्याचा कार्यकर्ता त्याच्या हातावर पाकिट, ते ही जड वजनाचं असल्याशिवाय कोणतंच काम करत नाही. याच मूलभूत फरकामुळे भ्रष्टाचारी लोकांविरुद्ध आवाज उठवण्याची हिंमत सध्या कोणातच राहिली नसल्याचं त्यांनी सांगितलं.

मराठी चित्रपटांची सध्याची अवस्था निश्चितच चांगली नाही, हे मान्य करतानाच श्री. ना. पेंडसे, गोनीदा यांच्या साहित्यावर उत्तम चित्रपट निर्माण होऊ शकतील. अशी सूचनाही निळूभाऊंनी केली.

* समृद्ध भारतासाठी भावी पिढीत संस्काराची बीजे रोवावीत : किरण बेदी

''उद्याच्या समृद्ध भारताची स्वप्ने साकारण्यासाठी आजच्या युवा पिढीमध्ये शिक्षणाबरोबचर चारित्र्य निर्माण करणारी संस्काराची बीजे रोवली गेली पाहिजेत.'' अशी अपेक्षा किरण बेदी यांनी व्यक्त केली.

सेंट मीराज् महाविद्यालयातर्फे 'बॅचलर ऑफ बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन' या अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते झाले.

त्या म्हणाल्या,''आजच्या पिढीमध्ये एका बाजूला उच्चशिक्षित मुला-मुलींची संख्या वाढताना दिसत आहे. त्याचवेळी नैतिकता, सामाजिक-कौटुंबिक मूल्ये, व्यक्ती-व्यक्तींमधील प्रेम, सद्‌भावना या गोष्टींची मात्र घसरण होताना दिसत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी चारित्र्य निर्माण, कौटुंबिक व सामाजिक कर्तव्ये यांच्या जाणिवा जागृत केल्या पाहिजेत. शिक्षण घेतलेल्या महिलांनी आपले घर, परिवार आणि समाज कसा सुसंस्कृत होईल, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.''

* वंगभंग चळवळीवरील पुस्तकाचे प्रकाशन

''वंगभंग चळवळ ही आधुनिक भारतीय युगाचा प्रारंभ करणारी घटना होती, तोपर्यंत धार्मिक वृत्तीने वावरणारा भारतीय माणूस या चळवळीच्या निमित्ताने राष्ट्रीय वृत्तीने पेटून उठला.'' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केले.

वंगभंग विरोधी आंदोलन स्मृती शताब्दी समिती पुणे व भारतीय विचार साधना पुणे आयोजित कार्यक्रमात डॉ. गिरीश आफळे यांनी लिहिलेल्या 'वंगभंग आंदोलन-एक अभ्यास' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. माजी खासदार अनंतराव पाटील, वंगभंग विरोधी आंदोलन समितीचे निमंत्रक मुकुंद अनगळ, अध्यक्ष शरद थिटे उपस्थित होते.

डॉ. यादव म्हणाले,''वंगभंग चळवळीत भारतीयांचे राष्ट्रीय सामर्थ्य दिसून आले, तोपर्यंत धर्मात धन्यता मानणारा माणूस बंगालच्या फाळणीने पेटून उठला. राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यासाठी मरण्यात त्याला धन्यता वाटू लागली. स्वातंत्र्याची जाणीव होऊन नवीन अस्मिता निर्माण झाली.''

देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या त्यागाची तरुण पिढीला जाणीव नाही, अशी खंत व्यक्त करीत श्री. पाटील म्हणाले,''तरुण पिढीला स्वातंत्र्यासाठी कोणताही त्याग करावा लागला नाही, रक्त सांडावे लागले नाही. स्वातंत्र्यासाठी हजारो लोकांनी आपल्या संसारावर निखारे ठेवले; पण त्यांच्याबद्दल जाणून घेण्याची जिज्ञासाही नवीन पिढीत नाही. त्यांच्यात या जाणिवा निर्माण होण्यासाठी अशा पुस्तकांची गरज आहे.''

* कॉसमॉस गुणगौरव पुरस्कार

''मराठी माणूस आत्मतृप्त आहे. छोट्या स्वप्नांत, यशात तो समाधान मानतो. माणसाने नेहमी मोठ्या गोष्टी साध्य करण्याची महत्त्वाकांक्षा ठेवावी आणि त्यासाठी नियोजनपूर्वक, गांभीर्याने प्रयत्न करावेत, जगाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी ते गरजेचे आहे.'' असे प्रतिपादन ज्येष्ठ एकपात्री कलाकार प्रा. लक्ष्मणराव देशपांडे यांनी केले.

कॉसमॉस बँकेतर्फे प्रा. देशपांडे, 'चैतन्य हास्य योग मंडळा'चे विठ्ठल काटे, 'पत्र सारांश मंडळा'चे श्रीकृष्ण बेडेकर, 'चिंटू' या हास्यचित्रमालिकेचे निर्माते चारुहास पंडित व प्रभाकर वाडेकर यांना 'कॉसमॉस पुरस्कार २००४' प्रदान करण्यात आले. स्मृतिचिन्ह, मानपत्र व वीस हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ.नितीन करीर यांच्या हस्ते ते देण्यात आले. बँकेचे अध्यक्ष डॉ. मुकुंद अभ्यंकर, उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, व्यवस्थापकीय संचालक शशिकांत बुगदे या प्रसंगी उपस्थित होते.

'वऱ्हाड निघालंय लंडनला' या एकपात्री कलाकृतीचे विश्वविक्रमी प्रयोग करणारे प्रा. देशपांडे यांनी सत्काराला उत्तर देताना मराठी समाजाच्या मनोवृत्तीवर बोट ठेवले. ते म्हणाले,''अमेरिकी माणसांनीच विक्रम का करावेत, आपणही का करू नयेत म्हणून मी 'वऱ्हाड'चे प्रयोग केले. प्रतिकूल परिस्थितीतन २७२२ प्रयोगांपर्यंत वाटचाल केली. आज परिस्थिती अशी आहे, की छोट्या गोष्टींत समाधान मानून चालणार नाही. उद्दिष्ट मोठे ठेवले, तरच कुठे पहिल्या पाच क्रमांकात येऊ. जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी तरुणांची शारीरिक, मानसिक तयारी व्हायला हवी. कॉसमॉस बँकेनेही जगात अग्रभागी राहण्याचे स्वप्न पाहावे.''

सर्वसामान्यांना विरंगुळा मिळावा, प्रसन्नता वाटावी, असा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना कॉसमॉस बँकेने पुरस्कार दिला आहे, असे डॉ. करीर म्हणाले.

प्रा. देशपांडे यांच्या कोट्या आणि 'हास्य चळवळ' रुजविणारे श्री. काटे यांच्या 'लाफ्टर थेरपी'ने श्रोत्यांना खदखदून हसविले.

* जगण्यातला आनंद दुसऱ्याला देण्याने द्विगुणित

''दुसऱ्याला देण्याने जगण्यातला आनंद द्विगुणित होतो. त्यामुळे गरजेपेक्षा जास्त कमवायला लागल्यानंतर त्यातील काही भाग दुसऱ्याच्या उन्नतीसाठी द्यायला शिकले पाहिजे.'' असा सल्ला मॅगसेसे पारितोषिक विजेत्या वरिष्ठ महिला पोलिस अधिकारी डॉ. किरण बेदी यांनी लीला पूनावाला फाउंडेशनच्या 'फेलोज'ना दिला.

लीला पूनावाला फाउंडेशनतर्फे ४४ विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी एकूण बारा लाख रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या.

डॉ. बेदी म्हणाल्या,''आपल्यालाही अनेक देणी लाभलेली असतात. त्याचा उपयोग आपण कसा करतो, हा खरा प्रश्न आहे. संधी मिळाल्यावर क्षितिजही

गाठता येते हे तुम्हाला सिद्ध करून दाखवायचे आहे. वातावरण माणसाला आमूलाग्र बदलवते, हे मी 'तिहार' मध्ये कैद्यांच्या मुलांना शिक्षण देताना अनुभवले आहे. सध्या जग हे एक खेडे आहे, ही संकल्पना रुजत आहे. अशावेळी परदेशात देशाचे नाव उंचावणारेही देशभक्तच ठरतात. आज भारतीय बुद्धिमत्तेला संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेतील स्थानापेक्षा मोठे स्थान प्राप्त झाले आहे.''

फाउंडेशनकडून पहिली शिष्यवृत्ती मिळवून आता परदेशात एका बँकेचे उपाध्यक्षपद भूषविणाऱ्या नीतू भाटिया यांनी डॉ. किरण बेदी यांची ओळख करून दिली. डॉ. बेदी यांनी फाउंडेशनच्या पहिल्या कार्यक्रमात केलेल्या भाषणाच्या 'मोटिव्हेशन' या ध्वनिफितीचे प्रकाशनही झाले. फाउंडेशनकडून शिष्यवृत्ती मिळवून पुढे यशस्वी झालेल्या २३ युवतींच्या अनुभवांवर आधारित 'ट्वेंटीफर्स्ट सेंच्युरी बिलाँग्स टू देम' या पुस्तकाचे प्रकाशनही त्यांनी केले. महापौर मंगला कदम यांच्या हस्ते फाउंडेशनच्या 'इन्स्पिरा' या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

* कॉलेज लायब्ऱ्यांची ग्रंथसंपदाही पाण्यात

मुंबईतील अतिवृष्टीत अनेक कॉलेज ग्रंथालयांचेही अतोनात नुकसान झाले असून प्रचंड दुर्मिळ ग्रंथसंपदा पाण्याच्या भक्ष्यस्थानी पडली आहे.

माटुंग्याचे रुपारेल, वांद्र्याचे चेतना, पार्ल्याचे मिठीबाई, उल्हासनगरचे सीएचएम, कल्याणचे बिर्ला आदी कॉलेजांतील हजारो ग्रंथांचे पाण्यात भिजून झालेले नुकसान पैशानेही भरून निघणार नाही. तळमजल्यावरील ग्रंथालयांना याचा सर्वाधिक फटका बसला. त्यामुळे काही कॉलेजांनी पुस्तकांची कपाटे उंचावर किंवा संपूर्ण ग्रंथालयच वरच्या मजल्यावर हलवण्याच्या पर्यायाचा विचार सुरू केल्याचे सांगितले.

एकट्या रुपारेलमधील १५ ते २० हजार पुस्तके पाण्यात भिजली. पावसाळ्यात कॉलेजच्या परिसरात नेहमीच पाणी साठते. परंतु ग्रंथालयात पहिल्यांदाच इतके पाणी भरल्याचे रुपारेलचे ग्रंथपाल प्रदीप कर्णिक यांनी सांगितले. ग्रंथालयाच्या इमारतीत पाणी भरण्यास सुरुवात झाल्यानंतर त्या रात्री कॉलेजातच थांबलेल्या कर्मचाऱ्यांनी पुस्तके पहिल्या मजल्यावर नेण्यास सुरुवात केली. परंतु, पाणी इतक्या वेगाने आत शिरले की, एका कपाटातील पुस्तके उचलून नेईपर्यंत दुसऱ्याचे तळाचे शेल्फ पाण्यात बुडून जात होते. त्या रात्री कॉलेजात वीजही नव्हती. मेणबत्तीच्या उजेडात ग्रंथालयातील पाच-सहा कर्मचाऱ्यांनी नेता येतील तितकी पुस्तके सुरक्षित स्थळी हलवली. तरीही, पाठ्यपुस्तके, संदर्भग्रंथ, विविध कोश, कात्रणे, आदी सुमारे १५ हजार दुर्मिळ पुस्तके पाण्याच्या भक्ष्यस्थानी पडली. यात दोलामुद्रित ग्रंथ (१८६७ पूर्वीचे साहित्य), 'पंच' या मासिकाचे १९२९ पासूनचे अंक, व्ही. बी. कर्णिक यांचा नव-मानवतावादावरील (रॅडिकल ह्युमॅनिझम) दुर्मिळ कात्रणांचा संग्रह, जुनी बॉम्बे गॅझेटियर्स आदी ग्रंथसंपदेचा समावेश आहे.

या पुस्तकांवर रासायनिक पावडर लावून त्यांचे संरक्षण करण्यासाठी कॉलेजच्या मायक्रोबायोलॉजीच्या विभागाचा सल्ला घेण्यात आला.

चेतना कॉलेजातील हजारांहून अधिक पाठ्यपुस्तके पाण्यात भिजून गेली असून सुमारे २० ते ३० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. मिठीबाई कॉलेजच्या ग्रंथालयांचेही नुकसान झाले आहे.

उल्हासनगरच्या सीएचएम कॉलेजातील सुमारे ५० हजार पुस्तके पाण्याखाली गेल्याचे कॉलेजचे प्राचार्य पंजवानी यांनी सांगितले. माटुंग्याच्या रुईया कॉलेजच्या तळमजल्यावरील परीक्षा विभागात पाणी शिरून येथील तीन वर्षांच्या रिझल्टच्या रेकॉर्डचा पाण्यात भिजून अक्षरश: चोथा झाला.

* भालजींचे ऐतिहासिक दस्तऐवज पुराच्या भक्ष्यस्थानी

महापुराने जीवितहानी आणि आर्थिक नुकसान प्रचंड झाले आहे. कोल्हापुरातले महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र असलेल्या भालजी पेंढारकर केंद्रातील दुर्मीळ सांस्कृतिक ठेव्याचे मोठे नुकसान झाले आहे.

महावीर उद्यानाजवळ भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्राची इमारत आहे. याच इमारतीत कलामहर्षी बाबूराव पेंटर फिल्म सोसायटीचे कार्यालय आहे. कोल्हापूरला विळखा घातलेल्या जयंती नाल्याच्या महापुराने या केंद्रालाही फटका दिला आहे. १९८९ च्या अंदाजानुसार येथे तीन ते चार फुटांवर पूररेषा होती. परंतु यंदा पाणी दहा फुटांपर्यंत चढले.

केंद्राचे विश्वस्त श्रीकांत डिग्रजकर यांनी दिलेल्या माहितीनुसार कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाने कलामहर्षी बाबूराव पेंटर यांच्या चित्रपटांतील लॅमिनेशन केलेली १०२ छायाचित्रे पुराच्या पाण्यात पूर्ण खराब झाली.

भाई भगत यांच्या स्मृत्यर्थ कुंदा भगत यांनी चित्रपटविषयक दीड हजार पुस्तके केंद्राला भेट दिली होती. चित्रपटविषयक दुर्मीळ पुस्तकांचा हा खजिना पुरात नष्ट झाला. ही हानी कधीही भरून न येणारी आहे. केंद्रातर्फे प्रकाशित केलेल्या भालजींवरील 'स्वयंभू' या पुस्तकाच्या तीनशे प्रतीही खराब झाल्या.

मराठी आणि भारतीय चित्रपटाच्या संशोधकांच्या दृष्टीने महत्त्वाची सामुग्री म्हणजे भालजींचा संपूर्ण पत्रव्यवहार, त्याशिवाय भालजींनी आपल्या चित्रपटांसंदर्भात केलेल्या अनेक करारांच्या मूळ प्रती. हा सगळा ऐतिहासिक दस्तऐवज पुराच्या भक्ष्यस्थानी पडला आहे.

* विद्यापीठातील ललितकलाकेंद्रास टाटा ट्रस्टतर्फे ८२ लाखांचा निधी

संगीत-कला-नाटक या क्षेत्रांमध्ये प्रशिक्षणाचे काम करणाऱ्या पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्र-गुरुकुलास (सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट) सर रतन टाटा

ट्रस्टतर्फे ८२ लाख रुपयांचा निधी जाहीर झाला आहे. या निधीचा वापर भावी कलावंतांसाठीच केला जाईल, याची ग्वाही कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर आणि ललित कला केंद्राचे विभागप्रमुख सतीश आळेकर यांनी दिली.

कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, कनकवाडी, अहमदनगर आणि कराड मधील तरुण कलावंतांचे दरवर्षी किमान पाच कार्यक्रम या निधीच्या मदतीने आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामध्ये तरुण शास्त्रोक्त गायक, नृत्यकार आणि प्रायोगिक नाट्यसंस्थांना त्यांच्या विविध कला सादर करण्याची संधी देण्यात येणार आहे, असे आळेकर यांनी स्पष्ट केले.

याशिवाय ललित कला केंद्र पदवीपूर्व शिक्षणक्रमातील नृत्य, नाटक, संगीतावरील अभ्यासावर आधारित पुस्तके काढणार असून त्याचे काम त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच नामवंत प्रकाशनसंस्थांकडे सोपवण्यात येणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

पुढील तीन वर्षांमध्ये या विषयांवर एक आंतरराष्ट्रीय परिषद, परिसंवाद अथवा शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. याशिवाय परदेशातील शिष्यवृत्त्यांचा विद्यार्थ्यांना लाभ मिळवून देणे, नामवंत संस्थांना कार्यक्रमांसाठी आमंत्रित करणे, देशभरातील इतर गुरुकुलांच्या भेटी घडवून आणणे, तसेच कॉम्प्युटर आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपयुक्त खरेदीसाठी ही रक्कम वापरली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

ललित कला केंद्राच्या नूतन वास्तूसाठी पुणे विद्यापीठातर्फे एक कोटी रुपये देण्यात येत असून त्याचा आराखडा नचिकेत आणि जयू पटवर्धन या प्रख्यात वास्तुकार दांपत्याने तयार केला आहे.

* शिक्षणाचे बाजारीकरण होणे गैर

शिक्षणाचे बाजारीकरण होत चाललेल्या आजच्या काळापेक्षा महाराष्ट्रातील १९ व्या शतकातील उत्तरार्ध हाच वैचारिकदृष्ट्या अधिक संपन्न होता. राष्ट्र उभारणीस उपयुक्त अशा मूल्याधिष्ठित शिक्षणास टिळक, आगरकर आणि चिपळूणकरांनी न्यू इंग्लिश स्कूलसारख्या शाळेद्वारे सुरुवात केली. याच मूल्याधिष्ठित शिक्षणाचा अंतर्भाव आजच्या विद्यापीठ पातळीवरील उच्च शिक्षणात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केंद्रीय योजना आयोगाचे सदस्य आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केले.

बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापक दिन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षणसंस्थांमधील गुणी विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह देऊन यावेळी गौरवण्यात आले.

'जागतिकीकरण आणि उच्चशिक्षणासमोरील आव्हाने' या विषयावर बोलताना डॉ. मुणगेकर म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या राष्ट्रीय शिक्षणाची मुहूर्तमेढ टिळक-आगरकरांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापना करून रोवली, त्या

काळात सामाजिक धोरणाचा भाग म्हणून मूल्याधिष्ठित शिक्षणाशी बांधिलकी आणि नि:स्पृह व्यक्तिमत्त्व विकास हीच तळमळ होती.

शिक्षणाचे बाजारीकरण होणे ही चुकीचीच बाब असल्याचे सांगून डॉ. मुणगेकर म्हणाले की, शिक्षणाप्रमाणे प्रत्येक क्षेत्रातच सामाजिक संदर्भ बदलत चालले असून मूल्याधिष्ठित भावना कमी होत चालल्या आहेत. शहरातील काही शिक्षणसंस्थांवर प्राप्तीकर विभागातर्फे घालण्यात धाडीचा संदर्भ देऊन मुणगेकर म्हणाले की, खर्चापेक्षा जास्त उत्पन्न शिक्षणसंस्थांनी जरूर मिळवावे, पण त्यामध्ये नफेखारी आणि व्यावसायिकरणास थारा असता कामा नये.

१८५७ मध्ये स्थापन झालेल्या मुंबई, दिल्ली, कोलकता आणि मद्रास विद्यापीठास दीडशे वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त नियोजन आयोगाकडून प्रत्येकी ५० कोटी रुपयांची मदत मिळणार.

सॅम पित्रोदा यांच्या मदतीने विद्यापीठ अनुदान आयोगामध्ये शिक्षण आयोगाची लवकरच स्थापना होणार आहे.

मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी कॉलेजांमध्ये अर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि गणित हे विषय कसे शिकवायचे यासाठी नियोजन आयोगातर्फे मदत देण्यात येणार आहे.

गृहबांधणी कर्जाप्रमाणेच उच्च शिक्षण वित्त मंडळातर्फे (हायर एज्युकेशन फायनान्स)शिक्षण आयोगाकडून कमी व्याजदराचे कर्ज मिळणार.

* लोकशाही ही पाश्चात्त्य संकल्पना नव्हे - अमर्त्य सेन

लोकशाही शासनव्यवस्था ही संकल्पना भारत देशवासीयांनी पाश्चात्त्यांकडून उचललेली केवळ नसून येथील लोकशाही ही सामाजिक स्तरावर सातत्याने होणाऱ्या साधकबाधक चर्चा आणि बुद्धिप्रामाण्यवाद यांचेच फलित आहे, असे प्रतिपादन नोबेल पुरस्कार विजेते ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांनी दिल्ली येथे केले.

भारतीय लोकशाहीकडे पाहण्याचे दोन मार्ग आहेत. एक म्हणजे पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीच्या माध्यमातून आयात केलेली संकल्पना ही व दुसरा मार्ग म्हणजे प्राचीन भारतीय हिंदू रीतिरिवाजांनुसार स्वतंत्रपणे विकसित झालेली यंत्रणा जी इथल्या समाजव्यवस्थेमध्ये अनुस्यूत होती, असेही सेन यावेळी ठामपणे म्हणाले. सेन यांच्या 'द ऑरग्युमेंटेटिव्ह इंडियन' या पुस्तकाचे प्रकाशन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या हस्ते पार पडले. वाद घालण्याची आवड आणि तशा परंपरा अर्थात बुद्धिप्रामाण्यवाद हा हिंदू संस्कृतीमध्ये ऋग्वेद कालापासून दिसून येतो. सम्राट अशोकच्या काळातही येथे तिसरी बौद्ध धम्म परिषद झाली होती. त्या परिषदेत बौद्ध धर्माविषयी अनेक मतमतांतरे झडल्याचे इतिहास उल्लेख आहेत. सार्वजनिक स्तरावर चर्चा करतानाचे नियम आणि आचारसंहिताही अशोकने घालून दिली

होती. ही बुद्धिप्रामाण्यवादी शैली म्हणजे एक ताप न समजता लोकशाहीला सक्षम बनवू शकणारे सामर्थ्य म्हणून त्याकडे आपण पाहिले पाहिजे. बुद्धिप्रामाण्यवाद हा समाजाला बरेच काही शिकवून जातो; मात्र त्याचा वापर कसा केला पाहिजे त्याचे नियम आपणच घालून घेतले पाहिजेत. हिंदू समाज व परंपरांच्या हिंदुत्ववादी चौकटीत लोकशाहीच्या प्रश्नांचा विचार करणाऱ्यांवर सेन यांनी या वेळी कडाडून टीका केली.

* डिसेंबरमध्ये पुणे बुक फेअर

'भारतीय प्रकाशनाची वाटचाल' ही मध्यवर्ती कल्पना घेऊन पुणे बुक फेअर २००५ हे पश्चिम भारतातील भव्य प्रदर्शन यावर्षी १९ ते २३ ऑक्टोबर या दरम्यान गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित केले आहे.

सुमारे १२० स्टॉल्स असणाऱ्या या प्रदर्शनात भारतीय भाषा, परदेशी भाषा आणि प्रकाशन संस्थांची समग्र माहिती देणारे तीन स्वतंत्र विभाग असतील असे प्रदर्शनाचे निमंत्रक पी. एन. आर. राजन यांनी सांगितले. विद्येचे माहेरघर आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असणाऱ्या पुण्यातील हे तिसरे प्रदर्शन असून वाचनसंस्कृतीतून व्यक्तिमत्त्व विकास हे ध्येय समोर ठेवण्यात आले आहे, असे ते म्हणाले.

'पुणे बुक फेअर २००५' हे प्रदर्शन देशातील दिल्ली, कोलकाता आणि चेन्नईतील मोठ्या पुस्तक प्रदर्शनांप्रमाणे मोठ्या प्रमाणावर भरवायचे असून त्यामध्ये शंभरहून अधिक प्रसिद्ध पुस्तक विक्रेते, वितरक, प्रकाशन संस्था आणि शैक्षणिक संस्था सहभागी होतील. तसेच या प्रदर्शनातून सुमारे एक कोटी रुपयांपर्यंत पुस्तकांची विक्री होईल, अशी अपेक्षा आहे. मोठ्या प्रकाशकांबरोबर छोट्या प्रकाशकांनाही यामध्ये वाव राहील. विल्यम केरी यांनी लिहिलेल्या मराठीतील पहिल्या पुस्तकाची प्रत या प्रदर्शनामध्ये ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

देशी भाषांमध्ये हिंदी, तामीळ, तेलगू, बंगाली, गुजराथी आणि पंजाबी तर परकीय भाषांपैकी फ्रेंच, जर्मन, चिनी आणि जपानी भाषांच्या पुस्तकांचाही त्यामध्ये समावेश असेल. या प्रदर्शनाचे सहनिमंत्रक आणि निवृत्त ग्रंथपाल वसंत जोशी यांनी भारत हा पुस्तक निर्मितीतला जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश असून इतर देशांमध्ये पुस्तके निर्यात करतो. दर वर्षी ख्रिसमसच्या सुटीत भारतात येणाऱ्या मराठी माणसाला मातृभाषेतील पुस्तके हवी असतात. त्यांना 'पुणे बुक फेअर २००५'मध्ये सहभागी करून घेण्याचा प्रयत्न आहे.

वाचनाची आवड वाढण्याच्या दृष्टीने विविध विषयांवरील भाषणे, चर्चासत्रे आणि कार्यशाळांचे आयोजन या प्रदर्शनाबरोबर करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी राजन यांचा संपर्क क्रमांक २४४७१७०४.

* 'विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची सांगड घातली तरच मानवकेंद्रित विकास शक्य

ज्यांच्या नेतृत्वगुणांमुळे आणि असामान्य बुद्धिमत्तेमुळे भारतीय हरितक्रांतीची बीजे रोवली गेली आणि त्यानंतरच्या ३० वर्षात सदाहरित क्रांतीच्या संकल्पना कृतीत आल्या त्या डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांच्या ८० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन तामीळनाडूचे राज्यपाल सुरजितसिंग बर्नाला यांच्या हस्ते चेन्नई ट्रेड सेंटर येथे ७ ऑगस्टला झाले.

'मानवकेंद्रित शाश्वत विकासाच्या संकल्पना' या चर्चासत्रासाठी देश-विदेशातून सुमारे ३०० शास्त्रज्ञ आले होते. विज्ञान, तंत्रज्ञान, गरिबी, मानवी जीवन आणि शाश्वत विकासातील योगदान या विषयांव्यतिरिक्त मानवी जीवनातील विज्ञान-तंत्रज्ञानाचा सहभाग, जैविक विविधतेचे संरक्षण आणि संवर्धन, जैविक ग्रामविकास, पर्यावरणीय विकास, माहिती आणि तंत्रज्ञानातून शेतकी विकास, अन्नधान्ये आणि शेतीतील स्वयंपूर्णता, जैवतंत्रज्ञानातून शाश्वत विकास, जनुकीय तंत्रज्ञान आणि विकास, विकासातील महिलांचा सहभाग, नैसर्गिक साधन-संपत्तीचे व्यवस्थापन, अन्नसुरक्षा आणि गरिबीनिर्मूलन, ज्ञानाधारित ग्रामविकास आणि अन्नसुरक्षा व जागतिक शांतता अशा अनेकविध विषयांवर शास्त्रज्ञांनी आपले विचार मांडले.

७ ऑगस्ट हा डॉ. स्वामीनाथन् यांच्या फाऊंडेशनचा वर्धापनदिन म्हणूनही साजरा केला जातो. यानिमित्ताने एका विशेष समारंभात फाऊंडेशनच्या पंधराव्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांच्या हस्ते झाले.

भट्टाचार्य यांनी जगापुढे भेडसावणाऱ्या बहुतांश ज्वलंत प्रश्नांवर विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपाय शोधून मानवी जीवन सुखकर करण्यासाठी अविरत परिश्रम करणाऱ्या डॉ. स्वामीनाथन् आणि त्यांच्या संस्थेतील सहकारी यांचे कार्य आदर्श आहे, असे गौरवोद्गार काढले. याप्रसंगी एम. एम. स्वामीनाथन् फाऊंडेशनच्या गेल्या पंधरा वर्षांच्या कार्याचा आढावा घेणारा चित्रपट दाखविण्यात आला. चेन्नई ट्रेड सेंटर येथील पहिल्या दोन सत्रांत डॉ. स्वामीनाथन् यांच्या जागतिक योगदानाचा आढावा घेण्यात आला. डॉ. स्वामीनाथन यांचे विद्यार्थी डॉ. ए. टी. नटराजन, डॉ. व्ही. एल. चोप्रा, डॉ. पी. सी. केशवन, डॉ. बाळा रवी, डॉ. एन. सुब्रमणियन्, आणि डॉ. पुलोमा शाह यांनी त्यांच्या गेल्या पन्नास वर्षांतील विज्ञान क्षेत्रातील कार्याचा आढावा घेतला. प्रोफेसर एम. जी. मेनन या सत्राच्या अध्यक्षस्थानी होते. दुसरे सत्र कॅनडाच्या भारतातील राजदूत श्रीमती ल्युसी एडवर्डस् यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यात डॉ. इस्माइल सेराजे लुडीन (इजिप्तमधील ॲलेक्झांड्रिया लायब्ररीचे संचालक आणि जागतिक बँकेचे पूर्व उपाध्यक्ष), इस्रोचे माजी संचालक व बंगलोरमधील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्सड् स्टडीजचे संचालक डॉ.

जी. कस्तुरीरंगन, फिलिपीन्समधील इंटरनॅशनल राइस रिसर्च इन्स्टिट्यूटचे डॉ. एस. एस. रमणी, डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजीच्या माजी सल्लागार डॉ. मंजू शर्मा आणि हिंदू वृत्तपत्रसमूहाचे संपादक श्री. एन. राम यांनी डॉ. स्वामिनाथन यांनी शासकीय, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेल्या कामाचा आढावा घेतला. डॉ. स्वामीनाथन यांनी 'माझ्या आठवणीतील जीवनाची वाटचाल' या विषयाद्वारे स्वत:च्या वैज्ञानिक आणि वैयक्तिक कारकीर्दीवर दृष्टिक्षेप टाकला. भारताच्या आजवरच्या झालेल्या वाटचालीवरील परिणामांची मीमांसा करताना अन्नधान्याच्या सुरक्षिततेबरोबरच लोकसंख्या वाढ आणि नैसर्गिक आपत्तींसारख्या प्रमुख प्रश्नांचा मुकाबला करण्यासाठी भारत या शतकात अधिक सक्षम झाला आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. राज्यपाल बर्नाला यांनी डॉ. स्वामीनाथन यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणाऱ्या तीन पुस्तकांचे प्रकाशन केले. लहान वयातच गांधीवादी विचारांनी प्रेरित होऊन केवळ देशहितासाठी भारतात राहून जगाला प्रेरणादायक शास्त्रीय योगदान देणाऱ्या डॉ. स्वामीनाथन यांचे जीवन हाच त्यांचा संदेश आहे, असे गौरवोद्गारही राज्यपालांनी काढले.

* अमेरिकेतील टीन एजर्स

अमेरिकेतील टीनएजर्स म्हटले की, डोळ्यांसमोर प्रामुख्याने उभी राहते ती त्यांची स्वच्छंद आणि काहीशी बेबंद प्रतिमा! विवाहपूर्व शारीरिक संबंध, डेटिंग यांबाबत त्यांना फारसे काही धरबंद नसतात, अशीच सर्वसाधारण समजूत आहे.

'टाइम'ने केलेल्या एका सर्वेक्षणाच्या निष्कर्षांनी मात्र ही समजूत खोटी ठरवली आहे. सर्वेक्षणात ५०० टीनएजर्सना विविध प्रश्न विचारण्यात आले. त्यात जवळपास १२५ जणांनीच आपण डेटिंग करीत असल्याचे सांगितले. इतर मात्र त्यापासून चार हात लांबच आहेत. विवाहपूर्व शारीरिक संबंध असू नयेत, असे मत तब्बल ६० टक्के टीनएजर्सनी मांडले.

* 'मूळ लेखनाला शब्दबद्ध करणे हाही अनुवादाचाच प्रकार'

'मूळ लेखनाला शब्दबद्ध करणे हाही अनुवादाचाच प्रकार आहे', असे मत प्रसिद्ध कवयित्री अरुणा ढेरे यांनी मांडले.

'मराठी-कन्नड स्नेहवर्धन केंद्रा'तर्फे आयोजित 'कनसु ननसायितु' या पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून त्या बोलत होत्या. कृ. शि. हेगडे यांनी श्रीनिवास लक्ष्मण यांच्या 'ड्रीम्स टू रिॲलिटी' या पुस्तकाचा कन्नड भाषेत अनुवाद केला आहे. राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जीवनचरित्र लक्ष्मण यांनी या पुस्तकात रेखाटले आहे. केंद्राच्या कन्नड अभ्यासर्गाचा प्रमाणपत्र प्रदान समारंभही या वेळी ढेरे यांच्या हस्ते पार पडला. केंद्राचे सचिव कृ. शि. हेगडे, विश्वस्त यशोदा मोरे, विजयालक्ष्मी रेवणकर, 'नवनीत प्रकाशन'चे कल्पेश शहा या वेळी उपस्थित होते.

'थोर कन्नड लेखकांचे साहित्य यांच्या थोरपणासकट आपल्यापर्यंत पोहोचविण्याचे श्रेय अनुवादकांना आहे. भाषेच्या पलीकडचे एक आंतरभारती व्यक्तिमत्त्व घडवण्यात अनुवादकांचा वाटा मोठा आहे'

भाषावर्गांच्या निमित्ताने माणुसकीची देवाण-घेवाण होते. बहुभाषिक असणे ही आजच्या युगातली गरज आहे, असेही त्या म्हणाल्या.

* ऑक्सफर्ड डिक्शनरीतही आता 'बिनधास'!

सातत्याने नवे बदल स्वीकारत परभाषेतील शब्दांचाही स्वीकार करणाऱ्या इंग्रजी भाषेच्या लवचिकतेचा प्रत्यय ऑक्सफर्डच्या नव्या शब्दकोशाद्वारे आला आहे.

शेक्सपिअर, मिल्टन आणि कीट्सच्या या भाषेने अनेक नवे शब्द सामावून घेतले आहेत. त्यातील काही तर चांगलेच चक्रावणारे आहेत. ऑक्सफर्डच्या नव्या शब्दकोशात स्थान मिळविणाऱ्या भारतीय शब्दांमध्ये बिनधास (बिनधास्त), लेहंगा आणि मसाला यांचा समावेश आहे.

केवळ भारतीयच नव्हे तर अमेरिकी शब्दांचाही या शब्दकोशात समावेश करण्यात आला आहे. स्पेंडी (खर्चिक), टूफर (एकाच्या किमतीत दोन वस्तू) अशा ब्रिटनमधील इंग्रजीपेक्षा वेगळ्या वळणाच्या अमेरिकी शब्दांना या शब्दकोशात स्थान मिळाले आहे.

* चं. प. भिशीकर - ९१ व्या वर्षात पदार्पण

'ठाम वैचारिक भूमिका मांडतानाही पत्रकारांनी विवेक दाखवला पाहिजे', असे मत ज्येष्ठ पत्रकार चं. प. उर्फ बापूसाहेब भिशीकर यांनी व्यक्त केले. राजकारण्यांनी जशी विश्वासार्हता गमावली आहे, तसाच धोका वृत्तपत्रांच्या बाबतीत आहे, असा इशारा त्यांनी दिला. ९१ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल भिशीकर यांचा सत्कार, पुणे श्रमिक पत्रकार संघातर्फे सुनील कडूसकर यांच्या हस्ते करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक आनंद यादव, संघाचे सरचिटणीस ज्ञानेश्वर प्रकाश बिजले, पुणे पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजीव साबडे, कार्यवाह भोईटे आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

''विचारसरणी आणि कार्य यांच्यात घुसमट होऊ नये, म्हणून मी पत्रकारितेचे क्षेत्र निवडले. विचारांना मुक्त व्यासपीठ देताना तडजोड करावी लागू नये, असा उद्देशही त्यामागे होता,' असेही श्री. भिशीकर यांनी सांगितले. 'मी एक भारतीय पत्रकार आहे, असा विचार मी कायम केला. भारतीय तत्त्वज्ञानाची वैचारिक बैठक माझ्या पत्रकारितेत आणण्याचा प्रयत्न केला. त्यातून मिळालेल्या व्यापक मानवहिताच्या भूमिकेने मला कायम साथ दिली,' असेही ते म्हणाले. आजच्या पत्रकारितेवर नकारात्मक दृष्टिकोनाचा प्रभाव पडला आहे, अशी खंत व्यक्त करतानाच तरुण पत्रकारांनी विवेकी विचार करावा असा सल्लाही त्यांनी दिला.

विसावे शतक पाहणारे पत्रकार महर्षी असा भिशीकर यांचा गौरव करीत

त्यांच्या पत्रकारितेचा डॉ. यादव यांनी आढावा घेतला. भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने भिशीकर यांना पक्षीय होऊ दिले नाही तर समग्रतावादी केले. मानवी मूल्यांचा खोलवर विचार त्यांनी आपल्या पत्रकारितेत केला. स्वातंत्र्यप्रेमी राजकीय चळवळीची उपासक असणाऱ्या पत्रकारांच्या एका पिढीचे संस्कार भिशीकरांवर झाले, असेही यादव म्हणाले. 'तरुण पत्रकारांपुढे आदर्श पत्रकारितेचा वस्तुपाठ उभा करावा म्हणून या सत्काराचे आयोजन केले आहे.' 'भिशीकर यांनी आध्यात्मिक विचारांना आपल्या पत्रकारितेत आणले नाही किंवा आध्यात्मिकतेतही पत्रकारितेला येऊ दिले नाही. वैचारिक भूमिकेबाबत तटस्थ राहण्याची कसरत त्यांनी आपल्या समर्थपणे केली.' असे कडूसकर म्हणाले. ठाम वैचारिक भूमिका असूनही पत्रकारितेत तटस्थ भूमिका ठेवणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून भिशीकरांकडे पाहता येईल, असे मत श्री. साबडे यांनी व्यक्त केले. जयराम देसाई यांनी भिशीकर यांची ओळख करून दिली. उपाध्यक्ष सुजीत तांबडे यांनी आभार मानले.

* शास्त्रीय संगीत लोकप्रिय करण्यासाठी 'म्युझिक कॅफे'

रिमिक्स, पॉप आणि फ्युजन संगीताच्या कल्लोळात शास्त्रीय संगीताला पुन:प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी आणि तरुणांच्या मनात त्याविषयी गोडी निर्माण करण्यासाठी मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीने 'म्युझिक कॅफे' या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाची निर्मिती केली आहे. पं. जसराज, पं. हरिप्रसाद चौरसिया, डॉ. प्रभा अत्रे, डॉ. एन. राजम, तौफिक कुरेशी यांसारखे दिग्गज कलाकार नवोदितांना संगीताचे कानमंत्र देण्यासाठी हजेरी लावत आहेत.

या कार्यक्रमामागची संकल्पना मुंबई दूरदर्शनचे संचालक मुकेश शर्मा यांची आहे. ६ ऑगस्टपासून दर शनिवारी रात्री १० वाजून ५ मिनिटांनी सह्याद्री वाहिनीवरून तो प्रसारित केला जात आहे. रविवारी सायंकाळी ७.३० वा. त्याचे पुनर्प्रसारण होते. डॉ. बिंदू त्रिवेदी निर्मात्या असून संहितालेखन मधुवंती सप्रे यांचे आहे; समीरा गुजर आणि ओंकार कुलकर्णी हे सूत्रसंचालक आहेत.

गायक कलावंत, संगीतप्रेमी, रसिक, नवोदित युवा कलावंत, दिग्गज गायक, वादक, संगीतकार या सर्वांचा 'म्युझिक कॅफे' हा मीटिंग पॉइंट आहे. शास्त्रीय संगीत हाच, कोणत्याही प्रकारच्या कलेचा पाया असतो, ही हरवत चाललेली जाणीव युवा वर्गाला पुन्हा करून द्यावी आणि भारतीय अभिजात शास्त्रीय संगीताच्या परंपरेला उजाळा द्यावा, हा निर्मिती मागचा हेतू असल्याचे मुकेश शर्मा म्हणाले.

संगीत साधना सांगणारा कॅफे गुरुकुल, मुंबईतल्या मैफलींची माहिती देणारा कॅफे कॅलेंडर, रसिकांचे शास्त्रीय संगीताबद्दलचे अभिप्राय, भागातील पाहुण्या कलावंतांचे स्वागत व प्रश्न, दोन युवा कलाकारांची हिंदी मराठी गाणी, वाद्यांबद्दल चर्चा, दूरदर्शनच्या संग्रहातील शास्त्रीय संगीताचा कॅफे आल्बम, पाहुण्यांशी गप्पा व प्रश्नोत्तरांची झटपट फेरी, नवोदितांना कानमत्र व टिप्स देणारा क्रीम ऑफ कॅफे आणि पाहुण्यांचे सादरीकरण, असे या कार्यक्रमाचे टप्पे आहेत.

* शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे - ८४ व्या वर्षात पदार्पण

जीवनात अनेक अनुभव घेतले. कलाकार, विद्वानांची साथ-संगत लाभली. आजवरच्या या सर्व प्रवासाचा साक्षीदार या नात्याने घेतलेला वेध आत्मचरित्रातून मांडायचा प्रयत्न करणार असल्याचे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी सांगितले.

तिथीनुसार नागपंचमी हा बाबासाहेबांचा वाढदिवस. १० ऑगस्टला त्यांनी ८४ व्या वर्षात पदार्पण केले.

आत्मचरित्राचे लेखन सुमारे वर्षभरापूर्वीच सुरू केले असले, तरी ते पूर्ण होण्यास दोन वर्षांचा कालावधी लागेल, असे त्यांनी सांगितले. त्यात स्वत:बद्दलची माहिती कमी असली, तरी सहवास लाभलेल्या विविध क्षेत्रातील व्यक्तींचे योगदान, यांच्यापासून मिळालेली प्रेरणा यांचे अनुभव असतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. आत्मचरित्राचे नाव अजून ठरलेले नसले, तरी 'माझी हकीकत' अथवा 'हकीकतनामा' या नावांचा विचार सुरू असल्याचे ते म्हणाले.

शिवसृष्टी प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून पहिला टप्पा पुढील वर्षी पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या टप्प्यात शिवाजी महाराजांच्या रायगडावरील राजदरबाराची प्रतिकृती, किल्लेदाराचा वाडा, खुले सभागृह आणि हेमाडपंती पद्धतीचे देवी भवानीचे मंदिर पूर्ण होणार आहे. ही शिवसृष्टी म्हणजे पूर्वीचा भुईकोट किल्लाच असेल, असे त्यांनी सांगितले. दत्तो वामन पोतदार, राजवाडे, ग. ह. खेर, शेजवलकर यांच्यासारखी इतिहासाचा व्रतस्थ अभ्यास करणारी मंडळी हल्ली आढळून येत नाहीत. सध्याच्या पिढीत इतिहास संशोधक होऊ इच्छिणाऱ्यांची संभावना 'भिकेचे डोहाळे लागलेत', अशी केली जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच, एखाद्या गोष्टीचा ध्यास, वेड घेतल्याशिवाय इतिहास निर्माण करता येत नाही, याचाही त्यांनी पुनरुच्चार केला.

सुमारे ५० वर्षांपूर्वी शिवचरित्राची पहिली आवृत्ती प्रकाशित झाल्यानंतर आजवर १५ आवृत्त्या संपल्या. कालानुरूप त्यात बदलही झाले. मात्र, यापुढील 'डीलक्स आवृत्ती'त गडकोटांचे नकाशे अधिक छायाचित्रे असा संग्राह्य मजकूर देण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

* विज्ञानाची उपयोगिता समजणे गरजेचे - डॉ. जयंत नारळीकर

माणसाच्या आयुष्याशी तुलना करता माणसाने निर्माण केलेले तंत्रज्ञान खूपच तरुण आहे. तरीही त्याची निर्मिती एवढ्या मोठ्या प्रमाणावर होते की, त्याचा संपूर्ण वापर माणसाकडून होत नाही. आपण कोणते तंत्रज्ञान कसे वापरले पाहिजे याची जाणीव २१ व्या शतकातल्या माणसाला होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर यांनी केले. ललित दोशी मेमोरियल फाऊंडेशनतर्फे यशवंतराव चव्हाण सभागृहात ५ ऑगस्ट रोजी झालेल्या कार्यक्रमात 'विज्ञान आणि तंत्रज्ञानाबरोबर जगायला शिकणे...' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले.

नवीन संशोधन वापरापूर्वी पूर्णपणे समजून घेणे गरजेचे असते. पण अनेकदा नवीन संशोधनातून निर्माण झालेले तंत्रज्ञान पटकन लोकप्रिय होते, त्यामागचे मूलभूत विज्ञान मात्र दुर्लक्षित राहते. याबाबत त्यांनी प्रसिद्ध शास्त्रज्ञ लॉर्ड रदरफोर्ड यांचे उदाहरण दिले. रदरफोर्ड यांनी न्यूक्लिअसची रचना शोधून काढली, पण त्याच्या व्यावहारिक उपयोगाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. सुमारे ३० वर्षांनंतर याच संशोधनाचा वापर करून एकीकडे न्युक्लीअर बॉम्बची निर्मिती झाली व दुसरीकडे आण्विक ऊर्जा निर्माण करण्यासाठी त्याचा उपयोग केला गेला.

या उदाहरणांकडे बघून संशोधक, समाज आणि निर्णय घेणाऱ्या व्यक्ती, नेते यांच्यामध्ये समन्वयाची गरज असल्याचे जाणवते. नवीन संशोधनांची उपयोगिता आधी जाणून घेतली पाहिजे. त्याचा भविष्यातील वापर, गैरवापर याचा आधीच विचार झाला पाहिजे व त्यानुसार वापरावर भर दिला पाहिजे, असे मत नारळीकर यांनी मांडले. त्यामुळे सामान्य माणसाला विज्ञान समजावून देणे आजच्या जगात महत्त्वाचे आहे व ही भूमिका बजावण्यासाठी विज्ञान पत्रकार किंवा सायन्स कम्युनिकेटर्सची गरज आहे. भारतात मात्र विज्ञान पत्रकारिता किंवा सायन्स कम्युनिकेटर्स फारच कमी आहेत. वैज्ञानिक घटनांविषयीच्या बातम्या वर्तमानपत्रात छापून येतात, पण त्यांचे प्रमाण नगण्य असल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. भ्रष्टाचार, गुन्हे, राजकारण, युद्ध या विषयांकडे ज्या औत्सुक्याने बघितले जाते, तेवढेच विज्ञानाकडे दुर्लक्ष केले जाते. विज्ञान क्षेत्रातही शोध पत्रकारितेला भरपूर वाव आहे, याकडे नारळीकरांनी लक्ष वेधले.

आज विज्ञान युगात जगतानाही भविष्य, वास्तुशास्त्र, फेंगशुई, पत्रिका, गणपतीचे दूध पिणे या अंधश्रद्धांवर आपण विश्वास ठेवतो. विज्ञानाच्या प्रसाराने या अंधश्रद्धा दूर होऊ शकतात. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून मूलभूत संशोधनाची उपयोगिता लगेच दिसत नसली तरी त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

* सेन्सॉर बोर्डावर सुधीर गाडगीळ

प्रसिद्ध निवेदक आणि मुलाखतकार सुधीर गाडगीळ यांची केंद्रीय फिल्म सेन्सॉर बोर्डावर 'सदस्य' म्हणून निवड करण्यात आली आहे.

सूचना आणि प्रसारण मंत्रालयाच्या सेन्सॉर बोर्डाच्या मुंबई सल्लागार समितीवर दोन वर्षांसाठी ही नेमणूक आहे.

गेली ३० वर्षे सुधीर गाडगीळ चित्रपटविषयक स्तंभलेखन, मुलाखती घेणे, दूरदर्शनवर विविध वाहिन्यांसाठी कार्यक्रम सादर करणे ही काम करत आहेत.

मराठी चित्रपट संगीताचा पन्नास वर्षांचा आढावा घेणाऱ्या 'स्मरणयात्रा' कार्यक्रमाचं निवेदनही त्यांनी केलेलं आहे. चीन आणि रशिया वगळता जगभरच्या महाराष्ट्र मंडळात त्यांनी एकपात्री आणि अन्य कार्यक्रम सादर केलेले आहेत.

* अखेर 'घाशीराम'च्या मूळ ध्वनिचित्रफितीचा शोध!

थिएटर ॲकॅडमीच्या संचाने दोन दशकांहून अधिक काळ देशोदेशीच्या रंगभूमीपर्यंत पोचवलेल्या 'घाशीराम कोतवाल' या नाटकाच्या मूळ ध्वनिचित्रफितीचा शोध अखेर लागला आहे! पूर्वीच्या युगोस्लाव्हियाची राजधानी असलेल्या बेलग्रेड येथील एका संस्थेकडे ती सुस्थितीत असून, लवकरच ती भारतात पोचण्याची शक्यता आहे.

विजय तेंडुलकर यांनी लिहिलेल्या या नाटकाचा प्रयोग १६ ऑक्टोबर १९७२ रोजी पुण्यातील भरत नाट्यमंदिरामध्ये झाला होता. प्रारंभी 'प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन'ने (पीडीए) ते रंगभूमीवर आणले. त्यानंतर १९७४ पासून वीस वर्षांहून अधिक काळ थिएटर ॲकॅडमी (टीए) या संस्थेने या नाटकाचे प्रयोग केले. त्याचे परदेश दौरे विशेष गाजले आणि तेथे 'घाशीराम'ला तुफान लोकप्रियता लाभली. 'ब्रिटिश रंगभूमीला दिलेले इंजेक्शन' अशा शब्दांत काही समीक्षकांनी 'घाशीराम'चा गौरव केला होता. डॉ. मोहन आगाशे यांचा 'नाना फडणवीस', 'कॉम्रेड रमेश टिळेकर यांचा 'घाशीराम', श्रीराम रानडे यांचा सूत्रधार आणि रवींद्र साठे व चंद्रकांत काळे यांचे संगीत अशा संचामध्ये 'घाशीराम' रंगत असे.

पपेट्स व अलुरकर म्युझिक हाऊस या संस्थांच्या सहकार्याने 'घाशीराम'च्या 'डिव्हीडी'चे नुकतेच पुण्यात प्रकाशन करण्यात आले. 'टीए'च्या मूळ संचातील प्रयोगाचे ध्वनिचित्रमुद्रण कुठे उपलब्ध आहे काय, असा 'लाख मोलाचा प्रश्न' या वेळी विचारला जात होता. त्या संदर्भात विचारणा केली असता ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. सतीश आळेकर यांनी सांगितले, ''१९८९ च्या सुमारास पूर्वीच्या युगोस्लाव्हियाची राजधानी असलेल्या बेलग्रेड येथील प्रसिद्ध 'दितेस फेस्टिव्हल'मध्ये थिएटर ॲकॅडमीने 'घाशीराम'चा प्रयोग केला होता. त्यावेळी एका व्यावसायिक माध्यम संस्थेच्या वतीने त्याची ध्वनिचित्रफित तयार करण्यात आली. पुढे रशियाच्या विघटनानंतर युगोस्लाव्हियाही फुटला. तेथे यादवी माजली. या घडामोडीनंतर गेल्या दशकाहून अधक काळ या ध्वनिचित्रफितीचा शोध लागला नव्हता. ती ध्वनिचित्रफीत उपलब्ध असल्याची आणि सुस्थितीत असल्याची माहिती मिळाली. ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. मोहन आगाशे यांना ती मायदेशी आणण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

या व्यावसायिक ध्वनिचित्रफितीद्वारे एका हौशी कलावंताने 'हॅण्डिकॅम'वर तयार केलेली ध्वनिचित्रफीत उपलब्ध आहे. रशियाचा दौरा करण्यापूर्वी संगीत नाटक अकादमीचे अध्यक्ष गिरीश कर्नाड यांच्या आग्रहावरून 'टीए'ने दिल्लीत 'घाशीराम' सादर केले होते. त्या वेळी त्याचे ध्वनिचित्रमुद्रण करण्यात आले होते.

* पाण्यात गेलेल्या ग्रंथालयांना पाहणी अहवालानंतरच मदत

जुलैमध्ये मुंबई आणि राज्यात झालेल्या प्रलयंकारी पावसात अनेक घरांप्रमाणेच सार्वजनिक आणि काही खासगी ग्रंथालयांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी तर या पुस्तकांचा अक्षरश: लगदा झाला असून दुर्मिळ ग्रंथ, मासिके, हस्तलिखिते आदी ज्ञानभांडार नष्ट झाले आहे. मात्र या मंडळींना नुकसान भरपाई मिळण्यासाठी आणखीन काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. ग्रंथालयांच्या नुकसानीची अगोदर पाहणी करण्यात येणार आहे. या पाहणीनंतर त्याचा अहवाल संबंधितांना सादर केला जाणार असून त्या नंतरच या ग्रंथालयांना मदत मिळू शकेल.

राज्यात सुमारे सहा हजार सार्वजनिक ग्रंथालये असून या ग्रंथालयांचे जिल्हा आणि तालुका स्तरावर अ, ब, क आणि ड अशा चार गटात वर्गीकरण करण्यात येते. तसेच काही खासगी ग्रंथालये आहेत. अतिवृष्टी आणि पुराच्या पाण्याचा फटका बसलेल्या ग्रंथालयांमध्ये ठाणे व कोकण परिसरातील काही ग्रंथालयांचा समावेश आहे. काही ठिकाणची ग्रंथालये तर अक्षरश: पाण्याखाली गेल्याने पुस्तके नष्ट झाली असल्याची वस्तुस्थिती सर्वज्ञात आहे. उल्हासनगर येथील सीएचएम महाविद्यालय व कल्याण येथील सार्वजनिक वाचनालयाचे खूप नुकसान झाले आहे. या पुरामुळे लाखो रुपयांची पुस्तके व मासिके तसेच काही ठिकाणी दुर्मिळ संदर्भ ठेवा नष्ट झाला आहे.

* लाखमोलाच्या चित्राची चिंब चित्तरकथा...

चाळीस लाख? पन्नास लाख? एक कोटी?...बोली लावली असती तर या चित्रांचे मोल याहूनही अधिक झाले असते...

...पण 'त्यां'च्या लेखी ती अनमोल होती, जी बेहरम पावसात चिंब भिजली, जी वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न सुरू आहे...

...बेंद्रे, धोंड आणि सातवळेकर...या तीन दिग्गज चित्रकारांच्या चित्रांची ही करुण गोष्ट आहे.

वांद्र्याच्या 'कलानगरा'तील बाळासाहेब ठाकरेंच्या 'मातोश्री' बंगल्याशेजारीच राहणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार आणि जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌चे माजी संचालक माधव सातवळेकर आणि त्यांच्या पत्नी पहिल्या मजल्यावरील घरात सुन्न बसून आहेत. अहमदाबादहून आलेले त्यांचे चिरंजीव विकास तळमजल्यावरील स्टुडिओत माधवरावांची चित्रे वाचवण्याच्या कामात गुंतलेले आहेत. माधवरावांच्या स्टुडिओत संपूर्ण वाताहतीचे चित्र दिसते. भिंतीलगतचा रॅक रिकामा करण्यात आला आहे. पाणी कुठवर चढले होते, त्याची स्पष्ट रेष भिंतीवर दिसते. जमिनीवर चित्रे आणि ध्वनिमुद्रिका पसरलेल्या दिसताहेत. तैलरंगातल्या सुमारे १५० चित्रांच्या फ्रेम्स वरच्या मजल्यावर हलवण्यात आल्या आहेत. जलरंगातली दोनशेहून अधिक

चित्रे आहेत. ती वाळण्यासाठी दोऱ्यांना चिमटे लावून टांगली आहेत. काही प्रिंटस् साफ फाटून गेल्या आहेत. स्केचबुक्स तर असंख्य होती, पण ती जवळपास निरुपयोगी झाली आहेत.

गादीवर पसरून ठेवलेल्या न्यूड स्केचेसकडे बोट दाखवत सातवळेकर म्हणाले, 'ही चित्रे ३७ साली मी लंडनच्या स्लेट स्कूलमध्ये शिकत होतो तेव्हाची आहेत.' साठ-सत्तर वर्षांपासूनची पेंटिंग्ज, परदेशी चित्रकारांनी दिलेली आर्ट बुक्स, कलेक्शन्स, चित्रकलेवरची पुस्तकं... आयुष्यातले श्रेयस आणि प्रेयस हरवावे, अशी हताशा सातवळेकरांच्या चेहऱ्यावर दिसते. ऑगस्टला त्यांच्या नव्वदीचा कार्यक्रम पुण्यात रवी परांजपे आणि त्यांची मित्रमंडळी साजरा करणार होती, तोही रहित करून टाकला आहे.

चित्रांवर काय आणि किती परिणाम झाला आहे, हे कळण्यासाठी सहा महिने जावे लागतील. तैलरंगातील चित्रे खराब झालेली नाहीत, हवेतल्या आर्द्रतेचा त्यातल्या रंगांच्या घनतेवर परिणाम होणारच, असे त्यांना वाटते.

* आषाढमेघांमधूनही खुलले 'शुक्रतारा'चे स्वररंग!

कुमार गंधर्व यांच्याकडून शिकलेली पहिली गझल, नातलग असलेल्या सुरेश भट यांच्याकडून बालपणी खाल्लेला मार, मुंबईच्या डबलडेकर बसमध्ये केलेला रियाज, 'शुक्रतारा'ची जन्मकथा आणि लतादीदी-हृदयनाथबरोबर पहाटेपर्यंत रंगणाऱ्या गप्पा...

... काळ्याकुट्ट आषाढमेघांनी नभ आक्रमले असतानाही हा 'शुक्रतारा' मात्र खुलला आणि या स्वरगंगेमध्ये पुणेकर रसिक चिंब भिजले.

निमित्त होते मुक्त संगीत चर्चासत्राचे. गानवर्धन, पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रातील पंडित भीमसेन अध्यासन आणि सांगली येथील अखिल भारतीय गंधर्व कला विद्यालय मंडळाने त्याचे आयोजन केले होते. प्रसिद्ध गायक अरुण दाते यांनी स्वरदाखल्यांच्या माध्यमातून रसिकांशी आगळा-वेगळा संवाद साधला. स्वाती पाटणकर यांनी घेतलेल्या अनौपचारिक मुलाखतीच्या माध्यमातून हिंदी गझलगायक ए. आर. दातेपासून स्वरप्रवास खुलला.

'लहानपणापासून तलत मेहमूद, बेगम अख्तर यांच्या गझलांचे मला वेड होते. त्याचे कार्यक्रमही मी सादर करायचो. तत्पूर्वी, कुमार गंधर्व यांच्याकडून गझल गायकी शिकण्याचे भाग्यही मला लाभले होते...' एवढे सांगूनच दाते थांबले नाहीत, कुमारांनी शिकवलेली 'सजदा' ही गझल आणि तलतचे 'जलते है जिसके लिए' हे गाणे त्यांनी जिवंत केले तेव्हा अगदी तलतच गात असल्याचा भास झाला.

'दोन-तीन वेळा 'शुक्रतारा' गाण्याचे करारपत्र आले होते. अखेर श्रीनिवास खळे स्वत: घरी आले. त्यानंतर वडील रामूभैय्या यांनी मला अक्षरश: फैलावर

घेतले. आजपर्यंत हिंदीत गायला म्हणून काय झाले, स्वरांना भाषा नसते. मराठीत गाण्यासाठी एवढे आढेवेढे कशाला? किती मोठी संधी आहे, याची कल्पना आहे का तुला...त्यापुढे मला उत्तर नव्हते. तुम्ही गाणार नसाल, तर 'शुक्रतारा' फाडून टाकीन, असे खळे यांनी सांगितले आणि मग मात्र माझ्याकडे काही पर्यायच राहिला नाही. 'शुक्रतारा'च्या या जन्मकथेनंतर त्याला स्वरसाज चढला.

'शब्दातले भाव गायकाने पकडायला पाहिजेत. तुम्हीच तुमची कथा सांगत आहात, असे भासवायला पाहिजे. शब्दभावांमध्ये समरस होणे आवश्यक आहे. पण, पाडगावकरांसारख्या शब्दचित्र रंगविणाऱ्यांची कविता मिळाली तर क्या बात है. ते गाणे अजरामर होते...' त्या पाठोपाठ सादर झाले 'अखेरचे येती माझ्या तेच शब्द ओठी, लाख चुका असतील केल्या, केली पण प्रीती!'

'मिर्झा गालीबने जे काम केले, ते मराठीत करण्याची किमया सुरेश भट यांनी केली आहे,' असा गौरव करीत 'जीवना तू, असा मी कसा' हे गाणे दाते यांनी खुलवले. दाते भक्तिसंगीत गाऊ शकत नाहीत, या टीकाकारांच्या टिप्पणीला उत्तर देत 'श्री राम जय राम, जय जय राम' हे गीत त्यांनी सादर केले.

'या जगण्यावर शतदा प्रेम करावे'ने या मुक्तसंवादाची सांगता झाली.

* केशवसुत ते संदीप खरे : काव्यप्रवासाचा मागोवा...

विविधता आणि प्रगल्भतेने नटलेली गेल्या शंभर वर्षातील कविता मराठी साहित्याचा मानबिंदू आहे. 'एक तुतारी द्या मज आणूनि' म्हणणाऱ्या कवी केशवसुतांपासून ते 'मी हजार चिंतांनी हे डोके खाजवतो' लिहिणाऱ्या आजच्या संदीप खरे या तरुण कवीपर्यंतचा हा वारसा पुणे आकाशवाणीने २६ भागांमधून सादर करण्याचे ठरवले आहे. 'आनंदलोक' असे या कार्यक्रमाचे नाव असून चाळीसहून अधिक कवी या कार्यक्रमातून रसिकांपर्यंत पोचणार आहेत!

'कधी दु:ख ते हृदय कधी सुखाने भरते, शब्द भिजता भिजता गाणे जुळुनिया येते!' या शब्दात प्रसिद्ध कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी 'आनंदलोक'चे थीम साँग रचले असून नरेंद्र भिडे यांनी ते संगीतबद्ध केले आहे. रवींद्र साठे आणि विभावरी आपटे यांनी या गीताला आवाज दिला आहे. ते पुणे आकाशवाणीवर क्रमश: २६ भागांमध्ये सादर केले जाणार आहे.

प्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी आणि मराठी कवितेच्या अभ्यासक वंदना बोकील यांचाही या प्रकल्पात सहभाग आहे. पुणे आकाशवाणीचे संचालक शरद भोसले यांनी या कार्यक्रमासाठी बरीच मेहनत घेतली आहे.

गेल्या १० दशकात अधिकाधिक प्रगल्भ आणि विकसित होणारी मराठी कविता अनेक कवींच्या शब्दांनी समृद्ध झाली आहे. केशवसुत, बालकवी, माधव ज्युलियन, बा. सी. मर्ढेकर, पु. शि. रेगे, बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज, बहिणाबाई चौधरी, दिलीप चित्रे, अरुण कोलटकर, ना. धो. महानोर, नामदेव ढसाळ,

यशवंत मनोहर, नारायण सुर्वे, ग्रेस, ना. घ. देशपांडे, पद्मा गोळे, संजीवनी मराठे, प्रभा गणोरकर, प्रज्ञा लोखंडे, नीरजा, अनुराधा पाटील, इंद्रजित भालेराव, दासू वैद्य, प्रकाश होळकर अशी मोठी यादी आहे!

मराठीतील या ठळक कवींचे नेमके योगदान आणि वैशिष्ट्ये 'आनंदलोक'मधून त्यांच्या निवडक कवितांसह ऐकता येणार आहेत. त्यांचे अभिवाचन अतुल कुलकर्णी, अमृता सुभाष, ज्योती सुभाष, डॉ. वीणा देव, मधुरा डहाणूकर, शांभवी वझे, शैला मुकुंद, गजानन परांजपे आणि संदीप खरे यांच्या आवाजातूनच ऐकायला मिळणार आहे!

शहरी, ग्रमीण, स्त्रीवादी, विद्रोही, दलित, लोककलेशी जोडली गेलेली आणि शेतावरची तसेच रोमँटिक अशी ही बहुविध कविता सातत्याने बहरत गेली त्यामुळे तिला २६ एपिसोडमध्ये नेमकेपणाने पकडणे एक आव्हानच होते. शंभर वर्षांचा हा भरजरी काव्यपट मराठी रसिकाच्या मर्मबंधातील ठेव बनेल.

* शब्दांमधला आशय टिपणारी सांजवेळ 'मंजूर'!

शब्दांमधले अर्थपूर्ण भाव, त्याला आशयानुरूप दिलेलं हलकं संगीत, प्रत्येक गीतानंतर प्रेक्षकगृहातून उठणारा 'वन्स मोअर'चा हुंकार...अशा आगळ्या ढंगात सांजवेळ कलली.

निमित्त होते, संदीप खरे आणि डॉ. सलील कुलकर्णी यांच्या 'नामंजूर'च्या नव्या कॅसेट आणि सीडी प्रकाशनाचे! प्रेक्षागृहातील सर्वात वयोवृद्ध मनोरमा गोखले आणि नव्या पिढीची चिमुरडी प्रतिनिधी राधा यांच्या हस्ते अनुक्रमे सीडी आणि कॅसेटचे प्रकाशन झाले. त्यावेळी 'ज्या पिढीने कविता जोपासली अन् ज्या पिढीकडे ती जोपासण्याची धुरा आगामी काळात असेल, त्यांच्यासाठीची ही मानवंदना' हे संदीपचे शब्द टाळ्यांच्या कडकडाटानंतरही प्रेक्षागृहात भरून राहिले.

'नामंजूर' या नव्या कॅसेटमधील आठही गाणी संदीप आणि डॉ. सलील कुलकर्णी यांनी अरुण नूलकर यांच्याशी अनौपचारिक गप्पा मारत सादर केली.

कवितांना मिळणारी तरुणांची दाद सर्वाधिक सुखावह वाटते. माझी कविता तरुणांना पायरी वाटत असेल, तर नक्कीच ते बोरकर, कुसुमाग्रज यांच्या कवितांचा आस्वाद घेऊ शकतील, असंही संदीप खरे म्हणाले.

गाण्यांच्या स्वरूपात सादरीकरण होत असलं, तरी त्यातील कविता अधिक महत्त्वाची असं सांगून समाजात वावरणाऱ्या माणसांच्या कविता, माणसांच्या गाण्यांचंच हे प्रतिबिंब असल्याचं मत डॉ. सलील कुलकर्णी यांनी मांडलं.

वि. स. खांडेकर

कुटुंबाच्या सुखासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या कुटुंबप्रमुखाची करुण कथा

किंमत : ९० रुपये

पुरुषाच्या दु:खाविषयी समाजाला बहुधा स्पष्ट कल्पना असत नाही! म्हणून काय पुरुषाला दु:खे नसतात असे मानायचे? मध्यम वर्गातला कर्तबगार पुरुष हाही दुर्दैवाने एका मोठ्या गुलामगिरीत खितपत पडला आहे. त्याचे हे विचित्र दास्य दुसऱ्या तिसऱ्या कुणाचे नसून स्वत:च्याच कुटुंबाचे आणि पवित्र मानलेल्या कर्तव्यविषयक कल्पनांचे असते. कुटुंबासाठी आरंभिलेल्या यज्ञात तो बिचारा सर्व सुखाची आहुती देतो. पण शेवटी त्याच्या पदरात काय पडते! ना कुटुंबाचे खरेखुरे कल्याण; ना स्वत:चे आंतरिक समाधान! त्याचा त्याग अंती विफल ठरतो.

जग झपाट्याने बदलत आहे. जीवनमूल्यांत विलक्षण क्रांती घडून येत आहे. जीवनमूल्ये उलटीपालटी झाली असल्यामुळे या काळात कधी कधी दगडाची देव म्हणून पूजा केली जाते आणि प्रसंगी खरा जागृत देव पायाखाली तुडविला जातो. मनुष्याचे सुखसर्वस्व जसे केवळ स्वत:साठी जगण्यात नाही, तसेच आपल्यावर प्रेम न करणाऱ्या माणसांसाठी पशूप्रमाणे कष्ट करून नि:सार किंवा नीरस जीवन कंठण्यातही ते नाही. सुख हे त्यागात आहे; पण तो त्यागही आंधळा असता कामा नये, हे तत्त्वज्ञान कादंबरीच्या नायिकेला , उषेला कुणी शिकवावे लागत नाही. एखाद्या अशिक्षिताने सहज सुंदर काव्य रचावे, त्याप्रमाणे तिला ते स्वभावत:च समजते. आणि तिच्या या डोळसपणामुळेच नायकाला शेवटी आजपर्यंत आपल्याला हुलकावणी देणारे सुख कुठे आहे याचा पत्ता लागतो.

सिरसी

सतीश सुरवसे

निर्व्याज मैत्रीच्या ग्रामीण कथा

किंमत : ७० रुपये



मैत्रीची गोडीच निराळी असते. आठ-दहा मित्रांचं कोंडाळं जमलं की नाना गमती-जमती घडतात. सुपीक कल्पनांचा सुकाळ होऊन अनेक गडबड-घोटाळे होतात. अडीअडचणीला धावून येणारे मित्र एकमेकांच्या टोप्या उडवण्यातही पुढे असतात. खाण्या-पिण्यातले हे भागीदार आजूबाजूच्या लोकांची फिरकी घेण्यातही पटाईत असतात.

सिरसी गावच्या श्रीधर, दाजी, आबा, म्हारती, तात्या आणि इतर जिवाभावाच्या मित्रांनी मिळून केलेल्या धमाल गोष्टींचे चित्रण या कथांत आहे. या कथांची भाषाही वेगळ्याच ढंगाची आहे. ओघवत्या शैलीमुळे पुढे काय होईल, याची उत्सुकता लागून राहते. कथा पुढे वाचत रहावीशी वाटते.

'आबानं म्हटलं,

"आता डॉक्टर खातंय बायकूचा मार..."

क्षणात डॉक्टरीणबाईचं अक्राळविक्राळ रूप डोळ्यांसमोर तरंगू लागलं. मुलखाची खवीस, भांडकुदळ, सासू-सासरे, नणंद, दीर-भावजया, पाव्हणे-रावळे घरला आले की कुरापत काढणारी, छिडछिड करणारी अन् तिच्या माहेरचं कोण आल्यास बेहद खुश होणारी. डॉक्टराला ऊठबस म्हणणारी, घालून पाडून बोलणारी. अशा एक ना अनेक घटना घडामोडी आठवून आबाच्या मनात आनंदाची उकळी फुटली. आपोआपच सोनबा मिस्त्रीच्या हाताखाली कामाला जायचं रहित करून नवरा-बायकूची गम्मत बघायला वाट वाकडी केली अन् डॉक्टराच्या मागंमागंच पाय आपोआपच चालू लागले.'

'सिरसी' मधून

* 'ख्रिस्ती समाजाने महाराष्ट्राला दिलेले देणे मोठे'

ख्रिस्ती समाजाने मराठी साहित्यात योगदान दिले आहे, त्याइतकेच किंबहुना त्याहूनही अधिक मोठे कार्य ख्रिस्ती मिशनऱ्यांनी महाराष्ट्रातील वंचित घटकांसाठी केले आहे, असे प्रतिपादन जागतिक मराठी अकादमीचे उपाध्यक्ष आमदार यशवंतराव गडाख यांनी केले.

अमेरिकास्थित रेव्हरंड अशोक सूर्यवंशी यांच्या 'झाले मोकळे आकाश...' या आत्मचरित्राचे प्रकाशन गडाख यांच्या हस्ते झाले. डॉ. रजनीकांत आरोळे, डॉ. अनुपमा उजगरे, कवी रमण रणदिवे, पुणे धर्मप्रांताचे बिशप विजय साठे, प्रा. सुधीर शर्मा, प्रकाशक सुनील गोसावी व्यासपीठावर उपस्थित होते.

''ख्रिस्ती मिशनऱ्यांनी हुंडाबंदी, विधवाविवाह आदी विषय हाताळत क्रांतीची बीजे रोवली,'' असे सांगून गडाख म्हणाले, ''एका हातात धर्मग्रंथ आणि दुसऱ्यात अन्न, वस्त्र, निवाला घेऊन हे लोक राज्याच्या कानाकोपऱ्यात गेले. या योगदानाचे महाराष्ट्राने ऋणी राहिले पाहिजे. नवयुवकांना आशेचा किरण दाखविणाऱ्या अशा 'मिशनरी' कार्याची आजही गरज आहे. दारिद्र्य हा शाप असेल, तर सरस्वतीची उपासना हा त्यावरील उ:शाप आहे. सूर्यवंशी यांचे आत्मकथन प्रामाणिकतेच्या शक्य तितके जवळ जाते.''

डॉ. आरोळे म्हणाले, ''पुस्तकात रेखाटलेल्या प्रवासाचा मी केवळ एक साक्षीदार आहे. अधिकाराच्या मस्तीत वावरणाऱ्या लोकांचे वर्णन करतानाही लेखक कटुता दाखवीत नाही. अमेरिकेत सहज पैसा मिळतो, हा भ्रम आहे. भारतातील शून्य लहान असते, तर अमेरिकेतील मोठे.''

डॉ. जोशी म्हणाले, ''सध्या आत्मचरित्रांचे दिवस आहेत. दलित आत्मकथने, राजकारण्यांची आत्मचरित्रे बाजारात येत आहेत. या लाटेत आपली वेगळी लाट उमटविणे कठीण आहे. स्वत:ची जात विसरून वेदनेची जात ओळखणारा लेखकच उंची गाठतो.''

सूर्यवंशी म्हणाले, ''आम्हा परदेशस्थ भारतीयांना फक्त इथल्या साहित्य-संस्कृतीबद्दल प्रेम आहे, असे नाही. महाराष्ट्रातील अतिवृष्टीची वृत्ते वाचूनही आम्ही दु:खी बनतो.''

* 'कोत्तापल्ले यांचा सत्कार'

चळवळीतून आलेले आणि मराठीचे प्राध्यापक असलेले डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्यासारखा माणूस विद्यापीठाच्या कुलगुरूपदी विराजमान होणे, हे मराठी भाषाविश्वाला अभिमानास्पद आहे,' असे मत साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून डॉ. कोत्तापल्ले यांची निवड झाल्याबद्दल पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या वतीने जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक द. दि. पुंडे, पत्रकार

महावीर जोंधळे, डॉ. विजया कोत्तापल्ले हे या वेळी उपस्थित होते.

रा. ग. जाधव म्हणाले, चळवळीतून आलेला आणि मराठीचा प्राध्यापक असलेला माणूस विद्यापीठाचा कुलगुरू झाल्याबद्दल वैयक्तिक आपणास तर आनंद झालाच. मात्र, साऱ्या मराठी भाषा अभिमान असणाऱ्यांसाठी गौरवाची गोष्ट आहे. विद्यापीठ हे सामाजिक चळवळीची साधना करण्याचे प्रमुख केंद्र आहे, असेही ते म्हणाले.

मनोगत व्यक्त करताना डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, की देशात सर्वाधिक मागासवर्गीय तसेच शिक्षणापासून वंचित असलेल्या भागातील विद्यापीठाचा मी कुलगुरू आहे. या निमित्ताने त्यांच्यासाठी काही ठोस स्वरूपाचे काम करण्याची संधी मिळाली आहे. विकासाच्या पातळीवर मराठवाडा विद्यापीठाला पुणे विद्यापीठाच्या बरोबरीवर आणण्यासाठी आपण कसोशीने प्रयत्न करू, असे त्यांनी सांगितले.

विभागप्रमुख डॉ. अविनाश अवलगावकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यागौरी टिळक यांनी आभार मानले.

* मराठी पत्रकारितेतील शैलीदारपणा गायब?

''एकेकाळी मराठी पत्रकारिता शैलीदार होती. मात्र सध्या भाषेचे नष्टचर्य मराठी पत्रकारितेत अनुभवाला येत आहे. मराठी भाषेचे शेकडो वर्षांचे संचित प्रतिबिंबित होत नसल्याने पत्रकारितेतील शैलीदारपणा संपत गेला असावा.'' असे भाष्य ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी केले.

मराठवाडा मित्रमंडळ वाणिज्य महाविद्यालयाच्या वृत्तविद्या विभागात प्रा. जाधव पत्रकारिता आणि साहित्य या विषयावर बोलत होते. वृत्तपत्रविद्या ही शब्दांची वाहिनी आहे आणि भाषावाचन हा पर्याय नसून सुरुवातच आहे. मराठवाडा मित्र मंडळ महाविद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब जाधव यांनी प्रास्ताविक केले.

* 'मोठं व्हायचं कसं?' पुस्तकाचे प्रकाशन

डॉ. प्रतिमा इंगोले यांनी नाट्यछटा या वाङ्मयप्रकारावर लिहिलेल्या 'मोठं व्हायचं कसं?' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. वसंत डहाके यांच्या हस्ते झाले.

आंतरराष्ट्रीय महिला वर्ष, मोठं व्हायचं कसं?, मी ज्योती, मी सावित्री बोलते आहे, या सारख्या नाट्यछटामधून मुलांचे समाजाच्या प्रश्नावर चांगले प्रबोधन होईल. त्याच बरोबर लहान वयातच मुलांना वाचनाचे आणि व्यक्तिमत्व विकासाचे प्रयत्न होणे जरुरीचे आहे, असे या पुस्तकाच्या लेखिका डॉ. इंगोले यांनी स्पष्ट केले. लहान मुलांसाठी लिहिणे वाटते तितके सोपे नाही, त्यांच्या पातळीवर जाऊन विचार केला तरच ते मुलांना आवडते. त्यामुळे हे पुस्तक मुलांना नक्की आवडेल असे डॉ. डहाके यांनी सांगितले. डॉ. इंगोले यांचे हे चाळीसावे पुस्तक आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीमा शेट्ये यांनी केले.

* रामोजींची 'मयसभा' गिनीज बुकात!

ताजमहल आणि धारावीची झोपडपट्टी... बंगलोरचे वृंदावन गार्डन आणि

दिल्लीचा चांदनी चौक... हे सारे एकत्र आणणाऱ्या 'रामोजी फिल्मसिटी'ला गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्ने जगातला सर्वात मोठा 'फिल्म स्टुडियो कॉंप्लेक्स' म्हणून गौरवले आहे. देशातील या आघाडीच्या आणि अत्याधुनिक चित्रनगरीने हॉलिवुडसह इतर फिल्मसिटींना मागे टाकून हा मान पटकावला आहे.

चित्रपटाची स्क्रिप्ट घेऊन यावे आणि तयार चित्रपटाची रिळे सोबत घेऊन जावे, अशा सुविधायुक्त फिल्मसिटी उभारण्याचे स्वप्न 'ईनाडू' या तेलुगू वृत्तपत्राद्वारे मोठे साम्राज्य उभारणाऱ्या रामोजी राव यांनी १९९६ साली हैदराबादजवळ वास्तवात उतरवले. तेव्हापासून केवळ दाक्षिणात्यच नाही, तर देशभरातील आणि अमेरिका-ऑस्ट्रेलियाच्या निर्मात्यांनीही येथे अनेक चित्रपट तयार केले. १६६६ एकर परिसरात चित्रपटनिर्मितीशी संबंधित सगळ्या सुविधा येथे उपलब्ध आहेत. सेट, प्रॉपर्टी, कॉस्च्युम, कॅमेरा, लाइट, फिल्म प्रोसेसिंग, संगीत, ध्वनी आणि चित्रमुद्रण, संकलन, अशा चित्रपटनिर्मितीशी प्रत्यक्ष संबंधित सुविधांपासून जेवणखाण, वाहतूक आणि हॉटेलांपर्यंतच्या सगळ्या व्यवस्था येथे हात जोडून उभ्या आहेत. बाराशे चौरस फूट ते २८ हजार चौरस फूट आकाराचे सत्तेचाळीस सेट येथे आहेत. एका बाजूने पाहिले तर रुग्णालय तर दुसऱ्या बाजूने विमानतळ अशी इमारत, खेडेगाव, छोटे शहर आणि महानगर, कोर्ट, जेल, पोलिस स्टेशन, रेल्वे स्टेशन, बस डेपो, ढाबा, मंदिर, मशीद, चर्च, तलाव, डोंगर अशी अनेक लोकेशन येथे एकमेकांना खेटून उभी आहेत.

गेल्या काही वर्षांत फिल्मसिटी दक्षिण भारतातील एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले आहे. लाखो पर्यटक दरवर्षी त्याला भेट देतात. ईनाडू समूहाच्या विविध भाषांतील वाहिन्यांचा कारभारही येथूनच चालतो.

* प्रो. डॉ. जितेन भट्ट यांचे पुण्यात प्रथमच व्याख्यान

पिरॅमिड आणि पिरॅमिडने भाग्यसमृद्धि या विषयावर पुण्यात प्रथमच इंटरनॅशनल फेम प्रो. डॉ. जितेन भट्ट यांचे व्याख्यान होणार आहे. पिरॅमिडचा आकार, त्याचे स्थापत्य शास्त्र आणि काळ हे इतिहासातील गूढ आहे. परंतु त्याचे कार्य आश्चर्यजनक आहे.

प्रो. डॉ. जितेन भट्ट यांनी गेले २५ वर्षे जगभर अथक संशोधनकरून हे ज्ञान आपल्यासमोर साध्या सोप्या सिद्धांताद्वारे ठेवले आहे. त्याया अमूल्य ज्ञानाची, अनुभवाची व संशोधनाची परिणीती म्हणजेच त्यांची कन्या डॉ. धारा भट्ट यांनी शब्दबद्ध केलेले "Pyramid & Vastu" हे इंग्रजी भाषेतील पुस्तक. आजपर्यंत या पुस्तकाच्या ९ आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत.

मराठी जिज्ञासू वाचकांसाठी, अभ्यासकांसाठी आता हेच पुस्तक मराठी भाषेत मेहता प्रकाशनाद्वारे उपलब्ध होणार आहे. मराठी पुस्तक लोकार्पणाचा सोहोळा दि. २५.९.०५ रोजी सकाळी ९.३० ते १.३० या वेळात यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कोथरुड येथे मा. श्री. धनंजय जाधव,IPS पोलिस आयुक्त पुणे शहर यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.

बुद्धिबळात कौशल्य मिळवायचंय?... मग ही पुस्तके संग्रही हवीतच!

लेखक - ना. रा. वडनप

श्री. ना. रा. वडनप यांनी बुद्धिबळावर अतिशय सुबोध व अभ्यासपूर्ण पुस्तके लिहिलेली आहेत. बुद्धिबळात यश मिळवण्याकरिता अभ्यास, सराव, एकाग्रचित्त, सावधानता, मनाचा समतोल, कोणत्याही परिस्थितीत गडबडून न जाता मानसिक व बौद्धिक ताण सहन करण्याची शक्ती या सर्वोत्तम गुणांची जोपासना करावी लागते. यासाठी या खेळात करावयाच्या चाली, शह, मात, तंत्र, त्यामधील सूत्रे यांचे प्रात्यक्षिक दाखवणारी, खेळाडूंनाउपयुक्त वाटणारी अशी ही पुस्तके आहेत. यात विवेचन केलेले पेचप्रसंग प्रत्यक्ष स्पर्धांमधून खेळणाऱ्या विश्वविख्यात बॉबी फिशर, मिखाईल ताल, सॅम्युअल रेसाव्हस्की इत्यादी नामांकित खेळाडूंच्या डावांतून घेतले आहेत. या पुस्तकांच्या अभ्यासाने तुम्ही बुद्धिबळात चांगलीच प्रगती करू शकाल, अशी खात्री वाटते.

बुद्धिबळ शिका	**१००रु.**
बुद्धिबळाचा श्रीगणेशा	**१२०रु.**
चतुरंग (बुद्धिबळातील) सापळे	**१००रु.**
सुसंघटित मारा	**१००रु.**
बुद्धिबळाचा ओनामा	**८०रु.**



डॉ. सु. र. देशपांडे

भारतीय शिल्पवैभव

प्राचीन- मध्ययुगीन

वेरूळ, सांची, खजुराहो, हंपी येथील शिल्पकलेची विस्मयचकित करणारी वैशिष्ट्ये

विश्वकोश कार्यालयात दीर्घकाळ संपादकीय विभागात काम करणारे डॉ. सु. र. देशपांडे यांना अनेक विषयांत स्वारस्य आहे. विश्वकोशाच्या समृद्ध ग्रंथालयाचा त्यांच्या या व्यासंगाला मोठा हातभार लागलेला आहे. भारतीय गणिकांवरील त्याचे पुस्तक गाजलेले आहे. मराठेशाहीतील मनस्विनी या पुस्तकात जिजाबाई, येसूबाई, मस्तानी वगैरे स्त्रियांची जीवनचरित्रे त्यांनी न्याहाळली आहेत. भारतीय शिल्पकलेवरील त्यांचे नवे पुस्तक भारतीय समृद्ध शिल्पकलेचा सम्यक् परिचय करून देणारे आहे. मराठीत या विषयावर फारसे लेखन उपलब्ध नाही, त्यामुळे या पुस्तकाला विशेष महत्त्व आहे.

या पुस्तकाच्या सिद्धतेसाठी त्यांनी जी चौकट आखून घेतलेली आहे ती काल-प्रदेश-शैली यांच्या वर्गीकरणावर भर न देता, तो निरनिराळ्या स्थळांच्या शिल्पवैभवाची वैशिष्ट्ये टिपण्यावर आहे. प्रारंभी भारतीय शिल्पकलेची ठळक लक्षणे सांगून सुरेश देशपांडे यांनी अशोक स्तंभ, अजिंठा, मथुरा, गांधारशैली, भारहूत, सांची, अमरावती, नागार्जुनकोंडा, वेरूळ, घारापुरी, गोमटेश्वर, सोळंकी शिल्पशैली, खजुराहो, यादवशैली, कोणार्क, चालुक्य होयसळ शैली, शिल्पहार,विजयानगर या प्रत्येकाची आस्वादक दखल घेतली आहे. शेवटी भारतीय शिल्पातील व्यालमूर्ती (प्राणी व मनुष्य यांचा संकर दाखवणाऱ्या मूर्ती) आणि भारतीय कामशिल्पाचा अन्वयार्थ या दोन लेखांत त्या त्या बाबतीतील गुणविशेषांचा परामर्श घेतला आहे.

अशोक स्तंभ आणि यक्षिणीच्या मूर्ती ही मौर्यकाळातील (इ.स.पू. तिसरे शतक) वैशिष्ट्यपूर्ण शिल्पे. अशोकस्तंभ हे उत्तर प्रदेशातील चुनार वालुकाश्मात घडवून विविध स्थळी नेण्यात आले. मृदूस्पर्शी, गुळगुळीत, आरसपानी चमक

असणारे अशोकस्तंभ गोल आणि शंक्वाकार असून वर निमुळते होत गेलेले आहेत. मुख्य दंड आणि स्तंभशीर्ष असे दोन मुख्य भाग असून स्तंभशीर्षाखाली पूर्ण उमललेले कमळ, कमळावर स्तंभशीर्ष फलक आणि मथळ्यावर सिंह, हत्ती, चक्र इ. लिखित अस्सल पुरावा म्हणून या स्तंभाचे महत्त्व अपरंपार आहे. याच काळातील यक्षयक्षींच्या मूर्ती देखील सौंदर्यपूर्ण आहेत.



मद्यकुंभवाहक युवती
भूतेश्वर, मथुरा,
उत्तर प्रदेश.

दिदारगंजची दीड मीटर उंचीची समभंग आसनातील यक्षिणीची मूर्ती चामरधारिणी असून, कमरेपर्यंत अनावृत्त आहे. चुणीदार अधोवस्त्र पाचपदरी कमरबंधने घट्ट बांधलेले, नाभीच्या खाली अधोवस्त्राच्या चुण्यांचा सोगा, लयबद्ध कटिरेषा, गोल डौलदार चेहरा, भरगच्च शरीर, विशाल नितंब, उन्नत उरोज, सिंहकटी, शरीरावर वस्त्रे आणि अलंकार... अशी ही यक्षिणी पाटणा संग्रहालयात ठेवलेली आहे.

वेगवेगळ्या शैलीतील वा वेगवेगळ्या ठिकाणच्या शिल्पकृतींचे असे नेमके वैशिष्ट्य विवरण या पुस्तकात आलेले असल्याने शिल्पकलेचे व भारतीय सौंदर्यशास्त्राचे आपले आकलन सर्वंकष होण्यास मदत मिळते.

भारतीय शिल्पकलेच्या काही वैशिष्ट्यांची कल्पना आपल्याला हवी.

भारतातील सर्व कलांच्या निर्मितीला धर्माचे अधिष्ठान आहे.

नागरी जीवनातील सर्व कलांचे प्रदर्शन करण्याची एकमेव वास्तू म्हणून मंदिर हे केंद्रस्थानी होते. कलाकार, संगीतकार, वादक, शिल्पकार, नृत्यकार, कीर्तनकार- सर्वजण आपली कला, आपली विद्या ईश्वरचरणी अर्पण करण्यात धन्यता मानत असत. सर्व प्रकारचे सण-उत्सव साजरे करण्यासाठी नागरिक मंदिरात एकत्र येत असतात. मंदिर हे प्राचीन भारतीय नागरजनांच्या परस्पर संपर्काचे परस्परसंवादाचे मध्यवर्ती केंद्र होते.

मंदिराची संकल्पना ही पर्वताच्या उत्तुंगतेमधून उत्क्रांत झाली असावी.

शिखर, कळस, आमलक हे मंदिराचे वास्तुघटक पर्वतशिखराशी मिळते जुळते वाटतात.

भारतीय नगररचनेत देवमंदिरे विशिष्ट जागी असावीत असा कौटिलीय अर्थशास्त्रात उल्लेख सापडतो.

भारतात या मंदिरांच्या अनुषंगाने शिल्पकला ही सर्वदूर मान्यता पावत राहिली. राजवाडे आणि मंदिरे यांच्या सुशोभीकरणासाठी, वास्तुकलेच्या शोभेसाठी शिल्पाकृतींचा

आलिंगनमूर्ती - विष्णु-लक्ष्मी आणि सेविका, होयसळेश्वर मंदिर, हळेबीड, कर्नाटक.

वापर होत राहिला, आणि कालांतराने शिल्पकलेला स्वतंत्र स्थान प्राप्त झाले. महाभारतकाळात वास्तुकला आणि शिल्पकला अत्यंत प्रगत अवस्थेत असाव्या. मयसभेची रचना हा वास्तुकलेतला एक चमत्कार होता, तर श्रीकृष्णाने घडवलेली भीमाची लोहमूर्ती, एकलव्याने घडविलेली द्रोणाचार्यांची प्रतिमा, विश्वेश्वर, नंदीश्वर, ब्रह्मदेव यांच्या मूर्ती, विष्णू, रुद्र, यम, रवी, दुर्गा यांच्या प्रतिकृती यांचे उल्लेख प्राचीन ग्रंथांत मिळतात.

भारतातील लेणी, गुंफा, स्तूप, चैत्यविहार आणि मंदिरांचे वास्तुशिल्प यांच्या अनुषंगाने उत्तरोत्तर मूर्तिकलेचा विकास होत गेला.

लेणी किंवा गुंफा हे भारताचे खास वैशिष्ट्य. महाराष्ट्रात सुमारे १२०० लेणी वा गुंफा आहेत. अजिंठावेरूळच्या गुंफा या त्यात शीर्षस्थानी शोभतात. अल्कोनाइड बसाल्ट हा तेथील पाषाण कोरीव शिल्पकामासाठी विशेष उपयुक्त आहे. या सर्व वास्तू असल्याने त्यांना वास्तुशिल्प म्हणता येते. त्या पर्वतात असल्याने त्यांना गिरीशिल्प असेही म्हणता येते. जैन, बौद्ध, हिंदू धर्मीयांनी या गुंफा निर्माण केला असे दिसते.

भारतातील शैलगृहांमध्ये स्तूप, बौद्धसभागृह, विहार (बौद्धमठ) आणि मंदिर अशा चार प्रकारच्या वास्तूरचना आढळतात. कैलास मंदिरे हे वेरूळचे वास्तुलेणे.

शैलगृहातील या वास्तूंच्या तोरणावर, द्वारशाखेवर, वेदीवर आणि भिंतीवर शिल्पाकृतींची विशेष गर्दी दिसते. त्यामुळे वास्तुरचनेपेक्षा शिल्प आणि चित्रकला यांचीच येथे मिजास जास्त आहे. शैलगृहांचा काळ इ.स.पू. २५० ते इ.स.८०० हा मानला जातो.

भारतात बांधीव मंदिरांची (स्ट्रक्चरल टेम्पल्स) संकल्पना बुद्धपूर्वकालापासून प्रचलित असावी. कृष्ण, बलराम, प्रद्युम्न, अनिरुद्ध आणि सांब यांच्या पाच मूर्ती बसविलेल्या मंदिराचा उल्लेख एका शिलालेखात मिळतो.

कौटिल्याने शहरातील राजांचे व श्रेष्ठींचे महाल, देवतांच्या मूर्ती व मंदिरे यांची स्थाने कुठे कशी असावीत याचा ऊहापोह केला आहे. त्यावेळी या वास्तू लाकडाच्या जास्त असत. लाकडावरच कोरीव मूर्ती असत. पाषाणाचा वापरही अर्थात होई. सांची-बारहुत स्तुपामध्ये पाषाण व विटा यांचा वापर झालेला दिसतो.

सूर्यमूर्ती, कोणार्क, ओरिसा.

तेराव्या शतकात मुस्लीम आक्रमणानंतर मंदिर बांधणीक्रिया उत्तर भारतात मंदावली,ती दक्षिण भारताकडे अठराव्या शतकापर्यंत चालू राहिली. मंदिरांना कैलासशिल्प अथवा मेरूशिल्प असेही म्हणतात.

भारतातील एकूण मंदिरांत महादेवाची मंदिरे संख्येने जास्त आहेत. सुमारे ६० टक्के. त्याखालोखाल देवीची (पार्वतची विविध रूपे) आणि विष्णू त्याचे अवतार व रूपे) यांची देवळे आहेत. गणपती, दत्तात्रेय, मारुती यांची मंदिरे कमी असून ब्रह्मा व कार्तिकेय यांची तर मोजकीच देवळे आहेत.

बुद्धकाळात यक्षमूर्ती बनवण्याची कला विकसित झाली असावी.

यक्षाच्या मूर्तीतून बुद्धमूर्तीचे विधानसूत्र शिल्पकारांना मिळाले.

त्यातून ३२ लक्षणांनी युक्त महापुरुषाची मूर्ती बनविण्याची कला शिल्पकारांनी आत्मसात केली. उष्णीय(जटा) हे प्रज्ञालक्षण, भुकुटी (ल-), प्रलंब कर्ण, अजानूबाहू विशाल वृक्ष, हस्तपादगत चक्रचिन्ह इत्यादी बत्तीस लक्षणे मूर्तीमध्ये दाखवली जात. यक्षांच्या मूर्तीत पुरुषी भारदस्तपणा तर यक्षिणीत स्त्रीसुलभ घाटदार बांधा दाखवला जाई.

इजिप्त (ममी, पिरॅमिड, स्पिंक्स), ग्रीस (शारीरिक प्रमाणबद्धता, सौष्ठव), रोम (सम्राटांचे संगमरवरी पुतळे, देहाचे गतिशील रुप, सैनिकांचे आवेशयुक्त हावभाव), चीन (सौम्य), जपान (सुसंवादी व निसर्गपूजक शैली), इराण(राजदरबारी कला) या देशांनी आपापल्या वास्तू कलेच्या आणि मूर्तिकलेच्या शैली समृद्ध केल्या. भारतात रामकृष्ण आणि शिवशंकर यांची मंदिरे खेड्यापाड्यात ही दिसतात. धर्मभावनेशी येथील वैयक्तिक व कौटुंबिक जीवनाची अविभाज्य सांगड घातली गेली आहे असे दिसते.

शिखर, यादवकालीन मांकेश्वर मंदिर, झोडगे, धुळे जिल्हा.

मंदिरामध्ये दैवतकेंद्रित सौदर्य आढळते. सनातनी हिंदूंची कलासृष्टी, कलादृष्टी ही दैवतकेंद्रित आहे. शिव, राम, कृष्ण, विष्णू, सरस्वती, काली, दुर्गा यांच्या मानव्याला दिव्यत्व बहाल करण्यात आले.

बौद्ध किंवा जैन मंदिरांमध्ये सिद्धकेंद्रित मूर्ती व शिल्प आढळते. हिंदू व जैन बौद्धांचे शिल्पशास्त्र मूलत: एकच आहे.

धर्मश्रद्धा हा भारतीय मानसिकतेचा एक अविभाज्य भाग असला तरी **येथील मूर्तिकलेत वास्तववादी, धर्मनिरपेक्ष आणि आदर्शवादी अशा तिन्ही प्रकारच्या कलाकृती आढळतात.** धर्मप्रेरणा आणि सौंदर्यप्रेरणा यांचा संगम त्यात दिसतो. धर्म, अर्थ, काम या संकल्पनांना मोक्षांची जोड देऊन या चार पुरुषार्थांना संकल्पनांचा सौंदर्यात्मक वा कलात्मक आविष्कार म्हणजे कलेची सिद्धी असे प्रमाण मानले. काम आणि अर्थ यांचा आविष्कार करण्यासाठी स्त्रीपुरुषांची प्रणयभावना प्रकट करणारी आलिंगन-चुंबन-समागमदर्शक शिल्पे निर्माण केली गेली. पशुपक्षी, प्राणी, वनस्पती, क्रीडाप्रकार, युद्धप्रसंग यांच्या शिल्पांतून तत्कालीन वेषभूषा, केशभूषा, अलंकार, वाद्ये, शस्त्रे यांचे अलंकरण दिसते.

शिव हा एकमेव विश्वव्यापी परमात्मा असून हर्षशोकाच्या द्वंद्वापलीकडे आहे; तो नित्य आनंद आणि दया यांचा वर्षाव करीत असतो ही मध्यवर्ती भावना अनेक शिल्पांतून प्रकट होते. तांडव नृत्य ही त्याच्या जीवनातील एक छटा आहे.

भारतीय शिल्पकालीन या आंतरिक भावाविष्काराला महत्त्व आहे. तिला अध्यात्माचे अधिष्ठान आहे.

भारतीय कला ही प्रेरणा, तंत्र, तत्त्व व स्वरूप याबाबत एतद्देशीय आहे.

महिषासूरमर्दिनी, चेन्नकेशव मंदिर, बेल्लूर, कर्नाटक.

भारतेतर कलांचा स्वीकार करताना त्यांना आपल्या प्रज्ञेत पचवून घेतले आहे. नवी प्रतिमाने, आकृतिबंध, स्वीकारूनही मूळ आशय तोच कायम राखला.

भारतीय कला अलंकरणप्रधान आाणि सुशोभात्मक कला आहे.

लतावेली, कमलपुष्प, पशुपक्षी, स्त्रीपुरुष यांची मनोहर गुंफण त्यात आढळतो.

भारतीय शिल्पात सिंहकटी, नितंबिनी, घटस्तनी, दीर्घमत्स्यलोचन, सुरसुंदरी, अप्सरा, शालभंजिका, वृक्षिका इत्यादीची यौवनाने टिच्चून भरलेल्या स्त्रियांची शिल्पे विपुल प्रमाणात आढळतात.

भारतीय शिल्पकलेतील कामशिल्पे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. तशी ती इतर देशात आढळत नाहीत. खजुराहो, कोणार्क, मोधेरा, भुवनेश्वर या ठिकाणी या कामशिल्पांचे वैभवशाली विभ्रम पहायला मिळतात.

भारतीय शिल्पांचा अभ्यास करताना वेगवेगळ्या प्रकारे वर्गीकरण करून तो केला जातो.

१. कालक्रमानुसार - प्रागैतिहासिक, प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन

२. धार्मिक- बौद्ध, जैन, ब्राह्मणी वा हिंदू

३. घराणी - मौर्य, गुहा, वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य, यादव, होयसळ

४. प्रदेश- गांधारशैली, मथुरा, वेंगशैली.

भारतीय शिल्पकलेबद्दल इतके माहितीपूर्ण आणि सर्वसमावेशक पुस्तक मराठीत यापूर्वी आलेले नाही. त्यामुळे या पुस्तकाचे महत्त्व फार मोठे आहे.

पृष्ठे : १५२● किंमत : ८०रु. ● सभासदांना : ६०रु. ● पोस्टेज :२०रु.

एका नृत्यांगनेचे मुक्त जीवनशिल्प
टाईमपास

प्रोतिमा बेदी अनु. सुप्रिया वकील

किंमत : १८०रु.

इतिहासनिर्मात्या व्यक्तींचे जीवन-संघर्ष चितारणाऱ्या संग्राह्य कलाकृती

लेखक **रणजित देसाई**

श्रीमानयोगी

शिवचरित्राचे भव्योदात्त उत्कट चित्रण करणारी महाकादंबरी.

३०० रुपये

१७ वी आवृत्ती



स्वामी

(साहित्य अकादमी पारितोषिक)

महाराष्ट्रातल्या जनतेला जिने मंत्रमुग्ध केले, जी प्रत्येक घरात भक्तिभावाने पूजली गेली अशी मराठी सारस्वतातील अजरामर साहित्यकृती !

१४० रुपये

२४ वी आवृत्ती



पावनखिंड

ज्याच्या स्वामीभक्तीनं मराठ्यांचा इतिहास 'पावन' केला अशा बाजीप्रभूची उर्जस्वल कहाणी

किंमत : १०० रुपये

६ वी आवृत्ती

इतिहास घडविणाऱ्या व्यक्तींचे जीवन-संघर्ष चितारणाऱ्या संग्राह्य कलाकृती

नेताजी

वि. स. वाळिंबे

सुभाषचंद्र बोस या अतीव साहसी देशभक्ताच्या अलौकिक कर्तृत्वाचा सम्यक परिचय

५ वी आवृत्ती

३५० रुपये



आधुनिक भारताचे प्रेषित

स्वामी विवेकानंद

गौतम घोष

अनु.माधव मोर्डेकर

स्वामीजींची अद्वितीय तेजोमयी यशोगाथा

१८० रुपये



भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया

नवाज मोदी

अनु.वासंती फडके

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अनाम धगधगत्या क्रांतिवालांच्या कहाण्या

३०० रुपये



तु. बा नाईक



छत्रपती राजर्षी शाहू महाराज

प्रजाहितदक्ष, सुधारणावादी राज्यकर्त्याची प्रेरक कहाणी

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जन्मशताब्दीनिमित्त १९७४ साली कोल्हापूरचे एक अभ्यासक तु. बा. नाईक यांनी परिश्रमपूर्वक त्यांचे चरित्र लिहून काढले. ते मेहता पब्लिशिंग हाऊसने त्यावेळी प्रसिद्ध केले. त्याची तिसरी आवृत्ती आता आकर्षक स्वरूपात नव्या थाटात प्रसिद्ध झाली आहे.

छत्रपती शाहू महाराज हे कागलच्या घाटगे घराण्यात १८७४ साली जन्मले. त्यांचे वडील जयसिंगराव आबासाहेब घाटगे हे होते. कोल्हापूरच्या छत्रपती भोसले घराण्यात त्यांना वयाच्या दहाव्या वर्षी दत्तक घेण्यात आले. आणि मूळचे यशवंतराव जयसिंगराव घाटगे हे 'शाहू महाराज' झाले. १८८५ मध्ये त्यांना शिक्षणासाठी राजकोट येथील राजकुमार कॉलेजात पाठवण्यात आले. कुस्ती, शिकार, घोडदौड यातील त्यांचे प्रावीण्य सर्वांच्या कौतुकाला पात्र ठरले. १८८९ मध्ये त्यांचे राजकोट येथील शिक्षण पूर्ण झाले. १८९० ते १८९४ पर्यंत सर एस. एम. फ्रेजर यांच्या गार्डियनशिपखाली शाहू महाराजांनी इंग्रजी भाषा, राज्यकारभार, जागतिक इतिहास वगैरे विषयांचे अध्ययन धारवाड येथे राहून पूर्ण केले. १८९१ मध्ये त्यांचा विवाह बडोद्याचे सरदार गुणाजीराव खानविलकर यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याबरोबर झाला. लक्ष्मीबाईंचे वय त्यावेळी ११ वर्षे होते. त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी मिसेस फॉक्स यांनी उचलली.

वयाच्या विसाव्या वर्षी शाहू महाराजांच्या हाती कोल्हापूर संस्थानाची राज्यसूत्रे आली. (२ एप्रिल १८९४)

''आमचे प्रजानन सदा सुखी व संतुष्ट असावेत. त्यांच्या हिताची एकसारखी अभिवृद्धी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे. त्यासाठी सर्वांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची आणि सहकार्याची

आम्हास आवश्यकता आहे.'' असे त्यांनी त्यावेळी जाहीर केले.

शाहू महाराजांनी राज्यसूत्रे हाती घेतली तेव्हा 'केसरी'ने 'करवीर क्षेत्री राजकीय कपिलाषष्ठीचा योग' शीर्षकाचा अग्रलेख लिहून शाहू महाराजांचे अभिनंदन केले. त्यात म्हटले होते,''हिंदुत्वाचा योग्य अभिमान बाळगून त्याच्या योग्य अभ्युदयासाठी निष्काम बुद्धीने आपला देह झिजविणे, हे कोल्हापूरच्या महाराजांचे कुलव्रत आहे व ते पाळण्यास श्रीमंत शाहू छत्रपती महाराजांस ईश्वर सुबुद्धी,धैर्य आणि दीर्घायुष्य देवो व महाराजांस त्याप्रमाणे यशप्राप्ती होऊन त्यांचा सदैव सारखा उत्कर्ष होवो.''

नारायण भटजींनी म्हटले,''नाही. तुम्ही क्षत्रिय आहात असं सर्वशक्तिमान ब्रह्मवृंद जोपर्यंत जाहीर करीत नाही, तोवर मी तुमची किंमत शूद्रापेक्षा अधिक समजणार नाही.''

६ मे १९२२ रोजी शाहूमहाराजांचे वयाच्या ४८व्या वर्षी निधन झाले. त्यावेळी केसरीने मृत्यूलेखात लिहिले होते,''सर्व हिंदुस्थान राजकीय दृष्ट्या स्वावलंबी झाला पाहिजे व हिंदुस्थानातील प्रत्येक समाज धर्मदृष्ट्या व व्यवहारदृष्ट्या स्वावलंबी बनला पाहिजे. राष्ट्रकार्य करायला ही दोन्हीही कार्ये केली पाहिजेत व ती दोन्हीही कार्ये सिद्धीला नेली पाहिजेत. **लोकमान्य टिळकांनी पहिले कार्य उचलले व कोल्हापूरच्या महाराजांनी दुसरे कार्य उचलले. हे दोघे एक झाले असते तर महाराष्ट्राचे दैव ताबडतोब उघडले असते.''**

या अग्रलेखातील टिळक व शाहू महाराज 'एक झाले असते तर' चा हा उल्लेख अत्यंत अर्थपूर्ण आहे; आणि त्याला अनेक संदर्भ आहेत हे स्पष्टच आहे हे दोघे परस्परविरोधात उभे ठाकले आणि त्यातून वेदोक्त प्रकरण म्हणून गाजलेले प्रकरण उद्भवले ते या दोन्ही नेत्यांच्या नेतृत्वाची कसोटी पाहणारे ठरले.

शाहू महाराज हे क्षत्रिय नाहीत, त्यामुळे स्नान करीत असताना १८९९ साली त्यांचे पुरोहित नारायण भटजी यांनी वैदिक मंत्र म्हणण्याची टाळाटाळ चालवली. शाहू महाराजांनी त्यावर मी क्षत्रिय आहे असे म्हटले, तेव्हा नारायण भटजींनी म्हटले,''नाही. तुम्ही क्षत्रिय आहात असं सर्वशक्तिमान ब्रह्मवृंद जोपर्यंत जाहीर करीत नाही, तोवर मी तुमची किंमत शूद्रापेक्षा अधिक समजणार नाही.''

''आम्ही तुमच्या दृष्टीने जरी शूद्र असलो तरी स्नान न करता धार्मिक विधी करणे हे कोणत्याही भटजीला शोभणारे नाही.'' असे महाराजांनी म्हटले.

'बाहेरख्याली व अपवित्र' अशा त्या उद्धट पुरोहिताने आपल्याला शूद्र लेखले हे बघून शाहू महाराजांना हा धार्मिक अन्याय असह्य झाला. 'जरी ब्राह्मण मूढमती तरी तो जगत्वंद्य हे दासबोधातील सूत्र त्यांना मान्य नव्हते. नारायण भटजीला समजविण्याचा प्रयत्न काहीजणांनी केला पण पालथ्या घड्यावर पाणी.

'अमक्यांनी वैदिक कर्मे आचरावीत, अमक्यांनी आचरू नयेत अशा भानगडीत सयाजीराव महाराजांनी पडणे म्हणजे शुद्ध अव्यापारेषु व्यापार होय...

तेव्हा महाराजांनी वेदोक्त प्रकरण धसाला लावण्याचे ठरवले. त्यांच्याआधी सातारचे प्रतापसिंह महाराज आणि बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांच्या बाबतीतही असा वाद निर्माण झाला होता. बडोदा येथे पुराणोक्त पद्धतीने धर्मकृत्ये होत तेव्हा जोधपूरचे शिवदत्त जोशी यांनी सयाजीरावांना म्हटले,''रजपूतांप्रमाणे तुमच्या येथे वेदोक्त पद्धतीने धर्मकार्य का होत नाही?'' बडोद्याचे राजपुरोहित राजारामशास्त्री यांनी वेदोक्त पद्धतीने विधी करण्यास नकार देऊन राजीनामा दिला तेव्हा शिवदत्त जोशी वगैरे तेथे वेदोक्त विधी करू लागले. १८९८ मध्ये युवराजांच्या मुंजीही वेदोक्त पद्धतीने केल्या त्या संदर्भात केसरीमध्ये लोकमान्यांनी टीका केली. 'बडोदा सरकारचा वेदान्त' या लेखात 'अमक्यांनी वैदिक कर्मे आचरावीत, अमक्यांनी आचरू नयेत अशा भानगडीत सयाजीराव महाराजांनी पडणे म्हणजे शुद्ध अव्यापारेषु व्यापार होय... विलायतेस दहापाच सफरी केल्याने धर्माचे ज्ञान होते असे नाही.'' याला सयाजीरावांच्या वतीने उत्तर देण्यात आले ते असे की, 'शिवाजी महाराजांचे क्षत्रियत्व केसरीने मान्य केल्यावर कोल्हापूर आणि बडोदा संस्थानच्या अधिपतींनी वेदोक्ताचा अधिकार घेतला तर त्यांच्या कृत्यास खूळ म्हणणे हे तर्कविरोधी आहे.

याला लोकमान्य टिळकांनी उत्तर देताना म्हटले,''शिवाजी महाराजांना जरी राज्याभिषेक शास्त्रोक्त पद्धतीने करण्यात आला तरी त्यांच्या घरचे सर्व संस्कार वेदोक्त होत असत अशाबद्दल कोठेही पुरावा नाही...जरी ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य यांजकडील गृहसंस्कार वेदोक्त मंत्राने करावे अशी स्मृतीतून वचने असली तरी... खऱ्या क्षत्रिय आणि वैश्य जाती हल्ली नाहीशा झाल्या आहेत.''

१९०१ साली शाहू महाराजांनी मुख्य पुरोहित आप्पासाहेब राजोपाध्ये यांना अधिकाऱ्यांमार्फत हुकूम पाठवला की, ''यापुढे धार्मिक कृत्ये योग्य प्रकारे केली जातील, त्याची हयगय होणार नाही, याची तुम्ही काळजी घ्यावी.'' आणि राजोपाध्ये यांनी टाळाटाळ केल्याने नारायणभट्ट सेवेकरी यांची शाहू महाराजांनी नेमणूक केली. तेव्हा लगेच कोल्हापूरच्या ब्रह्मवृंदाने त्यांच्यावर बहिष्कार टाकला. त्यावेळी शाहू महाराजांनी तिघांची एक चौकशी समिती नेमली. 'महाराज क्षत्रिय नाहीत किंवा त्यांना वेदोक्ताचा अधिकार नाही' असे या अहवालात म्हटले गेले, परंतु त्या अहवालावर आप्पासाहेब राजोपाध्ये यांनी सही करण्याचे नाकारले. तेव्हा १९०२ मध्ये 'तुम्हाला दिलेले इनाम जप्त का करू नये याचा ४ दिवसात खुलासा करा' असा फतवा काढण्यात आला. राजोपाध्यांनी उत्तर दिले,''छत्रपती जरी क्षत्रिय असले तरी कागलच्या घराण्यात जन्मले असल्यामुळे

ही विनंती मान्य करता येत नाही.. काही कारणाने जी पद्धत बंद पडली ती शंकराचार्यांच्या किंवा काशीतील पंडितांच्या अनुज्ञेशिवाय सुरू करता येणार नाही. हे विधी करण्यापूर्वी महाराजांनी प्रायश्चित घ्यावे.''

शिवाजी महाराजांना जरी राज्याभिषेक शास्त्रोक्त पद्धतीने करण्यात आला तरी त्यांच्या घरचे सर्व संस्कार वेदोक्त होत असत अशाबद्दल कोठेही पुरावा नाही...

यावेळी लोकमान्य टिळक पुन्हा मध्ये पडले,''शिवछत्रपती क्षत्रिय ठरले होते. तर त्यांच्या गादीवर येणारा घाटगे घराण्यातील पुरुष असला तरी तो भोसले ठरतो. जो छत्रपतींच्या गादीवर बसेल तोच क्षत्रिय. राजाचा दुसरा बंधू असेल तो क्षत्रिय नाही. गादीवर जो पुत्र बसणार नाही तो क्षत्रिय नाही.'' असा टिळकांचा युक्तिवाद होता. ही तडजोड महाराजांनी मान्य केली नाही.

राजोपाध्ये यानी पोलिटिकल एजंटकडे तक्रार केली. धार्मिक बाबतीत आपणास हात घालता येणार नाही, महाराजांचा निर्णय अंतिम मानावा असे त्याने सांगितले.

महाराष्ट्रभर ब्राह्मणवर्गाने शाहू महाराजांविरुद्ध पवित्रा घेतला.

आमच्या हुकूमाप्रमाणे ''राजोपाध्ये धार्मिक विधी करीत नाहीत, तर त्यांना दिलेले उत्पन्न जप्त का करू नये?'' या शाहू महाराजांच्या खलित्याला''उत्पन्न जप्त झाले तरी बेहत्तर, पण वेदोक्त कार्य करणार नाही'' असे उत्तर राजोपाध्ये यांनी पाठवले. महाराजांनी जप्तीच हुकूम देऊन, राजोपाध्ये घराण्याकडे असलेले वंशपरंपरागत हक्क काढून घेतले.

''तुम्ही परदेशात जात आहात. काही दुर्दैव ओढवले तर?'' अशी भीती ब्राह्मणांनी शाहू महाराजांना घातली. पण ते परदेश दौरा करून सुखरूप परतही आले. महाराजांच्या दत्तक मातोश्री आनंदीबाई यांचे अंत्यसंस्कार वेदोक्त पद्धतीने करण्यास पुरोहितांनी नकार दिला. तेव्हा शाहू महाराजांना वाईट वाटले. सेवेकऱ्यांकडून विधी करून घेण्यात आले ''मरणाची अगर कोणतीही दुसरी आपत्ती मजवर आली तरी मी डगमगणार नाही. पण अशी आपत्ती आल्यावर हा आमच्या शापाचा परिणाम अशी बढाई मारण्याची, लोकांच्या धर्मभोळेपणाचा फायदा घेण्याची संधी ब्राह्मणांना मिळेल याचे मला वाईट वाटते. ते अशा प्रसंगाचा उपयोग आमचे कार्य हाणून पाडण्यासाठी करतील.'' अशी शाहूमहाराजांना चिंता वाटत होती.

राजोपाध्ये यांनी प्रिव्ही कौसिल, पोलिटिकल एजंट, मुंबई सरकार, व्हाइसरॉय यांजकडे तक्रारी केल्या. परंतु १९०३ मध्ये त्यांचे इनाम रद्द झाल्याचा निर्णय कायम झाला. राजोपाध्यांची जागा जोशीराव घराण्याला देण्यात आली.

या वेदोक्त प्रकरणाने महाराजांच्या बुद्धिप्रामाण्यवादाची कसोटी लागली. ''आमच्या

"आमच्या जातीचेच उपाध्याय नेमून ब्राह्मणांचे जू झुगारून द्यावे आणि शेणवी, जैन, सोनार लोकांप्रमाणे आपलाही उद्धार करून घ्यावा अशा विचारांचे लोक आमच्यामध्ये आहेत."

जातीचेच उपाध्याय नेमून ब्राह्मणांचे जू झुगारून द्यावे आणि शेणवी, जैन, सोनार लोकांप्रमाणे आपलाही उद्धार करून घ्यावा अशा विचारांचे लोक आमच्यामध्ये आहेत.'' असे त्यांनी एका पत्रात म्हटले आहे. (३मार्च १९०४). स्वातंत्र्यवीर सावरकर, राजारामशास्त्री भागवत, नामदार गोखले प्रभृतींनी शाहू महाराजांची भूमिका उचलून धरली. पुढे शाहू महाराजांनी बहुजन समाजातील मुलांसाठी वैदिक पाठशाळाही काढली.

शाहू महाराजांच्या कारकीर्दीत ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला चांगलीच धार चढली. 'वेदोक्त' प्रकरणात त्यांची सरशी झाली त्याचप्रमाणे शंकराचार्यांच्या पीठाबाबतही त्यांनी अशीच परखड भूमिका घेऊन शंकराचार्य हे पद वंशपरंपरा नसून बहुजन समाजातील पुरोहित, जगत्गुरू नेमण्याचा आग्रह धरावा. यासारखे विचर १९०६ पासून त्यांच्या मनात येत होते. भिक्षुकशाहीच्या कचाट्यातून बहुजनसमाज मुक्त झाला तरच उच्चवर्णीय सनातन्यांची कुरघोडी थांबेल असे त्यांचे ठाम मत झाले होते. धार्मिक क्रांती करण्याच्या दृष्टीने त्यांनी मौनी महाराजांच्या रिक्त पीठावर १९२१ साली सदाशिवराव पाटील बेनाडीकर यांची क्षात्रजगत्गुरू म्हणून निवड केली. मौनी महाराज हे शिवाजी महाराजांचे धर्मगुरू होते; आणि शिवाजी महाराजांनी या पीठाला काही इनाम गावेही त्यावेळी दिली होती. शाहू महाराजांनी या पीठाच्या वंशजांना वंशपरंपरा अधिकार राहणार नाही अशी तजवीज केली. "परमेश्वर आणि मनुष्य यांच्यामधील सर्व दलाल नाहीसे करणे हे आपले ध्येय असले पाहिजे. देशसेवा आणि जनसेवा हेच आपले मुख्य जीवितकार्य असले पाहिजे.'' असे त्यांनी क्षात्रजगत्गुरूंना पत्राद्वारे कळवले. धार्मिक कृत्ये आवश्यकच होत; मात्र ती करण्याचा मक्ता फक्त ब्राह्मणांकडेच नसून, सर्व जातींच्या पुरोहितांना ती कृत्ये करण्यास मुभा असावी ही क्रांती शाहूमहाराजांनी शंभर वर्षांपूर्वी घडवून आणण्यात यश मिळवले.''

कोल्हापूरात त्यांनी १९११ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजातर्फे पुरोहित शाळा सुरू झाली. घरचा पुरोहित हे पुस्तकही तयार करण्यात आले. ही चळवळ संस्थानभर पसरली. सत्यशोधक समाजशाळेत तयार झालेल्या पुरोहितांची १९१३ यासाली ५१६३ धार्मिक विधी केले अशी नोंद आहे १९१४ साली सत्यशोधक समाजाची वास्तू झाली. १९१५ साली सहभोजने सुरू झाली. १९१६ मध्ये निपाणीला सत्यशोधक समाजाची परिषद झाली..

शाहू महाराजांनी १९१८ मध्ये कोल्हापूरला आर्यसमाजाची स्थापना केली. वैदिक धर्मप्रसार, अस्पृश्यता निवास, शिक्षण प्रसार, राष्ट्रभाषा प्रसार, अनाथ मुलांचे पालनपोषण, अंधरूढी निर्मूलन वगैरे कामांना त्याद्वारे चालना मिळाली. भटभिक्षुकांची पुरोहितगिरी नष्ट करणे व मानवसमाज समान स्तरावर आणणे हा सत्यशोधक समाजाचा हेतू, तर जातिभेद न मानणे, वैदिक पद्धतीने विधी करणे यावर आर्यसमाजाचा भर. शाहू महाराजांनी आर्यसमाजाचे कार्य पाहण्यासाठी हरिद्वारला भेट दिली. आर्यसमाजाच्या लोकांचा स्नानसंध्या आणि होमहवन यावर भर असे, त्यांचे वाङ्मय संस्कृतमध्ये असे. त्यामुळे आर्यसमाजाचे फारसे आकर्षण बहुजनसमाजाला वाटले नाही. त्याचा कोल्हापूर शहराबाहेर फारसा प्रचार झाला नाही.

"परमेश्वर आणि मनुष्य यांच्यामधील सर्व दलाल नाहीसे करणे हे आपले ध्येय असले पाहिजे. देशसेवा आणि जनसेवा हेच आपले मुख्य जीवितकार्य असले पाहिजे.''

थिऑसॉफीचेही महाराजांना काही काळ आकर्षण वाटले.

शाहू महाराजांनी सामाजिक क्रांती घडवून आणली, विविध समाजांना विकासाची संधी दिली, आपल्या स्वत्वाची जाण त्यांच्यात दृढ केली. शिक्षणाशिवाय प्रगती नाही हे लक्षात घेऊन सर्व समाजघटकांना शिक्षण मिळावे अशी व्यवस्था केली. कॉलेज विद्यार्थी वसतीगृह, जैन, लिंगायत, मुस्लीम, प्रभू, नामदेव, सारस्वत, ख्रिश्चन मिशन, वगैरे वसतीगृहे सुरू करून त्या त्या समाजातील मुलांना शिक्षणासाठी कोल्हापूर शहरात अल्पखर्चात राहण्यासाठी प्रोत्साहन दिले. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, मराठा स्टुडंटस असोसिएशन, गावकामगार पाटील स्कूल, तलाठी स्कूल, श्रीशिवाजी मराठा हायस्कूल (पुणे), प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग, श्रीशिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय अशा अनेक संस्था उभारल्या. खेड्यापाड्यात प्राथमिक शाळा काढल्या. सार्वत्रिक मोफत शिक्षण सुरू केले. "माझी प्रजा नुसत्या प्राथमिक शिक्षणाने जरी विभूषित झाली तरी मी कोल्हापूरचे राज्य तिच्या स्वाधीन करीन.'' असे ते म्हणत.

पहिल्या महायुद्धात ब्रिटिशांसाठी सैन्य भरती आणि आर्थिक मदत यात त्यांनी पुढाकार घेतला. १९२१ साली शिवस्मारकाचा पायाभरणी समारंभ प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते पुणे येथे झाला. छत्रपती शिवाजी राजांची निंदानालस्ती करणाऱ्या ब्रिटिशांच्या हस्ते हे शिवस्मारक उभारून शाहू महाराजांनी एका परीने इतिहास घडवला.

शाहू महाराजांनी कृषिक्षेत्राला प्रोत्साहन दिले. व्यापारउदीम, कारखानदारी वाढावी यासाठी प्रयत्न केले. अस्पृश्यता नष्ट व्हावी म्हणून अनेक कायदे केले.

त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली. वेठवरळा, महारकी वतन वगैरे कायदे केले.

लोकमान्य टिळक आणि शाहू महाराज हे दोघेही आपापल्या परीने दिग्गज. परंतु त्यांच्यात काही न काही कारणाने संघर्ष होत राहिला. ताईमहाराज प्रकरणात शाहू महाराजांनी टिळकांनी घेतलेल्या दत्तकाला मान्यता नाकारली. त्यामुळे हे प्रकरण पेटले. लोकमान्यांनी प्रतिष्ठेचा प्रश्न केला. प्रिव्ही कौंसिलने लोकमान्यांचा दत्तक खरा ठरवला (१९०६). त्यामुळे शाहू महाराज आणि लोकमान्य यांच्यातील वैतुष्ट्य आणखी वाढले. १९०८ ते १९१४ या काळात लोकमान्य टिळक यांना मंडाले तुरुंगात डांबले गेले. सुटून आल्यावर त्यांच्या राजकारणाचा धूमधडाका पुन्हा जोरात सुरू झाला. ब्राह्मणवर्ग हा शाहू महाराजांवर रुष्ट होता. तरीही शाहूमहाराजांना टिळकांशी असणारा हा दुरावा मनोमन क्लेशकारक वाटत असावा.

पुण्यात गव्हर्नर दरबारासाठी आलेले शाहू महाराज दरबार संपल्यावर त्याच दरबारी पोशाखात टिळकांच्या निवासस्थानी आले. लोकमान्य त्यामुळे भारावून गेले. इकडेच तिकडचे बोलणे झाल्यावर महाराजांनी आपल्या डोक्यावर फेटा काढून तेथे ठेवला. महाराज निघून गेल्यावर लोकमान्यांच्या लक्षात आले की त्यांचा फेटा येथेच राहिला आहे. ते धावत धावत महाराजांकडे गेले तेव्हा महाराज म्हणाले, *''लोकमान्य, हा फेटा माझ्या डोक्यावर राहावा असे तुम्हाला वाटत असेल तर केसरीमध्ये माझ्यावर येणारी टीका बंद करा. नाहीतर हा फेटा इथेच तुमच्याजवळ असू द्या.''*

लोकमान्य म्हणाले,''महाराज, मी जिवंत असेपर्यंत आपल्यावर माझ्या केसरी पत्रात टीका होणार नाही असे मी वचन देतो.''

दुर्दैव एवढेच या घटनेनंतर काही महिन्यांनीच लोकमान्यांचे निधन झाले. त्यांच्या आजारपणाची बातमी कळल्यावर शाहू महाराजांनी लोकमान्यांना पन्हाळगडावर येऊन राहण्यासाठी विनंती केली होती.

लोकमान्यांच्या निधनाने महाराजांना मोठा धक्का बसला. त्यानंतर दोन वर्षांच्या आतच शाहू महाराजांचेही प्राणोत्क्रमण झाले.

या दोन थोर व्यक्तींमधील वाद, दुरावा आणि तरीही अंतरी असणारा परस्पर सौहार्दाचा उमाळा- एक विलक्षण नाट्य आपल्यापुढे ठेवतो.

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचे अनेकविध पैलू नाईक यांनी या चरित्रात प्रकट केले आहेत. शाहू महाराजांवर अनेक पुस्तके तयार झाली आहेत; परंतु त्यामध्ये सर्वांगीण माहिती आणि सम्यक् दर्शन घडवणारे हे चरित्र सर्वात जास्त उठून दिसते.

पृष्ठे : १६० ● किंमत : १००रु. ● सभासदांना : ७५रु. ● पोस्टेज : २०रु.

मानवाच्या कालातीत जीवनप्रेरणांचा पट मांडणाऱ्या पुराणातील चमकदार व्यक्तिरेखा...



सभासदांना
२५% सवलत!

पर्व
एस. एल. भैरप्पा
अनु. उमा कुलकर्णी
किंमत ३००रु.

राधेय
रणजित देसाई
किंमत १२०रु.

एकलव्य
शरद दळवी
किंमत २००रु.

वज्रकमळ घननील
धनंजय देशपांडे
किंमत २००रु.

पोस्टेज
प्रत्येकी २५रु.



वि. स. खांडेकर

ययाति

खांडेकरांना अत्युच्च यशकीर्ती मिळवून देणारी कादंबरी

यया‍तीची नवी आवृत्ती नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. त्या निमित्ताने तिच्या लोकप्रियतेचा आणि आशयघनतेचा प्रत्यय येतो.

प्रा. नरहर कुरुंदकर यांनी 'ययाती'च्या निमित्ताने खांडेकरांच्या लेखनवैशिष्ट्यांचा मागोवा घेतलेला आहे. तो उद्‍बोधक आहे. त्याची थोडी झलक येथे बघू या. 'ययाती'च्या संदर्भात प्रा. कुरुंदकर यांनी 'धार आणि काठ'या ग्रंथात काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली आहेत.

ययातीचे यश ही खांडेकरांच्या मानसिक जीवनातील अत्यंत महत्त्वाची घटना आहे; या कादंबरीने खांडेकरांना जे यश मिळवून दिले तसे यश त्यांचे समकालीन लेखक फडके, माडखोलकर, दिघे यांना मिळाले नाही. त्यांच्या पिढीतील ॲकॅडमी पुरस्कार मिळवणारे खांडेकर हे एकमेव लेखक आहेत.

आजच्या सामाजिक जीवनाला मर्यादा पडलेल्या आहेत; त्यामुळे आजच्या नवयुगातील जीवनाचा आशय हा पौराणिक कथांचा आधार घेऊनच व्यक्त करता येईल असा एक विचार मांडला जातो. टॉलस्टॉयसारखा लेखक ऐतिहासिक कादंबरीच सामाजिक कादंबरीपेक्षा अधिक सामाजिक आणि पौराणिकापेक्षा अधिक भव्य करून दाखवतो; हा प्रश्न लेखकाच्या शक्तीचा असतो. पुराणकथांना वर्तमानकालीन मानवी रूपे देणे बरोबर नाही असे दि. के. बेडेकर म्हणतात. परंतु पुराणकथांचा प्रतीकात्मक असा वापर अनेकांनी केला आहे. (उदा. सानेगुरुजी आस्तिक) पण 'ययाती'ला जी लोकप्रियता मिळाली तिची बरोबरी अन्य कोणत्याही कृतीला मिळाली नाही; हे लक्षात घेता ययातीच्या वाचकप्रियतेचे यश कशात आहे हा मुद्दा कुरुंदकर उपस्थित करतात.

पुराणकथांना मानवी रूप आणि वर्तमानकालीन रूप दिले जाते याचे खरे कारणच बोध व रंजनाच्या प्रेरणा हे आहे; फार तर हे वाङ्‌मय खऱ्या अर्थाने कलात्मक नाही असे आपण म्हणू शकतो. बोध हे प्रयोजन ठेवून पुराणकथा वापरली जाते तेव्हा तिचे स्वरूप दृष्टान्ताचे किंवा प्रतीकाचे असते; बोध हा नेहमीच वर्तमानकालीन असतो. नव्या बदललेल्या परिस्थितीत नव्या कारणासाठी पुराणकथा प्रतीक होणार. हीच ययातीची कथा भोग विरुद्ध वैराग्य हा बोध करण्यासाठी पुराणांनी अनेकदा वापरली आहे. हे करताना त्यांना तपशील बदलावा लागला. तेच तपशील, संदर्भ बदलण्याचे काम खांडेकरांनी केले.

महाभारतात आदिपर्वात अध्याय ७० ते ८८ यामध्ये ययातीची कथा सलगपणे आली आहे. सम्राट नहुषाला यती, ययाती, संयाती, आयाती वगैरे सहा मुले होती. ययातीला देवयानी (यदू व तुर्वसु), शर्मिष्ठा(अनु, द्रस्यू व पुरु) या दोघींकडून मुले झाली होती. ययाती तरीही मुलांना म्हणतो,''मुलांनो, मी अनेक यज्ञ केले. त्यासाठी व्रतस्थ राहणे भाग पडले. शुक्राचार्यांच्या शापामुळेही मला उपभोगाची तृप्ती लाभली नाही. तुम्ही माझे वार्धक्य घ्या आणि मला तारुण्य द्या.'' मुलांपैकी पुरूने ययातीची ही विनंती मान्य करून वार्धक्य स्वीकारले. पित्याला तारुण्य दिले. ययातीने देवयानी आणि शर्मिष्ठा यांच्याशी पुन्हा नव्या उत्साहाने रतिक्रीडेचा आनंद लुटला. **एकहजार वर्षे गेल्यावर त्याने मुलाला तारुण्य परत दिले आणि राज्यावर बसवले.** स्वत: वनात राहून तपश्चर्या करून स्वर्गात प्रवेश मिळवला. आपल्या पुण्याचा गर्व झाल्याने तो इतरांना तुच्छ लेखू लागला. त्यामुळे त्याचे पुण्य संपले आणि इंद्राने त्याला स्वर्गातून खाली ढकलून दिले. ह्या खाली पडणाऱ्या ययातीला अष्टावक्रांनी थांबवले आणि त्याची चौकशी करून, त्याच्याशी तत्त्वचर्चा करून त्याचे पुण्य त्याला पुन्हा मिळवून दिले. ययाती परत स्वर्गाला गेला. ही ययातीची कथा.

यातील एक हजार वर्षे वगैरे तपशील खांडेकरांनी गाळला आहे. ययाती पुरूने तारुण्य दिल्यावर, स्वेच्छेने ते त्याला परत देऊन वानप्रस्थ आश्रम स्वीकारतो असे दाखवले आहे.

ययातीला ब्राह्मणकन्या देवयानी पत्नी म्हणून कशी मिळाली हे सांगण्यासाठी कचदेवयानीचे कथानक येते.

असुर राजकन्या शर्मिष्ठा ही दासी म्हणून देवयानीबरोबर येते आणि ययातीचे

> खांडेकरांना भोगाचीही विफलता दाखवायची आहे तशीच वैराग्याचीही विफलता दाखवायची आहे.

मन जिंकते; स्वत: पुढाकार घेऊन राजाला पुत्रदानाची गळ घालते.

देवयानीला दोन मुले होतात; शर्मिष्ठेला तीन. तेव्हा देवयानी तिला विचारते,''असे कसे झाले? मला दोन मुले झाली. तेवढ्याच अवधीत तुला तीन कशी झाली?''

भोगातून तृप्ती मिळू शकेल असा ययातीचा दावा नाही. पण आपण पुरेसा भोग घेऊ शकलो नाही अशी रुखरुख त्याच्या मनात आहे. ती रुखरुख राहिली तर पुढे वैराग्यच अशक्य ठरेल म्हणून त्याला तारुण्य हवे आहे. पुन्हा तारुण्य मिळाल्यावर तो भोग घेतोच; परंतु राजा म्हणूनही आपली कर्तव्ये पूर्ण करतो. प्रजापालन, यज्ञ, दान यथाशक्ती करतो. कर्म, अर्थ, काम यांच्या सर्व कक्षा भोगात येतात. धर्माने परलोकीच्या भोगाची व्यवस्था होते.

महाभारतातील ही कथा रामायण, भागवत, पद्मपुराणात येताना काही बदलासह येते. महाभारतात ययातीला अकाली वार्धक्य येण्याचा शाप दाखवलेला नाही. तो पुराणात येतो. ययाती हा भोगलंपट असतो आणि भोगाने भोगेच्छा वाढते हा मुद्दा विशद करण्यासाठी ययातीचा पूर्वार्ध वापरला जातो. ययातीला अकाली वार्धक्य येण्यासाठी मग द्रोणाचार्यांच्या शापाची कल्पना कथानकात येते. पुरुचे तारुण्य घेऊन कमीत कमी वेळात जास्तीत जास्त भोग घेण्याची ययातीची मानसिकता त्याला आणखी भोगलंपट बनवते हा या कथेच्या मग उत्तरार्ध होतो. हा भोगलंपट, संयमशून्य ययाती खांडेकरांना आजच्या भोगवादी माणसाचा प्रतिनिधी म्हणून उभा करायचा आहे.

कुरुंदकर (मिस्किलपणे) म्हणतात :''करायचे काय तुम्हाला तरुण होऊन असे देवयानी व शर्मिष्ठा यापैकी कोणीही म्हणत नाही. या दोघींना अजून खूप भोग हवा आहे आणि त्यासाठी त्यांना पतीही तरुण हवा आहे. त्यासाठी एखाद्या मुलाला म्हातारा करून टाकायचीही त्यांची तयारी आहे.''

भाऊसाहेब खांडेकरांनी शर्मिष्ठेला निरिच्छ, उदार, निरपराध, उदात्त प्रेमिका म्हणून पेश करून सगळेच प्रश्न सोपे करून दाखवले आहेत असाही कुरुंदकरांचा आक्षेप आहे.

ययातीला भोगलंपटतेचा प्रतिनिधी म्हणून पेश करून भोग विरुद्ध संयम अशी मांडणी करण्यात खांडेकरांना स्वारस्य आहे.

त्यांना भोगाचीही विफलता दाखवायची आहे तशीच वैराग्याचीही विफलता

दाखवायची आहे.

> खांडेकरांची कथानकनिष्ठ दृष्टी कथानकाचा प्रत्येक दुवा सुसंगत करून दाखवण्यावर केंद्रित झालेली आहे

वैराग्याची विफलता हा खांडेकरांच्या विचारपद्धतीतला सगळ्यात दुबळा दुवा आहे असे कुरुंदकरांना वाटते. का?

भोग विरुद्ध संयम अशी मांडणी आपली नाही. भोग विरुद्ध वैराग्य अशी आहे.

भोगाने तृप्ती होत नाही, भोगाने वासना वाढतात. संयमाने तरी तृप्ती होते का? संयमाने वासना शमतात का? संयमाने वासना मर्यादित होत असतील; पण त्यामुळे मोक्ष मिळतोच असे नाही. मोक्ष हा वैराग्याने होतो. वैराग्याची पायरी म्हणून संयम-अशी मांडणी कुरुंदकर करतात. खांडेकर मात्र संयम विरुद्ध भोग एवढाच संघर्ष गृहीत धरून ययातीच्या कथानकाची फेरमांडणी करतात. कथानकाला संभवनीयतेच्या पातळीवर आणण्यासाठी ते पुराणकथेतील व्यक्तींना सोयीनुसार वर्तमानकालाच्या संदर्भात मानवी पातळीवर आणून ठेवून पाहत आहेत तेही कुरुंदकरांना खटकते. पुराणकथा विकृत होतात; पुराणकथेचा उपयोग रंजन, बोध कला यांच्यासाठी केला तरी त्या व्यक्ती मानवी होतात वा संभवनीय होतात हे फार सीमित अर्थाने! एरव्ही हे पुराणकथेचे विंडबनच ठरते. खांडेकरांची कथानकनिष्ठ दृष्टी कथानकाचा प्रत्येक दुवा सुसंगत करून दाखवण्यावर केंद्रित झालेली आहे; परंतु या प्रयत्नात ते कथानक असंभवनीय होऊन जाते असा कुरुंदकरांचा आक्षेप आहे.

शर्मिष्ठाच्या संदर्भात खांडेकरांनी केलेले बदल हे खांडेकरांच्या कथानकनिष्ठ मानसिकतेचे विश्लेषण करण्यासाठी कुरुंदकर वापरतात. कादंबरीत ते शर्मिष्ठेला आदर्श प्रेयसी दाखवतात; ती मनोमन ययातीवर प्रेम करते; त्याच्या प्रतिमेची पूजा करते. त्याला ऋषीच समजते आणि हा ऋषिवेष धारण करणारा ययातीच एके रात्री 'तुझ्याकडे ययाती येईल' असा आशीर्वाद शर्मिष्ठेला देतो. ययातीला ऋषिवेशात आणण्यासाठी खांडेकरांनी देवयानीच्या मनात ययाती ऋषिवेशात कसा दिसेल असा विचार आणून 'प्रश्न' सोडवला आहे. आता ययाती शर्मिष्ठेकडे येणार तो कसा? त्यासाठी राजवाडा ते अशोकवन भुयार दाखवणे भाग पडले. येथे भुयार आहे हे ययातीला कधी कळते? कसे? आता ययातीने अशोकवनात का यावे? त्यासाठी त्याची मुकुलिका ही भोगदासी ययातीला मुली पुरवत असते, आणि ययाती तिच्या पाशात असताना भुयारी मार्गाने अमात्य धावत येतात तेव्हा ययातीला ह्या भुयाराची कल्पना येते. या सर्वाचा उद्देश एकच हे

भुयार शर्मिष्ठेसाठी वापरायचे आहे म्हणून खांडेकर कथानकात आणतात. गरोदर राहिलेल्या शर्मिष्ठेला मूल झाल्यावर ययातीवर तिचे वर्चस्व राहील हे लक्षात येताच देवयानी तिला पकडते; ययाती तिला गुप्तपणे सोडवून दूरदेशी पाठवतो आणि तेथून शर्मिष्ठा १८ वर्षांनी परत येते.

''खांडेकरांना ययाती हा लहानपणापासून विकसित करायचा आहे; त्यासाठी त्याचा लंपटपणाही कसा वाढत गेला हेही त्यांना दाखवायचे आहे.

पुरू तेव्हा अठरा वर्षाचा तरुण झालेला असतो. पुरू राजधानीत असल्याचे कळल्यामुळे त्याला शोधायला, भेटायला शर्मिष्ठा येते असे खांडेकर दाखवतात.

आता पुरू राजधानीत का येतो? त्यासाठी आणखी एक कथा. युद्धात हरलेल्या शत्रूच्या तावडीत सापडलेल्या यदूला सोडवण्याची कामगिरी बजावण्यासाठी. आणि ययातीचे वार्धक्य घेऊन त्याला तारुण्य देण्यासाठी पुरू हवाच म्हणून.. पुरूला तारुण्य परत देताना ययातीला मृत्यू येईल असा शाप द्रोणाचार्य देतात; हा मृत्यू टाळण्यासाठी संजीवनी मंत्र जाणणाऱ्या कच देवाला कथेत आणणे आणि तो शाप निष्प्रभ करणे हे स्वाभाविकच ठरते. अशा प्रकारे संयमाचा विजय दाखवणे ही कथानकाची सांधेजोड खांडेकरांना करावी लागली आहे.

'संयम विरोधी भोग' अशी बोधवादी मांडणी करण्यासाठी आपण कथानक रचतोय ही खांडेकरांची समजूत आहे; परंतु प्रत्यक्षात कथानकाची रचना वेगळ्याच मूल्यांच्या आधारे होत आहे, आणि ते मूल्य रंजनवादाचे आहे असे कुरुंदकरांचे प्रतिपादन आहे.

शापाने वार्धक्य, वार्धक्याची अदलाबदल, संजीवनी सिद्धीने मृत्यू टाळणे या सगळ्या बाबी असंभाव्य राहतातच; तर मग उरलेले सगळे संभवनीय कशाकरता करायचे असा मुद्दा कुरुंदकर उपस्थित करतात. त्याचे उत्तर देताना ते म्हणतात: ''खांडेकरांना ययाती हा लहानपणापासून विकसित करायचा आहे; त्यासाठी त्याचा लंपटपणाही कसा वाढत गेला हेही त्यांना दाखवायचे आहे. नहुषाच्या लंपटपणात ययातीच्या लंपटपणाचा उगम असल्याचे खांडेकर दाखवतात.''

'ययाती'ला एवढी लोकप्रियता का लाभली याची मीमांसा करताना प्रा. कुरुंदकर काही कारणे स्पष्ट करतात.

१. पुराणाचा प्रतीक म्हणून वापर. प्रतीकाचा अंगभूत गुण म्हणजे ढोबळपणा, स्थूलपणा. प्रतीकाचा स्वीकार म्हणजे ढोबळपणाचा स्वीकार. येथे ययाती हा भोगलंपटतेचे प्रतीक झाला की त्याने पुराणातील ययातीप्रमाणे वागायलाच हवे असे नाही; तसेच खऱ्या भोगलंपट माणसाप्रमाणे वागण्याचीही गरज उरत नाही.

वास्तवता, रेखीव कथानक, संभवनीयता यांची पुराणकथेत अपेक्षा नसते; प्रतीककथेला त्याची गरज नसते.

२. भोग विरुद्ध संयम हा मुद्दा ययातीमुळे सिद्ध होतो का?...कथा कधी मुद्दे सिद्ध करत नसतात. एखाद्या कथेचे तात्पर्य कथेमुळे सिद्ध होत नाही. ते पूर्वसिद्धच गृहीत धरायचे असते.

खांडेकरांची ही सामाजिक कादंबरी लोकप्रिय ठरली कारण तिच्यात स्वप्नरंजन आणि कल्पकता यांचा समन्वय होता.

३. खांडेकरांचा वाचक हा प्रौढवाचक होता. शैलीतील कल्पकता, कोट्या, सुभाषिते, ध्येयवाद आणि स्वप्नरंजन या खांडेकरांच्या गुणांवर तो भाळला होता. कथानक, स्वभाव रेखन आणि स्वाभाविक संवाद या बाजूंनी खांडेकरांची सामाजिक कादंबरी डावी असूनही ती लोकप्रिय ठरली कारण तिच्या स्वप्नरंजन आणि कल्पकता यांचा समन्वय होता. उदात्त ध्येयवादाचा आभास होता. पौराणिक कादंबरीत या सर्व बाबी गुणरूप झाल्या. पौराणिक कथेत स्वाभाविकता आणि वास्तववाद हा दोषरूप ठरून कल्पनाविलासालाच अधिक प्राधान्य मिळते. असंभवनीय कथानक पौराणिकामुळे रमणीय झाले. ढोबळ स्वभावरेखन, ढोबळ मांडणी प्रतीकांमुळे गुणरूप झाली. रूपके धुंडाळण्याच्या खांडेकरांच्या प्रकृतीधर्माला उचित असा घाट या पौराणिक कथेमध्ये सापडला. टीकाकारांनी खांडेकरांची कोणतीच कादंबरी कलात्मक मानली नाही; त्यामुळे ययाती कलात्मक नाही या तक्रारीतही काही अर्थ नाही.

४. 'ययाती' एक तात्त्विक प्रश्न उभा करते. स्वप्नात वाढते आणि विराम पावते. ती रंजक असते, वाचनीय असते, लोकप्रिय होते. ती कधी गंभीर होत नाही, अस्वस्थ करीत नाही. कारण ती मुळी खरी नसतेच. ययाती हा स्वप्नाळू आहे. शर्मिष्ठेच्या स्वप्नरंजनाला ययातीचे दुसरे स्वप्नरंजन टेकू देते आणि कचदेवाचा उदात्तपणा त्याला आणखी आकर्षक बनवतो. यामुळे ही कादंबरी सतत आकर्षक आणि सुखद होत राहते.

५. साठोत्तरी कालात नवकाव्य, नवकथा, नवटीका यांचा प्रभाव असतानाही ययातीला सर्वात जास्त खप मिळू शकतो याचा अर्थ या कादंबरीचे रंजनाचे सामर्थ्य मान्य करायलाच हवे. खांडेकरांचे दोष टीकाकारांना दिसत होते; पण त्यांच्या लोकप्रियतेचे कारण त्यांना समजत नव्हते. लोकप्रियता हे कलात्मक नव्हे; पण निदान त्याचे उपभोग मूल्य, प्रचारमूल्य व रंजनमूल्य तर मानायला हवे.

खांडेकरांचा ययाती हा विसाव्या शतकातील भोगलंपट माणसाचा प्रतिनिधी आहे... ही भोगलंपट माणसाची व्यक्तिरेखा नव्हे. म्हणून हा ययाती पुरेसा भोगलंपट

काम आणि अर्थ हे महान प्रेरक पुरुषार्थ आहेत. पण त्यांना बेलगाम सुटू देता कामा नये. धर्माच्या हातात त्यांचे लगाम असायला हवेत.

वाटतच नाही असे म्हणावयाचे नसते... पौराणिक वातावरण हे कल्पनारम्य असते, तेथे वास्तववाद पाहावयाचा नसतो,

अलंकारिक, कल्पनाविलासप्रधान शैली येथे गुणरूप होते; कथानकात बदल करण्याची येथे पूर्ण मुभा असते. वैराग्य आणि त्याग ही पेलणारी मूल्ये नाहीत हे दाखवण्यासाठी एखादा यती आला की पुरे! त्यासाठी स्वभावरेखनाची गरज नाही... महाभारतातील ययातीच्या कथेचे आकलन हा त्यांचा हेतूच नाही. त्या पुराणकथेतील गूढ, आकलन करणे वा उकलून दाखवणे, हा त्यांचा हेतू नाही. त्यांना फक्त एक प्रतीक हवे आहे; आणि ययाती ते काम करतो. ययाती ही पौराणिक कादंबरी नाही, ती प्रतीकात्मक कादंबरी आहे. एरव्ही खांडेकरांची रूपककथा दोनचार पानी असते; ती येथे चारशे पानांची रूपककथा आहे. एवढेच!

तिचा संदेश काय आहे?

न जातु काम: कामनामुपभोगेन शाम्यति
हविषा कृष्ण मर्त्मेव भूय एवाभिवर्धते

कामेच्छा ही अधिकाधिक उपभोगाने शांत होत नाही
यज्ञातील अग्नी हविर्द्रव्यामुळे जसा अधिकच भडकतो, तसेच कामेच्छेचे आहे.

काम आणि अर्थ हे महान प्रेरक पुरुषार्थ आहेत. पण त्यांना बेलगाम सुटू देता कामा नये. धर्माच्या हातात त्यांचे लगाम असायला हवेत.

* * *

ययाती : पुराणकथा नव्हे, सामाजिक कथा

ययाती थोड्याशा तटस्थपणे आपली बालपणापासून तो वानप्रस्थाश्रमापर्यंतची कहाणी सांगत आहे; परिपक्व मनाच्या अवस्थेत आयुष्यातील घटनांचा जाणीवपूर्वक अर्थ शोधत तो ही कहाणी... सांगत आहे. देवयानी आणि शर्मिष्ठा ही पात्रेही काही निवेदन करतात...

आत्मनिवेदनाच्या रूपाने कथा सांगितली गेल्याने तत्कालीन लोकजीवनाचे उठावदार इतिहाससंमत वर्णन करण्याची गरज बरीचशी टाळणे लेखकाला शक्य झालेले आहे. त्यामुळे ही कादंबरी पौराणिक का मानायची, सामाजिक का नाही मानायची असा प्रश्न अनेक टीकाकारांनी उपस्थित केला आहे.

ययाती या पुरुवंशीय सम्राटाची ही कथा असली तरी ती एका सम्राटाची कथा न होता, एक कौटुंबिक कथा झाली आहे. भोगाच्या अतिरेकी आहारी गेलेल्या माणसाची ही कथा आहे. तो सम्राट असल्याने त्याच्या एखाद्या कृतीचा परिणाम संपूर्ण राज्यावर होणार आहे, असे या कथेत कुठे दाखवले गेलेले नाही. देव-दानव वैर, कच आणि शुक्राचार्य यांच्या वैयक्तिक सिद्धीचे महत्त्व यांचा प्रभाव ययातीच्या राज्यकारभारावर पडत नाही, भोगलंपट व्यक्ती म्हणूनच त्याचे चित्रण येथे होते. दासदासी, अमात्य, मंत्री, रथ, भुयारे, महाल असे उल्लेख सोडले तर एक मध्यमवर्गीय कुटुंबच या कथेतून समोर येते. आईने स्वहस्ते मांस शिजवून आग्रहाने खाऊ घालणे, तुझ्या दोन हाताचे चार हात करायला हवेत असे सुचवणे हे सर्व मध्यमवर्गीय कुटुंबाचेच चित्र वाटते.

कामवासना, प्रेमभावना आणि भक्तिभावना ही एकाच वासनेची क्रमाक्रमाने उन्नत, उदात्त होत जाणारी रूपे आहेत. हे खांडेकरांना दाखवायचे आहे.

कामवासना, प्रेमभावना आणि भक्तिभावना ही एकाच वासनेची क्रमाक्रमाने उन्नत, उदात्त होत जाणारी रूपे आहेत. हे खांडेकरांना दाखवायचे आहे. कच या सर्व भूमिकांतून उन्नत होत जातो; शर्मिष्ठेला हे थोड्या कष्टाने जमते; देवयानीला त्यासाठी अधिक कष्ट करावे लागतात. ययातीच्या बाबतीत हा प्रवास सर्वात अधिक कसोटी पाहणारा ठरतो. वासना नैसर्गिक आहे, भोगेच्छा प्रेरक शक्ती आहे; पण संयम आणि त्याग या मानवी सांस्कृतिक सिद्धी त्यापेक्षा विशाल आहेत. ययातीची कामवासना कामभावनेपर्यंत चढते; पण प्रीतिभावनेचे समाधान व तृप्ती त्याला कधीच लाभत नाही. कारण ययातीच्या प्रीतिभावनेला अतृप्तीचा कठोर शाप मिळालेला असतो.

(तशात खांडेकरांना समागमाचे, रतिक्रीडेचे बेभान उन्मत्त चित्रण करणे जमत नाही; त्यामुळे ययातीच्या वासनेचे प्रक्षुब्ध आवेगही वाचकापर्यंत पोचत नाहीत.)

नाट्यस्पर्धा, पुरस्कार, त्यांचे विभाजन, पत्रव्यवहार वगैरे या कादंबरीतले तपशील तिच्या पौराणिकतेला छेद देऊन तिला सद्य:कालीन संदर्भ देतात.

खांडेकरांचे चिंतन फारसे मौलिक नाही. पण त्या चिंतनामागे जाणवणारे व्यक्तित्व अत्यंत प्रामाणिक, भावनाप्रधान आणि समाजाबद्दल अंतरी कळवळा असणारे आहे.

- डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर (देशी वाण वरून)

पृष्ठे : ४३२ ● किंमत : २००रु. ● सभासदांना : १५०रु. ● पोस्टेज : २०रु.

स्वाती - शैलेश लोढा   अनु. अंजनी नरवणे

चला!उठा!कामाला लागा!

तुम्हांला खरे सुख हवेय?
खरे यश हवेय?

स्वाती लोढा आणि शैलेश लोढा हे दांपत्य आपल्या स्वाश या संस्थेतर्फे व्यक्तिमत्त्व विकास आणि व्यवस्थापन कौशल्यविकास या विषयांवर प्रशिक्षण वर्ग आणि कार्यशाळा चालवते. पन्नास तासांच्या या कार्यशाळेमध्ये आणि प्रशिक्षण वर्गांमध्ये विनोद आणि सरळ पण प्रभावशाली मार्गदर्शन यांचा आकर्षक मेळ घातला जातो. शैलेश लोढा हे विनोदी नटाप्रमाणे व्यासपीठावर हास्याची कारंजी फुलवत व्यवस्थापनाचे कानमंत्र रंजकपणे पेश करतात; त्यामुळे त्यांच्या कार्यक्रमाला एकदा आलेली व्यक्ती ही त्यांच्या कायम प्रेमात पडते. त्यामुळे त्यांच्या चाहत्यांकडून न्यूयॉर्क, ह्यूस्टन, शिकागो यासारख्या अमेरिकन शहरांमध्येही त्यांचे प्रशिक्षणवर्ग आयोजित केले जातात. भारतातही त्यांनी शेकडो कार्यशाळा घेतल्या आहेत. त्यांच्या पत्नी स्वाती लोढा (माहेरचे नाव स्वाती महेंद्र भंडारी) यांना लेखनाची आवड शाळकरी वयापासूनच आहे. मित्रमैत्रिणींबराबेर गप्पा मारण्याचीही हौस. कोणाच्याही अडीअडचणीत मदत करण्याची, धीर देण्याची प्रांजल इच्छा, अवतीभवती आशावादी, उत्साही, चैतन्यशाली वातावरण निर्माण करण्याची उपजत क्षमता... त्यामुळे लोकांचा उत्साह वाढवायचेच काम व्रतस्थवृत्तीने करायचे हे एमबीए करतानाही स्पष्ट ध्येय डोळ्यापुढे होते. लग्नानंतर शैलशचे विनोदाच्या अंगाने जाणारे खुमासदार सादरीकरण आणि त्याला वैचारिक आशय देणारे स्वातीचे उत्साहवर्धक व्यवस्थापकीय तंत्रमंत्राचे सुसूत्र संहितालेखन यांची सांगड घालून या दांपत्याने व्यक्तिमत्त्वविकासाचे आणि व्यवस्थापकीय प्रशिक्षणाचे केंद्र सुरू केले. स्वाश (स्किल्स, विट, ॲटिट्युड यांची जडणघडण) ही संस्था स्थापन केली. वैयक्तिक उन्नतीसाठी दैनंदिन व्यवस्थापन या विषयावरील कार्यशाळेपासून आरंभ झाला; आणि त्याला उत्तम प्रतिसाद लाभला. जागोजाग कार्यक्रम होऊ

लागले. अभ्यासक्रम तयार केले. स्वत:चा स्वत:शीच सतत नवनव्या कल्पनांचा शोध घेण्याचा कहरच झालेला आहे या भावनेने या दांपत्याने नावीन्याचा वसा घेतला आणि आपल्या या उपक्रमाद्वारे हजारो तरुणतरुणींना आशादायी, उत्साही जीवनसाफल्याचा मार्ग प्रशस्त करून दिला.

> या दांपत्याने नावीन्याचा वसा घेतला आणि आपल्या या उपक्रमाद्वारे हजारो तरुणतरुणींना आशादायी, उत्साही जीवनसाफल्याचा मार्ग प्रशस्त करून दिला.

या दांपत्याने लिहिलेले 'कम ऑन, गेट सेट गो' हे पुस्तक चांगले गाजले. दीपक चोप्रा, शिव खेरा यांच्या व्यवस्थापन कौशल्याच्या 'गोष्टी सांगेन युवतीच्या चार' या शैलीतल्या पुस्तकांच्या रांगेत 'कम ऑन' ला स्थान मिळाले. ते मराठी वाचकांना उपलब्ध करून द्यायला हवे असे मेहता पब्लिशिंग हाऊसने मनावर घेतले; आणि ख्यातनाम कथाकार अंजनी नरवणे यांच्याकडे त्याच्या अनुवादाची जबाबदारी सोपवली. ललित लेखनाची प्रतिभा असलेल्या व्यक्तीने एखादा अनुवाद केला म्हणजे तो किती रससिद्ध आणि शैलीदार होतो याचा एक उत्तम नमुना म्हणून 'चला!उठा!कामाला लागा' या अनुवादित पुस्तकाकडे बोट दाखवता येईल. अनेक सूत्रात्मक वाक्ये, विधाने, मूळ इंग्रजी पुस्तकात येतात; ती सर्व अत्यंत चपखलपणे मराठीत आणण्यात अंजनी नरवणे यांचे भाषाप्रभुत्व लक्षात येते.

हे पुस्तक तुम्ही वाचलंत,
*तर तुम्ही स्वत:ला **समजू** शकाल.*
ह्या पुस्तकावर तुम्ही विचार केलात
*तर तुम्ही स्वत:ला **आवडू** लागाल*
हे पुस्तक तुम्ही मनात ठसवलंत
*तर तुम्ही स्वत:वर **प्रेम करू** लागाल*
स्वत:ला बघण्यासाठी, तुमच्यासाठी हा आरसा-
*मूल्यमापन करा, तुम्ही खरोखर **यशस्वी** आहात?*
अयशस्वी लोक कसा विचार करतात, वाचा
म्हणजे तुम्ही तसा विचार करणार नाही.
अयशस्वी लोक कसे असतात, वाचा
म्हणजे तुम्ही तसे होणार नाही.
चला तर, उठा! कामाला लाग....!

असे आरंभीच स्वत:कडे आणि अवतीभवती लोकांकडे बघायला सांगून या पुस्तकाचा आरंभ होतो. इतर लोक ज्या चुका करतात, त्या टाळायच्या. स्वत:ला

स्वतःचा आत्मविश्वास, आत्मप्रतिमा, स्वतःबद्दलचे प्रेम यांचा प्रत्यय आला की आपल्या कार्यक्षेत्रात आपली वाटचाल ही यशाकडे जाणारीच असणार याची खात्री बाळगा.

समजून घ्यायचे. स्वत:चा आत्मविश्वास, आत्मप्रतिमा, स्वत:बद्दलचे प्रेम यांचा प्रत्यय आला की आपल्या कार्यक्षेत्रात आपली वाटचाल ही यशाकडे जाणारीच असणार याची खात्री बाळगा. असे आरंभीच हे पुस्तक आश्वासन देते. हे पुस्तक तीन प्रकारांनी वाचकांना मदत करू शकेल असे पहिल्याच प्रकरणात आश्वासन दिले आहे.

१. हे पुस्तक वाचकांना आरशासारखे आपले स्वत:चे प्रतिबिंब दाखवील. व्यक्तिमत्त्वातले गुणदोष जे यात प्रकट करण्यात आले आहेत, ते आपल्यातही आहेत याची जाणीव तुम्हांला होईल या अर्थाने हा 'आरसा' ठरेल.

२. हे पुस्तक वाचकांना मेन्यूकार्ड म्हणून उपयुक्त ठरेल. मेन्यूकार्डवरून आपण पदार्थांची निवड करतो व ऑर्डर देतो. या मेन्यूकार्डवरून त्यातील गुणदोषांशी जुळणारे आपल्यात गुणदोष ओळखता येतील आणि आपण खरे कसे आहोत हे वाचकांना कळेल. आणि यशाच्या तुमच्या व्याख्येत बसण्यासाठी जी गुणवैशिष्ट्ये आपल्यात हवीत- त्यांची नोंद करता येईल.

३. हे पुस्तक तुमच्या मनाला पडलेली छिद्रे शोधण्यासाठी तुम्हाला उद्युक्त करील. ही छिद्रे दूर करण्यासाठी काय करावे ते सूचित करील.

या पुस्तकात लोकांचे वर्गीकरण चार प्रकारात केले आहे.

१.काहीच न शिकणारे अयशस्वी लोक. (काहीच अपेक्षा नसणारे, आपल्या हातून काहीच होऊ शकणार नाही असं मानणारे, स्वयंकेंद्रित, प्रश्नच नीट न समजलेले)

२. कृत्रिमपणे वागणारे अयशस्वी लोक (केलं-न केलं तरी फरक पडणार नाही, आदर्श असं काही नसतंच, असं म्हणून चमत्काराची वाट बघणारे, प्रश्न टाळणारे लोक)

३. दिखाऊ यशस्वी (स्वत:लाच आदर्श मानणारे, आपण जे काही करतो ते चमत्कारासारखे ग्रेट मानणारे, कुठलंही काम कधीही करू अशा वल्गना करणारे, प्रश्न माहीत असून टाळणारे)

४. खरे यशस्वी लोक (चमत्काराने नाही, आपल्या श्रमाने काम होते व आपण ते करून दाखवायचे आहे असे मानणारे, सर्व प्रश्नांची उत्तरे शोधणारे, स्वत:च आदर्श असलेले लोक)

आपण यापैकी कुठल्या वर्गात मोडतो ते प्रांजलपणे स्वत:शी निश्चित केले तर आपले स्वभावदोष, नकारात्मक वृत्ती यापासून सुटका करून घेता येते. मात्र

तीही पद्धतशीर परिश्रमानंतर असे ह्या पुस्तकाचे प्रतिपादन आहे. हे पुस्तक म्हणजे पळवाट नाही. काहीतरी चमत्कार होऊन तुमचे कल्याण होईल अशी खोटी आशा दाखवून दिशाभूल करणारे हे लेखन नाही.

हे पुस्तक म्हणजे पळवाट नाही. काहीतरी चमत्कार होऊन तुमचे कल्याण होईल अशी खोटी आशा दाखवून दिशाभूल करणारे हे लेखन नाही.

अयशस्वी होण्याच्या लायकीचे लोक हे मनानं लाकडी पुतळ्यासारखे असतात; दिखाऊ यशस्वी लोक हे गर्विष्ठ, घमेंडखोर, आणि ढोंगी असतात.

अयशस्वी माणसं अनेकदा तक्रारखोर असतात, कामं वेळेवर करण्याऐवजी चालढकल करणारी असतात, सारखी इतरांचे दोष दाखवून टीक करणारी असतात, उगाच तुलना करीत बसतात, कोणावरही अगदी स्वत:वरही विश्वास न ठेवणारी असतात, स्वत:ची फुशारकी मिरवण्यात, बढाया मारण्यात पटाईत असतात, स्वत:ची कीव करणारी असतात, एकाच जागी अडकून बसलेली असतात, घाईनं मतं बनवणारी असतात, जिज्ञासा न बाळगता अर्धवट ज्ञानावर विसंबून राहतात, इतरांचा निवाडा करीत बसतात. इतरांचा निवाडा करायचा हक्क आपल्याला नाही हे ती विसरतात; आपली मतं असणं आणि इतरांचा निवाडा करणं या दोन भिन्न गोष्टी होत ह्याचे त्यांना भान नसते. अयशस्वी लोकांचे हे स्वभाव विशेष असतात आणि ते दूर करण्याची गरज असते. ते दूर केले, नकारात्मक भूमिकेला फाटा देऊन सकारात्मक भूमिका घेतली; तसे स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणले तर यशाची कवाडे आपल्यासाठी खुली होतात.

'सोप्या भाषेत यश' या प्रकरणात यश म्हणजे नेमकं काय असतं, काय नसतं हे स्पष्ट केलं आहे.

आपल्या सगळ्यांना सुखी आणि यशस्वी व्हायचं असं यश मिळवण्यास आपण लायक आहोत असं आपण मानत असतो. खूप संपत्ती असणे, खूप प्रसिद्धी मिळणे म्हणजे यश असे बहुतेक लोकांना वाटते. परंतु असे मानण्यात अनेकदा आपण स्वत:ला फसवत असतो हे तुमच्या लक्षात येते का? अफाट संपत्ती असणे म्हणजे यशस्वी होणे नव्हे. संपत्ती गैरमार्गाने मिळवणे म्हणजे यश नव्हे, सुख नव्हे. स्वत:च्या कष्टाने, बुद्धीने, ती मिळवणे म्हणजे खरे यश होय. अशा प्रामाणिक संपत्तीने सुख प्राप्त होते. प्रसिद्धीही वाईट गोष्टीने मिळणे यात कसले यश व सुख आलेय? ती चांगल्या कामामुळे मिळावी. प्रसिद्धी आणि यश यांचे गुणोत्तर सम नसते; यश हा मानसिकतेचा भाग असतो असे कोणीही

अफाट संपत्ती असणे म्हणजे यशस्वी होणे नव्हे. संपत्ती गैरमार्गाने मिळवणे म्हणजे यश नव्हे, सुख नव्हे. स्वतःच्या कष्टाने, बुद्धीने, ती मिळवणे म्हणजे खरे यश होय. अशा प्रामाणिक संपत्तीने सुख प्राप्त होते.

यशस्वी माणूस सांगेल; आणि यश हा नशिबाचा भाग असतो असे कुठलाही अपेशी पराभूत माणूस सांगेल.

यशाचे हे स्वरूप लक्षात घेऊन त्या खऱ्या अस्सल यशाच्या प्राप्तीसाठी काय करायला हवे याचे काही मंत्र 'बदल: सतत चालू राहणारा लढा' या प्रकरणात दिले आहेत. यशस्वी होण्यासाठी स्वत:ची मानसिकता बदलणे आणि आपल्या बुद्धीचा पूर्ण उपभोग करणे या दोन बाबींची गरज असते.

१. मी स्वत:ला सोडून इतर कोणालाही बदलू शकत नाही; मी स्वत: सोडून इतर कोणीही मला बदलू शकत नाही.

२. आयुष्य घालवण्यासाठी बदल आवश्यक नसतो. आयुष्य जगण्यासाठी बदल अत्यंत आवश्यक असतो.

बदल हा अटळ असतो. पण माणसाची उपजत प्रवृत्ती बदल टाळण्याची असते. परिस्थितीच्या रोखाने तो बदलतो; स्वत:च्या प्रेरणेने जेव्हा बदलतो तेव्हा त्या बदलाला खरा अर्थ प्राप्त होतो.

त्यासाठी खालील सूत्रे या पुस्तकात दिलेली आहेत. या सूत्रांद्वारे आपली वृत्ती

१. मी स्वत:ला मान देईन

२. मी स्वत:ला प्रेरणा देईन

३. मी स्वत:वर प्रेम करीन

मन हे नवनव्या कल्पना घुसळून बाहेर काढणारं यंत्र असतं. ते २४ तास चालू असतं. आपलं शरीर हे एक यंत्र आहे आणि आपलं मन त्याला चालवत असतं.

आपल्याला जे काही साध्य करायचे आहे ते आपल्या मार्गाचं अंतिम टोक समजून आपलं मन जेथपर्यंत जाऊ शकते, तिथपर्यंत आपण स्वत:ला नेलं पाहिजे.

सकारात्मक विचार आणि बुद्धीचा पूर्ण उपयोग बरोबर यश हे समीकरण लक्षात ठेवा.

बुद्धीचा पूर्ण उपयोग करण्यासाठी काय काय हवं?

१. आत्मविश्वास

२. कल्पकता

जे लोक स्वत: विचार करीत नाहीत ते इतरांच्या मागे जातात. जे लोक स्वत: विचार करतात ते नेतृत्त्व करतात.

यशासाठी त्या व्यक्तीत आपली काही गुण हवेत. या गुणांमुळे त्याचे वेगळेपण ठरते.

१. तीव्र आकांक्षा

२. अखंड चिकाटी

३. स्पष्ट कल्पनाशक्ती

४. संधीचा फायदा घेणे.

५. अखंड आनंदी, सकारात्मक असणे

६. कौतुक करण्याची कला अंगी असणे.

७. दुसऱ्याचं दु:ख समजून घेता येणे.

८. खंबीर आत्मविश्वास

९. स्वत:शी असणारी अतूट बांधिलकी. (बांधिलकी- तुमचा तुमच्याशी असलेला संबंध)

१०. विनोदबुद्धी- लोकांना हसू नका, लोकांबरोबर हसा.

११. प्रयत्नांना प्रोत्साहन द्या

१२. दुसऱ्याचा विचार करायला शिका

१३. सृजनशीलता विकसित करा.

१४. नक्कल करू नका; निर्मिती करा.

मन हे नवनव्या कल्पना घुसळून बाहेर काढणारं यंत्र असतं. ते २४ तास चालू असतं. आपलं शरीर हे एक यंत्र आहे आणि आपलं मन त्याला चालवत असतं.

लोढा दांपत्य हे स्वॅश पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट प्रा. लि. ही संस्था चालवते आणि तिच्यातर्फे प्रशिक्षण वर्ग व कार्यशाळा घेते. स्वॅश म्हणजे स्किल्स, विट, ॲटिट्युड आर शेप्ड् हियर (प्रावीण्य, चातुर्य, वृत्ती ही इथे आकार घेतात) या वाक्यातील शब्दांचे आरंभीचे अल्फाबेटस घेऊन बनलेला शब्द स्वॅश.

आयुष्यात कधीतरी आपण अशा टप्प्यावर येऊन ठेपतो की पुढे काय असा प्रश्न पडतो. काहीच मार्ग दिसत नाही. एकाच ठिकाणी आपण अडकून पडतो. अशा मन:स्थितीत हे पुस्तक आपल्याला मानसिक कोंडीतून बाहेर काढायला मदत करील; आपल्यातील चांगल्या गुणांना ते जाग आणून बळ देईल, आपल्यातील दोषांना ते बाजूला सारण्यास आपल्याला प्रेरणा देईल. त्यातून नवे काहीतरी सृजनशील काम करण्यास प्रवृत्त करील. संपत्ती आणि कीर्ती आणि अर्थातच खरे यश आपल्याला लाभावे अशी परिवर्तने स्वत:मध्ये घडवून आणण्यास मदत करील. योग्यवेळी मार्गदर्शक भेटणे हा आयुष्यातला एक टर्निंग पॉइंट ठरतो. हे पुस्तक म्हणजे तो टर्निंग पॉइंट असू शकेल.

पृष्ठे : १८४ ● किंमत : १२०रु. ● सभासदांना : ९०रु. ● पोस्टेज : २०रु.

साधंसुधं...

प्रदक्षिणा

प्रमोदिनी वडके-कवळे

पंधरा ऑगस्टची सुटी साधून सत्यनारायण घालण्याचा माझा दरवर्षीचा परिपाठ. ऑगस्ट आणि श्रावण ही इंग्रजी मराठी महिन्यांची युती माझ्या पथ्यावरच पडते. फक्त एकच अडचण असते. ''ते सामानबिमान आणायचं तू बघ बाबा.'' म्हणून दरवर्षीच हे हात झटकून मोकळे होतात आणि पावसाचा रागरंग बघून मला मंडईची वारी आखावी लागते. शिवाय केळीचे खुंट, नारळ वगैरे न झेपणाऱ्या वस्तूंसाठी बरोबर यावं म्हणून मुलांची मनधरणीही करावी लागते.

या वर्षी याच मोहिमेवर बाहेर पडून मी आणि माझी लेक तुळशीबागेत हिंडत होतो. नेहमीप्रमाणेच आमच्या नजरेच्या दिशा परस्परविरुद्ध होत्या.

''आई मी दोन मिनिटात आलेच.'' मी काही म्हणायच्या आत माझी लेक गर्दीत दिसेनाशी झाली. माझे डोळे तुळशीपत्रांच्या शोधात भिरभिरत होते. मी दुर्वा, फुलं, तुळशीपत्रांची खरेदी उरकत असताना तिने मला परत गाठलं. ''ही बघ मेंदी काढून आले हातावर.''

''एवढ्यात?'' मी आश्चर्याने विचारलं. तिने पुढे केलेल्या हातावरची नाजूक कोयरी बघून माझ्या डोळ्यातलं प्रश्नचिन्ह आणखी मोठं झालं.

''मग काय? अग या मेंदीचे तयार ब्लॉक्स असतात. दोन मिनिटात मेंदी.''

''किती नशीबवान आहात ग तुम्ही आताच्या मुली! मनात आणलं की लगेच तुम्हाला सगळं मिळतं. मेंदी सारखी साधी गोष्ट! पण आम्हाला तीसुद्धा किती प्रयत्नानं मिळवावी लागायचा...''

यापुढे मी काय बोलणार ते ओळखून लेकीने मला थांबवलं.. ''आई, आता तुझा तो पाच किलोमीटर लांबलचक पट्टा नको हां. आमच्या वेळी अस्सं आणि आमच्या वेळी तस्सं. अग काळ बदललाय आणि त्याचा फायदा तुम्हालासुद्धा मिळतोय. आता हेच बघ, पर्स उघडली की दहा मिनिटात तुझी सत्यनारायणाच्या पूजेची तयारी होतेय. शिवाय आज पूजेच्या तयारीसाठी मंडईत यायचं म्हणून तू संध्याकाळी जेवायला नुसतीच मुगाच्या डाळीची खिचडी करशील ते वेगळंच. तुझ्या आईला किंवा आजीला ही सूट होती का? सांग. त्या बिचाऱ्या एवढ्या माणसांचा सैंपाक उरकून शिवाय पूजेची तयारी करायच्या. आणि तीसुद्धा अगदी वाती वळण्यापासून. त्यांच्या मानाने तू सुखी नाहीस का?''

मर्मावर बोट ठेवणारं बोलून मला गप्प करण्यात माझी मुलं अगदी तरबेज आहेत. त्यामुळे मी तिच्या बोलण्यावर वाद वाढवला नाही.

तिने सांगितलेलं खरंच होतं. आईआजीच्या मानाने माझं आयुष्य बरंच सुखकर होतं. पण सुखकर तरी कसं म्हणावं? सत्यनारायण काय किंवा त्याची तयारी काय माझ्या वार्षिक वेळापत्रकातली एक उरकायची गोष्ट म्हणून मी ते करते. त्या दोघी सगळे सणवार किती तन्मयतेने आणि आनंदाने करायच्या. पुरणावरणाचा सैंपाक, सोवळ्याओवळ्याची शिस्त, पूजानैवेद्याचे उपचार... सगळं करताना त्या अगदी तन्मय होऊन जायच्या. माझ्यासारखा एक डोळा घड्याळाच्या काट्यावर ठेवावा लागायचा नाही त्यांना. पूजेची तयारी करताना त्यांना मिळणारा आनंद माझ्या वाट्याला का येत नसावा?

पण काही असलं तरी, पूजेच्या तयारीची जबाबदारी वेगळी आणि मेंदीचं सुख वेगळं!

नकळत माझ्या मनात मेंदीचा सोहळा रंगत राहिला.

मेंदीच्या पानाने त्वचेला लाल रंग चढतो हा शोध ज्या कुणी लावला असेल त्याच्या सौंदर्यदृष्टीला खरोखरच दाद द्यायला हवी. कारण मेंदीचा रंग केवळ रंग नसतो तर तो सोबत गंधही घेऊन येतो. आणि मनात एक अनोखी हुरहुर जागवतो. आळत्याचा रंग मेंदीसारखाच दिसला तरी तो सगळ्यांच्या हातावर सारख्याच प्रमाणात चढतो. मेंदीचं मात्र तसं नाही. प्रत्येक हातावरचा तिचा रंग वेगळा. मग त्या रंगण्याला प्रियच्या प्रेमाचं मोजमाप लावून चिडवायचं. त्या चिडवाचिडवीत गालावरही नकळत उतरणारा रक्तिमा..

आषाढात घनघोर पाऊस झाला की, सगळ्यांच्या अंगणाभोवतालची मेंदीची कुंपणं तजेलदार दिसायला लागायची. मेंदीच्या फांदीवर कोवळ्या पानांची तांबूस नक्षी उमटायला लागायची. आणि शाळेतून येताजाता आमचे मेंदी लावायचे बेत सुरू व्हायचे. फांदीफांदीवर विपुल प्रमाणात लगडलेली असली, पैसाही खर्च न करता मिळत असली, तरी अशी सहज जातायेता मेंदी लावण्याची पद्धतच नव्हती. त्यासाठी आषाढाची प्रतीक्षा करावी लागायची. अगदी एखाद्या समारंभासारखी आखणी करावी लागायची. मेंदी तोडून आणणे, सगळ्या साधना साहित्याची जमवाजमव करून ती वाटणे आणि हातावर थापणे या सगळ्याला एवढा वेळ लागायचा की त्यासाठी शनिवारची दुपारच मुक्रर करणं भाग असायचं. गेल्या वर्षी कुणाच्या कुंपणावरची मेंदी जास्त रंगली होती याबद्दलची अभ्यासपूर्ण चर्चा करून दुपारच्या निवान्त वेळी त्या कुंपणावर हल्ला

करायचा.. मेंदीची पुरेशी पानं ओरबाडून आणायची.. ती रंगावी म्हणून त्यात तऱ्हेतऱ्हेच्या चीजा घालायच्या. (त्यातल्या काही अभक्ष्य-अस्पृश्य असायच्या. त्या आणण्यासाठी धाकट्या बहिणीना मेंदीत पार्टनर करून घ्यायचं अमिष दाखवावं लागायचं.) ही सिद्धता झाल्यावर मुख्य अस्त्र मिळवायचं. मेंदी वाटण्यासाठी चांगलासा वरवंटा! मेंदीची पानं चिरडली गेली की अगदी बुळबुळीत होतात. शिवाय त्यांचा वासही लौकर जात नाही. म्हणून कोणतीही गृहिणी मेंदी वाटण्यासाठी घरातला पाटा वरवंटा द्यायला तयार व्हायची नाही. मोठासा दगड शोधून पाट्याला पर्याय मिळवता यायचा, पण वरवंट्याची प्रमुख भूमिका पार पाडायला मात्र कोणताही बदली नट चालायचा नाही. मग वरवंटा मिळवण्यासाठी कितीतरी खटपटी लटपटी कराव्या लागायच्या. 'तो अगदी स्वच्छ धुवून देऊ.' असं स्टॅम्पपेपरवर लिहून घेणं बाकी उरावं एवढ्या अटींना मान्यता द्यावी लागायची.

मेंदी बारीक वाटायचं काम तर अति किचकट. ते सगळ्यांना आळीपाळीनं करावं लागायचं. आणि खरं म्हणजे मेंदी वाटतावाटताच हात इतके रंगत जायचे की, एवढा आटापिटा करून वाटलेली मेंदी लावण्याची गरजच उरायची नाही.

पण तरीही आम्ही ती लावून घ्यायचोच. मेंदीच्या वाटलेल्या गोळ्याच्या वाटण्या हा इस्टेटीच्या वाटण्यांपेक्षा जबरदस्त प्रकार. आपापल्या वाटणीचा गोळा घेऊन घरी येताना आमच्या चेहऱ्यावर वाघाची शिकार मारून आलेल्या शिकाऱ्याचा विजयी भाव असायचा. रात्रीचं जेवणंखाणं झाल्याशिवाय मेंदी लावता यायचीच नाही. कारण ती दुसऱ्या कुणीतरी लावावी लागायची.. बहुधा आई किंवा आत्याच. मग त्यांचं मागचं आवरून होईपर्यंत आम्ही डोळ्यात झोप घेऊन थांबायचो. दोन्ही तळहातावर मेंदीचा काला थापून, मुठी घट्ट दाबून, त्यावर जुन्या फडक्याचा दादरा बांधला जायचा. रात्रीची वेळ. पावसाळ्याचे दिवस आणि दोन्ही हात बांधलेले अशा वेळी अत्यावश्यक नैसर्गिक कामांसाठी पुन: आई-आत्याची मदत मागावी लागायची आणि त्यावेळी त्यांचं कुरकुरणं ऐकून घेणं भाग असायचं. पण मेंदी रंगण्याच्या आनंदापुढे हे सगळे सोपस्कार सुसह्य असायचे.

मेंदीच्या नाटकाचा शेवटचा आणि महत्त्वाचा अंक दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर सुरू व्हायचा. कुणाची मेंदी जास्त रंगतेय या उत्सुकतेने रात्री नीटशी झोपही लागलेली नसायची. कधी एकदा हात धुवून टाकतेय आणि रंगलेली मेंदी दाखवायला शेजारच्या मैत्रिणीकडे

धावतेय असं झालेलं असायचं. हातावर खोबरेल तेलाचा थेंब टाकून ते खसाखसा चोळायचे आणि नाकापाशी न्यायचे. आषाढश्रावणाचा सुरेख हिरवा गंध श्वासांना तृप्त तृप्त करायचा. .....

मागच्या आठवणीत मी इतकी रमून गेले होते की, लेकीने हाक मारली तेव्हा माझ्या लक्षात आलं आपण तुळशीबागेतल्या गर्दीत आहोत. नकळत माझ्या हातांची ओंजळ नाकापाशी पोचली होती.

''काय झालं ग आई?'' तिने विचारलं.

''काही नाही.'' तिच्या हातावरच्या त्या इन्स्टंट मेंदीकडे बघत मी खुशीचं हसू हसले. माझ्या मनातला मेंदीचा रंग मनातच ठेवून!

माझ्या लेखी मेंदी हा एक आनंदसोहळा होता. तर माझ्या लेकीसाठी ती जाताजाता जमली म्हणून करायची गोष्ट होती. या दोन्हीमधे जेवढे अंतर होतं तेवढंच अंतर आमच्या दोघींच्या समाधानातही होतं. कारण माझ्या मनातली 'मेंदी रंगल्याचा आनंद मिळेल की नाही?' ची धाकधूक आणि तिच्या मनातली 'त्यात काय? रंगणारच.' ही खात्री त्या खात्रीमुळेच तिच्या आनंदाचं मोल कमी होत होतं का?

अनिश्चितता आणि खात्री हेच आनंदावर परिणाम करणारे प्रमुख घटक... ठरवून झालेल्या भेटीपेक्षा अवचित झालेली भेट जास्त सुखावते ती त्याचमुळे!

चंदा- माझी रत्नागिरीची मामेबहीण. एरवी तिचं पुण्याला येणं फार कमी होतं. पण आली की एखादा दिवस माझ्यासाठी राखून ठेवते ती. बहुधा रविवारच. त्या दिवशी ऑफिसची गडबड नसल्यामुळे माझ्याशी निवान्त गप्पा मारता येतात. .पण या वेळी गावाला परत जायची घाई होती म्हणून एका संध्याकाळी उशिराच माझ्याकडे आली. अधलामधला दिवस. ऑफिसमधे ऑडिट चालू असल्याने मला घरी यायला उशीर झाला होता. उशीर होणार याची कल्पना असल्याने सकाळीच चार पोळ्या जास्त करून ठेवल्या होत्या. त्यामुळे येतायेताच मी मनाशी हिशोब केला. . मुलांचा आवडता जॅम घरात आहे. जोडीला एखादी कोशिंबीर करावी आणि पटकन कुकर लावावा. की झालं! पण चंदा आल्यामुळे माझा हा हिशोब कोलमडला. सैपाक करत बसले असते तर तिच्याशी मनसोक्त गप्पा मारता आल्या नसत्या. मग मी आधीच्या गणिताला जराही धक्का न लावता त्यात तयार श्रीखंडाची भर घातली आणि पानं मांडली.

चंदाला गोड विशेषत: श्रीखंड फार प्रिय असल्यामुळे ती खूष होईल याची खात्री होतीच. त्याप्रमाणे पानात श्रीखंड बघितल्यावर तिचा

चेहरा खुलला. ''वा! आज काय विशेष?''

''छे ग. विशेष काही नाही. तू आलीस ना म्हणून.'' मी प्रामाणिकपणे तिला माझा हिशोब सांगून टाकला.

ती एकदम नॉस्टॅल्जिकच झाली. ''आत्ता किती सोयी झाल्यात ना! आपल्या लहानपणी.. तुला आठवतं? श्रीखंड ही किती दुर्मिळ गोष्ट होती! दसरा आणि पाडवा. . वर्षातून फक्त दोनच वेळा श्रीखंडपुरीचा बेत व्हायचा. ते पण आधी ठरवावं लागायचं. कारण गावात फक्त भाव्यांच्याच दुकानात चक्का मिळायचा आणि त्याची पण आधी ऑर्डर द्यावी लागायची. अगदी आदल्या दिवशी त्यांच्याकडे पुण्याहून चक्क्याचे डबे येणार. कधीकधी तो कमीच पडायचा मग ऑर्डर दिलेली असूनही हात हलवत घरी...त्यावेळी मग आयत्यावेळचं पक्वान्न म्हणजे सुधारस.''

''हो आठवतंय. आणि चक्का मिळाला तरी घरी आणल्यावर तो परातीत घालून हाताने चांगला फेटायचा.''

''अगदी हात देखेस्तोवर. मग त्यात साखर मिसळून ठेवायची. तेव्हा कुठे दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीखंड तयार व्हायचं.''

''हो बाई. मला आठवतं आपल्याला सगळ्यांना चक्का फेटायची हौस. पण आजी ओरडायची. कारण आपण ते ओशट हात इथेतिथे लावून बरीच भांडी खराब करायचो म्हणून मग आपण आजी चक्का फेटताना आशाळभूतपणे तिच्याभोवती बसून डाव चाटायला मिळण्याची वाट बघायचो.'' मी तयार श्रीखंडाच्या सुबक डब्याकडे पहात तिच्या सुरात सूर मिसळला.

''ए, पण काही म्हण, त्या डावाला चिकटलेल्या श्रीखंडाची चव काही वेगळीच नाही का? या श्रीखंडाला याची सर नाहीच यायची. आताच्या मुलांना मेलं पानात पंचपक्वान्नं वाढली तरी त्याची किंमत नसते.'' जुन्या आठवणी जागवणाऱ्या चंदाकडे बघताना मला जाणवलं तिच्या स्वरात आठवणींचा व्याकुळ हळवेपणा नाही त्याऐवजी एक तृप्ती आहे. आयुष्यात मिळालेल्या चांगल्या आस्वादाची तृप्ती. इतरांना न मिळालेलं असं काहीतरी आपल्याला मिळाल्याची तृप्ती.

तिच्या चेहऱ्याकडे पाहताना माझ्या मनात पुन: तो मेंदीचा ओला हिरवा आषाढगंध दरवळला. आणि जाणवलं आमच्या दोघींच्याही मनात त्यावेळच्या आनंदाच्या आड येणाऱ्या अडचणी असल्या तरी आम्हाला त्या अडचणींची खंत वाटत नाहीये.

आणि त्याक्षणी मला आनंदावर परिणाम करणारा आणखी एक महत्त्वाचा घटक भेटला. प्रवास!

मेंदी, श्रीखंड असल्या साध्या गोष्टी मिळवताना करावी लागलेली धडपडसुद्धा आमच्या मनात एक मनोरम आठवण बनून राहिलीय. कारण कोणतीही गोष्ट मिळाल्याचा आनंद केवळ ती मिळण्यात नसतो, तर ती मिळवण्यासाठी केलेल्या प्रवासात असतो. म्हणूनच प्रत्येक बाबतीतला प्रत्येकाचा आनंद वेगळा. कारण प्रत्येकाचा तिथपर्यंतचा प्रवासही वेगवेगळाच!

आज जेटच्या युगात जगणाऱ्या पिढीला मोबाईल घेऊन दिला तरी, तो पेन्सिलीसारखा वाटतो म्हणून आपण तक्रार करतो पण ती पिढी या आनंदाला पारखी झालीय हे आपण विसरतो. मधला अडीअडचणींचा प्रवास टाळून थेट त्या आनंदापर्यंत पोचल्यामुळेच का त्यांना कशाचीच किंमत उरलेली नसेल?

आजी म्हणायची नुसतं देवळात गेल्याने देव भेटत नाही. त्यासाठी काट्याकुट्यातून प्रदक्षिणा घालावी लागते. आईआजीची पूजेची तयारी, मेंदी रंगण्यातला आनंद, केवळ सणासुदीलाच मिळणारं श्रीखंड, आनंदाचा हा प्रवास म्हणजेच आजीची ती प्रदक्षिणा असेल का?

— — — — — — — — — — — — — — — प्रमोदिनी वडके-कवळे
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

*** डॉ. गो. मा. पवार यांना पद्मश्री विखे पुरस्कार**

मराठी साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठेचा समजला जाणारा पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार, यावर्षी डॉ. गो. मा. पवार यांनी लिहिलेल्या 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य' या चरित्र ग्रंथास देण्यात आला आहे. नगर जिल्हा उत्कृष्ट साहित्य पुरस्कारासाठी पंडितराव देशमुख यांच्या 'खजुराहो' या कलाकृतीची निवड करण्यात आली आहे.

*** चांगल्या कार्यकर्त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप द्यावी**

समाजात चांगले काम करणारे अत्यंत कमी लोक असतात. मात्र, त्यांच्याचमुळे उर्वरित समाज टिकून असतो. त्यामुळे चांगले काम करणाऱ्यांच्या पाठीवर समाजाने शाबासकीची थाप द्यावयाची असते. 'कार्यकर्ता परिचय' पुस्तिका ही अशीच एक शाबासकीची थाप आहे, असे दैनिक 'लोकसत्ता'चे निवासी संपादक मुकुंद संगोराम यांनी सांगितले.

अनुराग प्रकाशनच्या वतीने तयार करण्यात आलेल्या 'कार्यकर्ता परिचय' या संदर्भपुस्तिकेचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले.

केवळ प्रसिद्धीसाठी काम करणाऱ्यांचे काम क्षणभंगूर असते. खरोखर समाजासाठी केले जाणारे काम व ते करणारी माणसे नेहमी स्मरणात राहतात. म्हणूनच चांगले काम करणाऱ्यांना प्रसिद्धी मिळावयास हवी; सत्प्रवृत्तीने काम करणाऱ्यांचा आत्मविश्वास पुढे डळमळीत झाल्याची उदाहरणे अनेक आहेत. अशांना बळ देण्याची गरज असते. अपप्रवृत्तींना विरोध करणाऱ्यांची फळीच तयार व्हावयास हवी, असे संगोराम म्हणाले. पदरमोड करूनही समाजासाठी कार्य करणारे कार्यकर्ते असतात. अशाच, कार्यकर्त्यांच्या जीवावर नेते आणि समाज टिकून असतो, असे ॲड. वंदना चव्हाण यांनी सांगितले.

सत्कार व हारांची सवयच राजकारण्यांना होऊन गेलेली असते. एखादा दिवस सत्कार व हारतुरे यांवाचून गेला तर त्यांना चैन पडत नाही. त्यामुळे खऱ्या कार्यकर्त्यांचा परिचय करून देणारी पुस्तिका प्रकाशित करणाऱ्या अनुराग प्रकाशनाचे मी अभिनंदन करतो, असे रतनलाल सोनग्रा यांनी सांगितले.

यावेळी उदयोन्मुख साहित्यिकांना 'कोथरूड साहित्य गौरव पुरस्कार-२००५' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रतिभा गारटकर (इंदापूर), चंद्रशेखर गायकवाड

(अकलूज), उषा फडके (पुणे), विनोद कानगुडे (मुळशी), प्रा. सीताराम सावंत (सातारा), आनंद गवळी (पुणे), घनश्याम पाटील (पुणे), अस्मिता जोगदंड (राजगुरुनगर) व संदीप मांडवकर (पुणे) यांना यावेळी पुरस्कार देण्यात आले. 'कार्यकर्ता परिचय' या पुस्तिकेत खासदार, आमदार, नगरसेवक, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, विविध संस्था, रक्तपेढ्या इत्यादींचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक यांचा समावेश आहे. प्रास्ताविक पुस्तिकेचे संपादक सुनील मोरे यांनी केले.

*** नाना पाटील पुरस्कार मृणाल गोरे यांना जाहीर**

क्रांतिसिंह नाना पाटील लोकविद्यापीठाच्या वतीने क्रांतिसिंहांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त दि. ३ ऑगस्ट सामाजिक चळवळीतील लढवय्या नेत्या श्रीमती मृणालताई गोरे यांना 'क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार' विटा येथे प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ नेते बापूसाहेब काळदाते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अहिल्यादेवी रांगणेकर यांच्या कार्याचाही गौरव करण्यात आला. अध्यक्ष म्हणून आमदार शरद पाटील हे उपस्थित होते.

*** प्रा. मेश्राम यांना पुरस्कार**

'लोकराजा राजर्षी शाहू महाराज जीवन गौरव पुरस्कार' यावर्षी साहित्यिक प्रा. केशव मेश्राम यांना दलित पँथर ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष बापू भोसले यांच्या हस्ते देण्यात आला. कार्यक्रमाला प्रा. रतनलाल सोनग्रा, नगरसेवक सदाशिव नेवाळे, दत्तात्रय मळेकर, सुनील लोखंडे, गीताराम मोरे, उमेश रोकडे, सुंदर रोकडे उपस्थित होते.

*** डॉ. कोळस्करांना 'व्हाइस चॅन्सलर ऑफ द इयर पुरस्कार'**

अखिल भारतीय कुलगुरू परिषदेमध्ये पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांना या वर्षीचा 'आयबीएम व्हाईस चान्सलर ऑफ द इयर' हा सन्मान देण्यात आला.

सरकारी कामातील माहिती तंत्रज्ञानाचा वापर शैक्षणिक क्षेत्रासाठी पुणे विद्यापीठात सर्वाधिक केल्याबद्दल हा सन्मान देण्यात आला. हे पारितोषिक याच वर्षी सुरू झाले असून पुणे विद्यापीठ आणि कुलगुरू डॉ. कोळस्कर त्याचे पहिलेच मानकरी ठरले आहेत.

*** वृत्तपत्रविद्या परीक्षेत मिलिंद ढमढेरे दुसरे**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या वृत्तविद्या पदवी परीक्षेत (बी. जे.) गोवा केंद्रातील अवधूत प्रभू यांनी पहिला, तर पुण्यातील मिलिंद ढमढेरे यांनी दुसरा क्रमांक पटकावला.

बी. जे. परीक्षेचा निकाल ७९.५८ टक्के लागला आहे. प्रभू यांना ७०.४३ टक्के, तर ढमढेरे यांना ६८.१४ टक्के गुण मिळाले. सातारा केंद्राच्या बसवेश्वर

चेणगे यांनी ६३ टक्के गुण मिळवून तिसरे स्थान मिळवले.

वृत्तविद्या प्रमाणपत्र (सी. जे.) परीक्षेचा निकाल ६१.११ टक्के लागला. त्यामुध्ये पुण्याचे विलास काटे ५९.५० टक्के गुण मिळवून पहिले आले. असीम त्रिभुवन ५९ टक्के गुण मिळवून दुसरे आणि सारिका दीडभाई ५८ टक्के गुण मिळवून तृतीय आल्या.

*** आंत्रप्रिनर्स पुरस्कार**

मराठी माणूस उद्यमशीलतेत मागे आहे. ही धारणा चुकीची आहे असे प्रतिपादन कायनेटिक समूहाचे अध्यक्ष अरुण फिरोदिया यांनी केले. आंत्रप्रिनर्स इंटरनॅशनल आयोजित 'आंत्रप्रिनर्स डे' पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रवींद्र बाम होते. २९ जुलै हा दिवस आंत्रप्रिनर्स इंटरनॅशनलतर्फे आंत्रप्रिनर्स डे म्हणून साजरा केला जातो. उद्योगव्यवसायातील मान्यवरांना या दिवशी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. श्री. पु. ग. वैद्य (उद्योजकता विकास क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दलचा आ. रा. भट पुरस्कार), विख्यात कलादिग्दर्शक नितीन देसाई (उद्योजकांच्या पहिल्या पिढीसाठीचा पुरस्कार,) व्हिन्सेन्ट एफ. डिसूझा (गुणवत्ता पुरस्कार), सौ. वृषाली नाईक (महिला उद्योजक), निरंजन देशपांडे (शेती संदर्भातील कार्याबद्दल), डी. व्ही. भालचंद्र व सुगंध पी. उमप (दोघांनाही डेकोरेल उद्योगमित्र पुरस्कार) या मान्यवरांना यंदाचे पुरस्कार देण्यात आले. आजच्या युवकांना नोकरीचे धोकामुक्त जीवनाचे आकर्षण वाटते. उद्योग करणारा माणूस हा अनुकरणीय असतो हे शिकवले जात नाही, ते शिकवले जाण्याची गरजही फिरोदिया यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. बाम यांनी स्वागतपर भाषण केले. दत्ता देशपांडे यांनी आंत्रप्रिनर्स इंटरनॅशनलच्या भावी वाटचालीची रूपरेखा सांगणारे भाषण केले. आंत्रप्रिनर्स इंटरनॅशनलचे गिरीश रानडे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी खरे व कविता देशपांडे यांनी केले.

*** लोकशाहीर भाऊ फक्कड पुरस्कार**

बहुजन समाजातील अनेक रत्नांकडे प्रस्थापितांनी, प्रसारमाध्यमांनी आजपर्यंत दुर्लक्षच केले, अशी खंत व्यक्त करून आज बहुजन समाजातील व्यक्ती सर्वच क्षेत्रांत समाजाबरोबरच देशाचेही नाव मोठे करत आहेत, त्यामुळे भविष्यात बहुजन समाज क्रांती करेल, असा विश्वास ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांनी व्यक्त केला.

साताऱ्यातील क्रांती थिएटर्सतर्फे दिला जाणारा यंदाचा लोकशाहीर भाऊ फक्कड गौरव पुरस्कार निळू फुले यांच्या हस्ते प्रसिद्ध वगनाट्य कलावंत वसंत अवसरीकर आणि शाहीर नामदेवबुवा जगताप-विसापूरकर यांना नुकताच देण्यात आला. तसेच आदर्श कार्यकर्ता पुरस्कार गौतम वाघमारे यांना देण्यात आला. उदयनराजे भोसले या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.

तुकाराम महाराजांनी गहाणखते इंद्रायणीत बुडवताना कार्ल मार्क्सच्या कितीतरी

वर्षे आधीच समाजवादाचा आदर्श घालून दिला होता... प्रस्थापितांनी मात्र, तुकाराम महाराजांचा विद्रोह दडपून टाकल्याचा आरोप करत फुले यांनी, एकट्या तुकाराम महाराजांना वैकुंठास नेण्यास विमान कसे आले, तेही धुळवडीच्या 'अपवित्र' दिवशी असा सवाल केला.

समाजातील वयोवृद्ध कलावंतांना हात देण्यासाठी आणि फुले-आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या कामाची दखल घेण्यासाठी आदर्श कार्यकर्ता पुरस्कार सुरू केल्याची माहिती क्रांती थिएटर्सचे सातारा शाखाध्यक्ष अमर गायकवाड यांनी दिली. वृद्ध कलावंतांसाठी कायम निवासी आश्रमशाळा उभारण्याचा आणि तुकाराम महाराजांच्या जीवनावर चित्रपट तयार करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. 'प्रबुद्ध रंगभूमी'च्या गौरव अंकाचे प्रकाशनही यावेळी झाले.

*** डॉ. रा. चिं. ढेरे यांना चतु:शृंगी जीवनव्रत पुरस्कार**

श्री चतु:शृंगी सेवा समितीतर्फे देण्यात येणारा 'श्री चतु:शृंगी जीवनव्रत पुरस्कार' यंदा लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. रा. चिं. ढेरे यांना २८ ऑगस्टला देण्यात आला.

धर्म, इतिहास, लोकपरंपरा, दैवतविज्ञान आदी अनेक विद्या शाखांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल डॉ. ढेरे यांना हा पुरस्कार देण्यात येणार आला. सन्मानचिन्ह व २१ हजार रुपये, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. द. ना. धनागरे अध्यक्ष म्हणून; तसेच ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. ल. गावडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

*** 'अपंगत्वाची कीव हा क्लेशकारक अनुभव'**

अपंगत्वाची केली जाणारी कीव हा आयुष्यातील सगळ्यात क्लेशकारक अनुभव आहे. त्यामुळेच 'अपंग' ऐवजी 'अभंग' बनण्याची माझी जिद्द आहे, असे मनोगत कमलाकर देसले यांनी 'जिद्द पुरस्कार' स्वीकारल्यानंतर व्यक्त केले.

अपंगत्वावर जिद्दीने मात करून स्वत:चे आयुष्य घडवितानाच इतरांनाही दिशा देणाऱ्या अपंगांना खंडेलवाल परिवारातर्फे 'जिद्द' आणि 'स्वावलंबन' पुरस्काराने गौरविण्यात आले. यंदा नाशिक जिल्ह्यातील झोगडे येथील शिक्षक, साहित्यिक आणि कवी असलेल्या देसले यांना 'जिद्द' पुरस्काराने गौरविण्यात आले. अकरा हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्याचबरोबर नांदेडमधील श्रावण नवले आणि लक्ष्मण मेटकर यांना 'स्वावलंबन' पुरस्काराने या वेळी गौरविण्यात आले. पाच हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्हे असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ज्येष्ठ सराफ व्यावसायिक दाजीकाका गाडगीळ यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. डॉ. विश्वास मेहेंदळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

सत्काराला उत्तर देताना देसले म्हणाले की, अपंगत्वावर मात करण्याचा

पहिला धडा आपल्याला आईने दिला. खाटेला धरून उभं रहायला तिने शिकवले आणि त्यानंतर अनेकांनी उभे केले. त्यामुळेच आज इथवर येऊन पोहोचलो. सारा समाजच आज अपंग झालेला असताना या मंडळींचा हृद्य सत्कार करून खंडेलवाल परिवाराने मोठे काम केले आहे, असे डॉ. मेहेंदळे यांनी नमूद केले. दाजीकाका गाडगीळ यांनी खंडेलवाल परिवाराला पाच हजार रुपयांची मदत दिली. अशोक खंडेलवाल यांनी ही रक्कम मेटकर आणि नवले यांना दिली. या दोघांना मिरचंदानी आणि नैना बेलसरे यांनीही प्रत्येकी एक हजार रुपयांची मदत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव कानडे यांनी केले.

* पित्रोदांच्या रूपाने टिळकांचेच स्वप्न साकार होत आहे

नवी पिढी हा राष्ट्र घडवणारा 'माणसांचा कारखाना' झाला पाहिजे, हे लोकमान्य टिळकांचे स्वप्न टेलिकॉम क्रांतीचे जनक सॅम पित्रोदा यांच्या रूपाने साकार होत असल्याचे गौरवोद्‌गार आंध्रप्रदेशचे राज्यपाल सुशीलकुमार शिंदे यांनी काढले.

टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने यावर्षीचा 'लोकमान्य टिळक पुरस्कार' सॅम पित्रोदा यांना देण्यात आला. मात्र, प्रकृती अस्वस्थ असल्याने ते कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. कार्यक्रमाला खासदार श्रीनिवास पाटील, कृषिमंत्री बाळासाहेब थोरात, रजनी पाटील, ट्रस्टचे अध्यक्ष दीपक टिळक, विश्वस्त श्री. पु. गोखले, एनएसयुआयचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक तंवर आणि रोहित टिळक उपस्थित होते.

यावेळी प्रा. जे. व्ही. नाईक लिखित 'ब्रिटिश सिक्रेट ऑफिशियल व्ह्यू रिगार्डिंग लोकमान्य टिळक ॲण्ड गीतारहस्य' या पुस्तकाचे प्रकाशन शिंदे यांच्या हस्ते झाले. परदेशात जाऊन शिक्षण आणि पैसा कमवल्यानंतर आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग देशवासीयांना व्हावा, ही सध्याची राष्ट्रभक्ती आहे. पित्रोदा हे राष्ट्रासाठी अशा प्रकारे काम करत असल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

लोकमान्य टिळक हे जहाल झाले नसते, तर देशाची स्थिती आफ्रिकन राष्ट्रांप्रमाणे झाली असती. टिळकांनी स्वातंत्र्याबरोबर नवा समाज निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले. म्हणून त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही शिक्षण संस्था काढली, असेही ते म्हणाले.

केसरी आणि मराठाचे अंक तसेच चार वेदांच्या व्हीसीडी तयार करण्याचा संकल्प दीपक टिळक यांनी जाहीर केला.

* 'मिळून साऱ्याजणी'चा १६वा वर्धापनदिन

''सुखी व निकोप जीवनासाठी स्त्री व पुरुष असा भेदावर आधारित दृष्टिकोन न बाळगता मानवी समन्वयाची भावना बाळगणे गरजेचे आहे.'' असे प्रख्यात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. राजेंद्र बर्वे यांनी सांगितले. ते 'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या

१६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित समारंभात ते म्हणाले की, कौटुंबिक जीवनाचा आनंद निरामय लैंगिक जीवनावर आधारित असतो. याबद्दलच्या स्वत:च्या भावनांचा शोध घेऊन त्यांचे योग्य ते व्यवस्थापन जोवर होत नाही. तोवर माणसाची सर्वांगीण प्रगती झाली, असे म्हणता येणार नाही.'

मासिकाच्या संपादिका विद्या बाळ यांनी अपंग व कष्टकरी वर्गासाठी समाजाने अधिक संवेदनशील होण्याचे आवाहन केले.

या वेळी डॉ. बर्वे यांच्या हस्ते पंढरपूरच्या हॅन्डीकॅप्स असोसिएशनच्या संस्थापिका मीनाक्षी देशपांडे यांना मीमांसाभूषण पु. बा. साठे पुरस्कार देण्यात आला. स्वत:च्या अपंगत्वावर मात करून इतर अपंगांना स्वत:च्या सामर्थ्यांवर उभे करण्याचे अनुभव सांगताना श्रीमती देशपांडे म्हणाल्या की, प्रसारमाध्यमांचे प्रमाण भरपूर असतानाही खेड्यांमध्ये अजूनही अपंग माणसे व त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत कितीतरी उपयुक्त माहिती पोहोचू शकलेली नाही.

वर्षारंभ विशेषांकाचे प्रकाशन करणाऱ्या सविता सोनवणे यांनी त्यांच्या स्पार्क महिला मिलन संघटनेतर्फे वंचितांच्या मदतीसाठी केल्या जाणाऱ्या कामांची माहिती दिली. डॉ. श्यामला वनारसे यांनी लिहिलेल्या 'सुंदराचा वेध लागो' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. गीताली वि. मं. यांनी प्रास्ताविक तर वर्षा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

* चंद्रकुमार नलगे यांना 'मातोश्री राठोड' पुरस्कार

कोल्हापूर येथील प्रसिद्ध साहित्यिक प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या 'कालांतरीच्या गोष्टी' या पुस्तकाला मातोश्री गंगाबाई राठोड ग्रामीण साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथील विमुक्त जाती सेवा संस्थेतर्फे हा पुरस्कार दिला जातो. रोख रक्कम आणि मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. याच पुस्तकाला यापूर्वी महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा आणि नांदेडच्या प्रसान बन वैद्यकीय प्रतिष्ठानचाही पुरस्कार मिळाला आहे. श्री. नलगे यांना मिळालेला हा ३७ वा पुरस्कार आहे.

* विश्वास पाटील यांना आचार्य अत्रे पुरस्कार

आचार्य अत्रेंच्या साहित्य वाचनामुळे माझ्यावर साहित्यिक संस्कार होत गेले आणि मी साहित्यिक बनलो. आज त्यांच्याच नावाचा पुरस्कार मिळाल्याने भारतातील कुठल्याही पुरस्कारापेक्षा हा पुरस्कार मला मोठा वाटतो, असे भावपूर्ण उद्‌गार पानिपतकार विश्वास पाटील यांनी काढले.

आचार्य अत्रेंच्या १०७ व्या जयंतीनिमित्त बेळगाव येथील सार्वजनिक वाचनालयातर्फे विश्वास पाटील यांना 'लोकमत'चे (मुंबई) संपादक मधुकर भावे यांच्या हस्ते आचार्य अत्रे पुरस्कार प्रदान करण्यात आला. मराठा बँकेच्या सभागृहात

कार्यक्रम झाला. वाचनालयाचे अध्यक्ष ॲड. नागेश सातेरी अध्यक्षस्थानी होते.

श्री. पाटील म्हणाले, ''मराठी माणूस कसा असावा, हे आचार्य अत्रे यांनी सांगितले. बेळगावकरांचे साहित्याशी घनिष्ठ नाते आहे. वासरू व गाय असा बेळगाव व महाराष्ट्राचा नातेसंबंध असून त्यांना साहित्याच्या धाग्याने एकमेकाला धरून ठेवले आहे.''

श्री. पाटील यांनी नोव्हेंबरमध्ये प्रकाशित होणाऱ्या 'शिवपुत्र संभाजी' कादंबरीबाबत थोडक्यात विवेचन केले. बखरकारांनी संभाजीराजांबद्दल खोटी वर्णने छापली असून, खरा इतिहास वाचकांसमोर आला पाहिजे, यासाठी ही कादंबरी लिहिल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. भावे म्हणाले, आचार्य अत्रेंच्या जयंतीदिनी त्यांच्या नावे माझ्या हस्ते या पुरस्काराचे वितरण झाले, ही माझ्या आयुष्यातील सर्वांत सुंदर संध्याकाळ आहे.''

'महानायक' कादंबरीचे कन्नड भाषेत भाषांतर करणारे चंद्रकांत पोकळे यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला. मराठी विद्यानिकेतनचे संगीत शिक्षक प्रसाद शेवडे यांनी स्वागतगीत म्हटले. साहित्यिक कृष्णा मेणसे, प्रा. अनंत मनोहर, एस. एल. पाटील, प्रा. बाबुराव नेसरकर, अनंत लाड, नेताजी जाधव, प्रा. आनंद मेणसे आदी उपस्थित होते.

समर्पिता लेखक : **शरद दळवी**



रामायण ही संस्कृती परिवर्तनाच्या संधिकाळातील कथा. स्त्रीच्या गुलामगिरीची सुरुवात त्याच काळातली. रामायणातच स्त्री आणि स्त्रीत्वाची खूप अवहेलना झाली. तिला, तिच्या स्वत्वाला आणि स्वातंत्र्याला पणाला लावण्यात आले. रामायणातील स्त्रियांना स्त्रीत्वाच्या गौरवासाठी प्राण पणाला लावावे लागले. सर्वस्व द्यावे लागले.
आणि म्हणूनच प्रातःस्मरणीय पंचकन्यांतील चार रामायणातील आहेत. त्यांच्या समर्पणाची, त्यांच्यावरील अन्यायाची ही कथा, त्यांच्याच मुखातून...

किंमत : २२०रु.

तारकांच्या विश्वात



लेखक : पराग महाजनी

किंमत : ३५०रु.
सभासदांना : २६३रु.
पोस्टेज : २५रु.

अमर्याद अवकाशातील अगणित तारकांविषयी सर्वकाही....

या पुस्तकात काय पहाल?

★ प्रत्येक तारकापुंजाचा सुस्पष्ट आणि पानभर नकाशा.
★ आकाशात दिसणाऱ्या सर्व ८८ तारकापुंजांची अद्ययावत वैज्ञानिक माहिती.
★ तारकापुंजांच्या ग्रीक व हिंदू वाङ्मयातील कथा.
★ दीर्घिका, तारे, उल्कावर्षाव यांची अचूक स्थाने.
★ निवडक दीर्घिकांची जगप्रसिद्ध दुर्बिणीतून घेतलेली छायाचित्रे.
★ २७ नक्षत्रांचे आणि १२ राशींचे नकाशे.
★ 'युरेनोग्राफिया' या सतराव्या शतकात प्रसिद्ध झालेल्या ॲटलसमधील सर्व छायाचित्रे.
★ याशिवाय वेद, उपनिषदे आणि ब्राह्मणे यांतील 'खगोलशास्त्रीय' सुभाषिते.

आणि बरेच काही...

खगोलशास्त्राचे अभ्यासक, विज्ञानशाखेचे विद्यार्थी, ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक व तारे तारकांबद्दल जिज्ञासा असलेल्या सर्वांसाठी .....

पुस्तक हाताशी ठेवा आणि आकाशदर्शनाचा आनंद लुटा!

मायकेल क्रायटन

ज्युरॅसिक पार्क, टाइमलाइन, काँगो, दि ग्रेट ट्रेन रॉबरी यासारख्या गाजलेल्या कादंबऱ्यांचा आणि चित्रपटांचा लेखक म्हणून मायकेल क्रायटन याला अमेरिकेतील सर्वात श्रीमंत लेखकांमध्ये आघाडीवरचे स्थान आहे. हार्वर्ड युनिव्हर्सिटीतून वैद्यकीय डॉक्टर म्हणून उत्तम प्रकारे यशस्वी होऊनही त्याने पुढे लेखन हाच आपला मुख्य व्यवसाय म्हणून अंगीकारून, आपल्या वैद्यकीय ज्ञानावर व संशोधनावर आधारित चित्तथरारक कादंबऱ्यांच्या निर्मितीला आरंभ केला. त्या कादंबऱ्यांना बेस्ट सेलर्सच्या यादीत स्थान मिळाले. त्याबरोबर त्यावर निघालेले चित्रपटही बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरले. त्याच्या कादंबऱ्यांच्या दोन कोटीवर प्रती खपलेल्या आहेत.

त्याच्या गाजलेल्या काही पुस्तकांचे हे मराठी अनुवाद. या अनुवादांनाही वाचकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

ज्युरॅसिक पार्क

पॅसिफिक महासागरातील एका बेटावर मनोरंजनासाठी विज्ञानाच्या अद्‌भुत तंत्राने नामशेष झालेले डायनासोर बनवले गेले... आणि...

प्रचंड गाजलेल्या भयपटाची मूळ कथा... चित्रपटाहूनही भयचकित करणारी...

अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर

किंमत २५० रु. सभासदांना १८८ रु.
पोस्टेज २० रु.



द लॉस्ट वर्ल्ड

अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर

साडेसहा कोटी वर्षांपूर्वी नष्ट झालेल्या महाकाय डायनासोरचे जग पुन्हा निर्माण केले तर? एका विक्षिप्त अब्जाधीशाने हे घडवून आणले, आणि ...भीषण विनाश घडवणाऱ्या विज्ञानाच्या विकृत रूपाचे दर्शन घडवले, रहस्यमय थरारक कथा.

किंमत २२० रु. सभासदांना १६५ रु.
पोस्टेज २० रु.

डिस्क्लोजर

अनु.माधव कर्वे

स्त्री-पुरुषांमधल्या नात्यांची अत्याधुनिक कहाणी. एका बहुचर्चित अमेरिकन चित्रपटाची मूळ कथा.

किंमत २२० रु. सभासदांना १६५ रु.
पोस्टेज २० रु.





काँगो

अनु. अरुण मांडे

रहस्याने ओथंबलेला, काँगो नदीच्या खोऱ्यातील हिऱ्यांचा शोध घेण्यासाठी काढलेल्या चित्तथरारक मोहिमेचा वृत्तान्त.

किंमत १६० रु. सभासदांना १२० रु.
पोस्टेज २० रु.

टाइमलाइन

अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर

माणसाला कालप्रवास करण्याचे तंत्र गवसले आणि हव्या त्या कालखंडात प्रवेश करण्यात यश लाभले मात्र त्यातून पुन्हा वर्तमानकालात येणे जमले नाही तर? एक भन्नाट कल्पनेचे चित्तथरारक कथारूप

किंमत ३६० रु. सभासदांना २७० रु.
पोस्टेज २० रु.

दीप योजनेतील मोफत पुस्तकांची यादी

समिधा	रणजित देसाई	१००
बारी	रणजित देसाई	१२०
प्रतिक्षा	रणजित देसाई	८०
आलेख	रणजित देसाई	१२०
मेघ	रणजित देसाई	१००
आषाढ	रणजित देसाई	८०
वैशाख	रणजित देसाई	९०
पंख जाहले वैरी	रणजित देसाई	५०
पांगुळगाडा	रणजित देसाई	६०
तुझी वाट वेगळी	रणजित देसाई	६०
स्नेहधारा	रणजित देसाई	९०
संचित (अध्यक्षीय भाषणे)	रणजित देसाई	६०



नवी स्त्री	वि. स. खांडेकर	१००
अबोली	वि. स. खांडेकर	५०
दवबिंदू	वि. स. खांडेकर	६०
ढगाआडचे चांदणे	वि. स. खांडेकर	६०
समाधीवरली फुले	वि. स. खांडेकर	६०
अश्रु आणि हास्य	वि. स. खांडेकर	९०
प्रसाद	वि. स. खांडेकर	१५०
क्षितिजस्पर्श	वि. स. खांडेकर	८०
सांजसावल्या	वि. स. खांडेकर	८०
वन्हि तो चेतवावा!	वि. स. खांडेकर	७०
सहा भाषणे	वि. स. खांडेकर	७०
तारका	वि. स. खांडेकर	४०
नटरंग	आनंद यादव	१४०
माळावरची मैना	आनंद यादव	११०
भूमिकन्या	आनंद यादव	९०
झाडवाटा	आनंद यादव	९०
स्पर्शकमळे	आनंद यादव	१००
का रे भुललासी	व. पु. काळे	१२०
तू भ्रमत आहासी वाया	व. पु. काळे	७०
दुनिया तुला विसरेल	व. पु. काळे	५०
प्रेममयी	व. पु. काळे	१००
रंगपंचमी	व. पु. काळे	२००
सांगे वडिलांची किर्ती	व. पु. काळे	७०
माणसं	व. पु. काळे	१७०
एक एक पाऊल : ओशो	अनु. भारती पांडे	८०
मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही : ओशो	अनु. मृणालिनी गडकरी	९०
साक्षात्काराची देणगी : ओशो	अनु. प्रज्ञा ओक	१५०
वुइ दि नेशन (नानी पालखीवाला)	वि. स. वाळिंबे	२००



वॉर्सा ते हिरोशिमा	वि. स. वाळिंबे	३००
लज्जा (कादंबरी)	अनु. लीना सोहोनी	१२५
निर्बाचित कबिता (कविता)	अनु. मृणालिनी गडकरी	७०
आंधळी : कॅथरीन पियर्स	शान्ता शेळके	१००
गोंदण	शान्ता शेळके	५०
कविता स्मरणातल्या	शान्ता शेळके	१००
सांगावेसे वाटले म्हणून...	शान्ता शेळके	९०
सुवर्णमुद्रा	शान्ता शेळके	८०
मजल दरमजल	अनु. भारती पांडे	८०
व्हॉट वेंट रॉंग?	अनु. लीना सोहोनी	२००
रंग सुखाचे	डॉ. रमा मराठे	८०
निसर्गपुत्र (अनुवादित)	निरंजन घाटे	८०
पर्यावरण प्रदुषण	निरंजन घाटे	१३०
वसुंधरा	निरंजन घाटे	२५०
विज्ञानाचे शतक	निरंजन घाटे	२००
युगंधर (विज्ञान)	निरंजन घाटे	१००
नवे शतक	निरंजन घाटे	१५०
पोलिसकथा	व. कृ. जोशी	१५०
भीषण हत्याकांड	व. कृ. जोशी	९०
खेकडा	रत्नाकर मतकरी	८०
तनमन	रत्नाकर मतकरी	४०
मुलांसाठी गमती-जमतीचा स्वयंपाक : रोहिणी सिंग	अनु. आशा परुळेकर	६०
मायक्रोवेव्ह ओव्हन	राजश्री नवरे	७०
परिशोध : एस. एल. भैरप्पा	उमा कुलकर्णी	१००
अंतराळ : शांतिनाथ देसाई	उमा कुलकर्णी	१००
अवस्था : यु. आर. अनंतमूर्ती	उमा कुलकर्णी	११०
सीमारेषा	माधवी देसाई	२००

हरवलेल्या वाटा	माधवी देसाई	८०
धुमारे	माधवी देसाई	७०
सागर	माधवी देसाई	६०
वडवाई	अंजनी नरवणे	२००
तत्वमसि	अंजनी नरवणे	१४०
टेक् २५ : भावना सोमय्या	अंजनी नरवणे	४००
गहाण पडलेली टेकडी : मारिया श्रेस	अंजनी नरवणे	१२०
कॉंगो : मायकेल क्रायटन	अनु. अरुण मांडे	१६०
ज्युरॅसिक पार्क : मायकेल क्रायटन	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर	२५०
द लास्ट डॉन : मारिओ पुझो	अनु. अनिल काळे	३५०
क्रोमोझोम-६ : रॉबिन कुक	अनु. वैशाली जोशी	३५०
दि फिस्ट ऑफ गॉड : फ्रेडरिक फोरसिथ	अनु. अनिल काळे	३००
डॉ. झिवागो : बोरिस पास्तरनाक	अनु. आशा कर्दळे	२५०
३००१ द फायनल ओडिसी : आर्थ सी. क्लार्क	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर	१६०
काळोखाची लेक : कॅथरीन दी जीजस	अनु. सरिता पदकी	१५०
देवदास : शरच्चंद्र चट्टोपाध्याय (बंगाली)	अनु. मृणालिनी गडकरी	९०
संस्कार : यू. आर. अनंतमूर्ती	अनु. लोकापूर/कानिटकर	८०
टोकियोच्या नभांगणातील चमकत्या तारका : फिलिस् बर्नबॉम	अनु. सुधा नरवणे	१८०
द्वंद्व : विजयदान देथा (राजस्थानी कथा)	अनु. वनिता सावंत	१५०
रावीपार : गुलजार	अनु. पाडळकर/वेल्हाळ	१५०
फुलांचे बोल : आन्ना साक्से (रशियन कथा)	अनु. सुनीती देशपांडे	१००
द स्ट्रीम विदिन (बंगाली कथा)	अनु. मीना वैशंपायन	१३०
रेशीमगाठी	कांचन घाणेकर	१००
भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया :नवाझ मोदी	अनु. वासंती फडके	३००
योद्धा शास्त्रज्ञ : राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम	माधव मोर्डेकर	४०
सेक्स, स्कॉच, अँड स्कॉलरशिप : खुशवंतसिंग	अनु. अनिल किणीकर	१२५
मोरावळा	शिवाजी सावंत	६०
मदर टेरेसा : ॲन सेबा	अनु. अनंत बेदरकर	२५०
टाईमपास : प्रोतिमा बेदी	अनु. सुप्रिया वकील	१८०
देव जो भूवरी चालिला : साईबाबा		



रंगास्वामी पार्थसारथी	अनु. लीना सोहोनी	१२०
द जॉय ऑफ कॅन्सर : अनुप कुमार	अनु. माधुरी शानभाग	१५०
मनावर विजय : एकनाथ ईश्वरन्	अनु. वैशाली जोशी	१२५
मुलांवरचे संस्कार (राज्य पुरस्कार)	शं. व्यं. काश्यपे	९०
संस्कार कथा	शं. व्यं. काश्यपे	६०
प्रियाराधन आणि विवाह		
: डॉ. विजय नागस्वामी	अनु. भारती पांडे	१५०
सुखद मातृत्व	डॉ. रत्नावली दातार	७०
डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी	डॉ. विकास/विनिता गोगटे	२५०
हसता हसता आरोग्य	अनु. दिगंबर गाडगीळ	९०
एकच पेला शिवाम्बूचा	डॉ. शशि पाटील	९०
आपले सौंदर्य आणि त्याची निगा	अनु. मीना टाकळकर	१००
प्रवास-पर्यटनाचे नवे पैलू	यशोधरा भोसले	१५०
शिवणकला एक छंद : सलवार कमिज,		
स्कर्ट ब्लाऊज, इव्हिनिंग गाऊन्स, मिडी	हेमा कळके	८०
विज्ञान गमती	डॉ. अरुण मांडे	५०
विज्ञान जमती	डॉ. अरुण मांडे	६०
विश्वातील सजीवसृष्टी	अनु. डॉ. बाळ फोंडके	६०
संप्रेरकांची सुसंगती : पी. डी. गुप्ता	अनु. मीना किणीकर	५०
शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी :		
कुलकर्णी/भागवत/गंभीर	अनु. मीना किणीकर	७०
हिरवे जनुक : शाकुंतला भट्टाचार्य	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर	६०
संभव असंभव	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर	८०
बिजलीदेवीची कहाणी	गोविंद लक्ष्मण परांजपे	८०
नामशेष झालेले प्राणी	डॉ. किशोर पवार	५०
शरीरातील विविध संस्था -		
फुप्फुसे, हृदय, मेंदू	वैशाली जोशी	२५
अंतःस्त्राव, गर्भाशय, जठर	वैशाली जोशी	२५
स्नायू, अस्थि	वैशाली जोशी	२५

व्हर्च्युअल रिॲलिटी (कथा)	डॉ. बाळ फोंडके	१५०
पृथ्वीवर माणूस उपराच! (संशोधन)	सुरेशचंद्र नाडकर्णी	७०
अज्ञाताचे विज्ञान (संशोधन)	सुरेशचंद्र नाडकर्णी	१३०
सुंदर आपली फुलबाग	आ. बा. पाटील	१००
सुंदर आपला रोपमळा	आ. बा. पाटील	१२०
एकवचनी	संजय राऊत	३५०
ख्यातनाम इतिहासकार : अरूण शौरी	अनु. सुधा नरवणे	१५०
बिग इगोज, स्मॉल मेन		
: राम जेठमलानी	अनु. माधव मोर्डेकर	८०
द अदर साईड ऑफ सायलेन्स :		
उर्वशी बुटालिया	अनु. नारायण आवटी	२५०
महात्मा (जोतीराव फुले)	डॉ. रवींद्र ठाकूर	३००
फॅक्टरी गेट	रंगा मराठे	१५०
तीन दगडाची चूल	विमल मोरे	१५०
शापित राजहंस	अनंत तिबीले	२५०
मृद्‌गंध	इंदिरा संत	१६०
कांचनकण	शिवाजी सावंत	७०
आठवणींचा मोहर	राजाभाऊ गवांदे	१६०
बंजाऱ्याचे घर	यशोधरा भोसले	१५०
धागे : गुलजार	संपादन : अनंत दीक्षित	६०
ओसरलेले वादळ	कुमार केतकर	१२०
गज़ल	प्रा. डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी	१८०
रिवणावायली मुंगी	राजन गवस	१३०
कावळे आणि माणसं	उत्तम कांबळे	१००
उत्तरार्ध	विजया राजाध्यक्ष	१३०
खसखशीचा मळा	द. ता. भोसले	७५
गुंता सोडविताना	अनुराधा गुरव	११०
पाणी कुठंवर आलं गं बाई...	दया पवार	२५
नको स्वातंत्र्य स्त्रीला	दिलीप परदेशी	५०
मराठी कादंबरीचा इतिहास	चंद्रकांत बांदिवडेकर	१७०
मराठी रोमॅंटीक काव्यप्रतिभा	रमेश तेंडुलकर	१३०

वाचकांचा प्रतिसाद



‘गोष्टी माणसांच्या’ या पुस्तकाने वेड लावले!

गोष्टी माणसांच्या

सुधा मूर्ती
अनु. लीना सोहोनी

किंमत : १३०रु.

‘वाईज अँड अदरवाईज’ व ‘गोष्टी माणसांच्या’ ही सुधा मूर्तींची दोन अनुवादित पुस्तके त्या मानाने मी उशिरा वाचली (माझा दोष!) आणि आतून हलले. खास करून ‘गोष्टी माणसांच्या’ या पुस्तकाने वेड लावले. दिवसातून १० जणांना तरी हे पुस्तक वाचा असे सांगते. पुस्तकाचा गाभा उत्तम आहेच, पण लीनाताईंनी जर सहज सुलभ सरळ रसाळ भाषांतर मराठी वाचकांपर्यंत पोचवले नसते तर लोक या आनंदाला मुकले असते.

माझे गाव सांगली. एम.ए.बीएड तिथेच केले. प्राध्यापिका म्हणून काम तिथेच केले आता २६ वर्षे शिक्षिका म्हणून काम करते आहे. सुदैवाने दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले. ‘श्वास चित्रपटाच्या’ ‘किमयागार कथेने’ अमाप यश दिले. सारी देवी सरस्वतीची कृपा! अधिक काय?

सौ. माधवी घारपुरे
धनंजय, ब्लॉक नं.९
आर.पी. रोड, रामनगर,
डोंबिवली पूर्व.

लेखकानं जे जीवन भोगलं, त्या वास्तविक संघर्षाच्या अनुभवाची ही सक्षम कादंबरी आहे.

चाईल्ड ऑफ द होलोकास्ट

जॅक कूपर
अनु. सिंधू विजय जोशी

किंमत : १३०रु.

‘चाईल्ड ऑफ द होलोकॉस्ट’ या जॅक कूपर यांच्या कादंबरीचा मूळ गाभा चांगला आहे आणि मराठी भाषेतला अनुवाद अगदी सुटसुटीत झालेला आहे. शब्दांची ठेवण सोपेपणाची असून साने गुरुजींचे साहित्य वाचल्यासारखे वाटते.

यांकली कुपरब्लम ह्या दहाअकरा वर्षे वयाच्या मुलाने ज्यू असल्यामुळे अनंत अडीअडचणींना तोंड दिले, स्वत:चा जीव वाचवण्यासाठी वेळोवेळी संघर्ष केला, आपले ‘ज्यू’पण लपविण्याचा प्रयत्न केला हे कशासाठी तर माणूस म्हणून जगण्यासाठी!

जीवनात संघर्ष होत असताना त्याला सातत्याने कसे तोंड द्यायचे, भिऊन न जाता कसे जगायचे हे यातून शिकायला मिळते.

हा लेखक आज सत्तरीत आहे.

लेखकानं जे जीवन भोगलं, त्या वास्तविक संघर्षाच्या अनुभवाची ही सक्षम कादंबरी आहे.

ही कादंबरी अनुवादित आहे असे वाटत नाही. ती मूळ मराठीच वाटावी अशा सोप्या सुटसुटीत भाषेत सिंधू विजय जोशी यांनी अनुवाद केला आहे. त्यांना धन्यवाद!

रवींद्र बागडे
२४ भाग्ययोग, कस्तुर पार्क,
शिंपोली रोड, बोरिवली (प)
मुंबई ४०० ०९२.

अनुक्रमणिका

प्रेमाची जादू ९७

बालनगरी

प्रेमाची जादू

खूप खूप वर्षापूर्वीची गोष्ट अवंतीनगरी ही एक सुंदर नगरी होती. या सुंदर नगरीचा राजा अनंतसेन दयाळू आणि प्रेमळ होता. आपल्या प्रजेच्या सुखासाठी तो सदैव तत्पर असे. प्रजाही आपल्या लाडक्या राजासाठी काहीही करायला तयार असे. अनंतसेनचे लग्न माधवनगरीची राजकन्या सुप्रियाशी झाले. राणी सुप्रिया ही आनंदी आणि कोमल मनाची होती.

लवकरच सुप्रियाला एक गोंडस मुलगा झाला. सगळीकडे आनंदी आनंद झाला. राजपुत्राचे नाव पवनकुमार ठेवले. नामकरण समारंभाच्या वेळी राजाने काही ज्योतिषांना राजपुत्राला पाहण्यासाठी बोलावले. त्या ज्योतिषांनी राजाला सांगितले 'राजा, हा मुलगा खूप भाग्यवान आहे. खूप शूर आहे पण त्याच्या

वयाच्या सोळाव्या वर्षी त्याच्यावर मोठे संकट येणार आहे. शिकारीपासून त्याला धोका आहे!'

पवनकुमार हळूहळू मोठा होत होता. राजा अनंतसेन त्याच्यावर विशेष लक्ष ठेवत असे. पवनकुमारबरोबर सतत कोणी ना कोणी त्याच्या रक्षणासाठी हजर असे...

पवनकुमार १६ वर्षाचा झाला तेव्हा राजाने त्याची सुरक्षाव्यवस्था अधिक कडक केली. त्याला कधीही एकटे कुठे जाऊ द्यायचे नाही अशी राजाची कडक आज्ञा असे.

पवनकुमारला शिकार करायला फार आवडत असे. एकदा तो आपल्या मित्र आणि रक्षकांबरोबर जंगलात शिकारीला गेला. जंगलात हिंडता हिंडता तो आपल्या

मित्र आणि रक्षकांपासून खूप दूर गेला. त्याला एक सुंदर सोनेरी हरीण दिसले. पवनकुमार त्या हरिणामागे धावू लागला. त्या हरणाने त्याला जंगलात खूप दूरवर नेले. आणि नंतर एका मोठ्या नगरीपाशी आणले. त्या नगरीपाशी आल्यावर त्या सोनेरी हरणाचा एक मोठा राक्षस बनला. तो राक्षस म्हणाला, 'आमच्या



राजाला तुला भेटण्याची इच्छा आहे. त्याच्या आज्ञेनेच मी तुला येथे घेऊन आलो! चल. राजवाड्यात राजा तुझी वाट पहात आहे.'

पवनकुमारला आश्चर्य वाटले. त्याला वाटले, 'हरणाचा राक्षस झाला, राजा तरी खरंच माणसासारखा आहे का? जादूचीच नगरी दिसते आहे ही. आपलाही

ससा नाहीतर उंदीर करायचा! आता आलोच आहोत तर पाहू या राजाला भेटून!'

पवनकुमार राक्षसाबरोबर चालू लागला. थोड्याच वेळात ते एका भक्कम राजवाड्यापाशी आले. ते राजवाड्यात पोहोचले तेव्हा जेवणाची वेळ झाली होती. राजा आणि राणी राजकन्यांबरोबर जेवण करत होते.

पवनकुमारला पाहताच राजा म्हणाला, ''पवनकुमार, ये मी तुझीच वाट पाहत आहे. आमच्याबरोबर जेवायला बस.''

पवनकुमार लगेच तयार झाला कारण त्याला प्रचंड भूक लागली होती. तो अगदी पोटभर जेवला.

जेवण झाल्यावर राजा त्याला म्हणाला, 'बेटा, मी तुझ्यावर एक कामगिरी सोपवणार आहे. आजची रात्र तू माझी मोठी मुलगी मधुवंती हिच्यावर लक्ष ठेवायचे आहे. जर तू पूर्ण रात्रभर जागा राहिलास आणि माझ्या प्रश्नांची उत्तरे दिलीस तर मधुवंतीचे तुझ्याशी लग्न होईल. आणि जर तू या परीक्षेत नापास झालास तर तुझे डोके उडवले जाईल!'

पवनकुमारने क्षणभर विचार केला. आणि त्याने हे आव्हान स्वीकारायचे ठरवले.

तो म्हणाला, ''ठीक आहे महाराज. परंतु तुम्ही शब्द दिल्याप्रमाणे वागले पाहिजे!''

''मी सांगितल्याप्रमाणेच वागेन!'' राजा म्हणाला.

पवनकुमार मधुवंतीच्या खोलीत गेला. मधुवंती दयाळू होती. तिच्या खोलीत देवदूताची एक सुंदर मूर्ती होती.

मधुवंती म्हणाली, ''हे देवदूता, या राजपुत्राला जेव्हा माझे बाबा प्रश्न विचारतील तेव्हा त्याची तूच उत्तरे दे. कृपा करून मला एवढी मदत कर.''

''मधुवंती, तू काही काळजी करू नकोस. मी तुझे काम केलेच म्हणून समज.'' देवदूत म्हणाला.

मधुवंती पवनकुमारला म्हणाली, ''माझ्या प्रिय मित्रा, तू आता शांतपणे झोप.''

पवनकुमार शांतपणे झोपी गेला. जेव्हा जेव्हा राजाने हाक मारली आणि प्रश्न विचारले तेव्हा तेव्हा देवदूताने त्याची अचूक उत्तरे दिली.

दुसऱ्या दिवशी सकाळी राजा म्हणाला, ''मी अजून एकदा तुझी परीक्षा घेणार आहे. त्याशिवाय तुला राजकन्येशी लग्न करता येणार नाही!'' पवनकुमारला आश्चर्य वाटले. राजा आपला शब्द पाळत नाही हे



त्याच्या लक्षात आले. तरीही त्याने राजाचे आव्हान स्वीकारायचे ठरवले.

दुसऱ्या रात्री पवनकुमार दुसरी राजकन्या मधुमती हिच्या खोलीत गेला. मधुमतीनेही त्याला मदत करायचे ठरवले. मधुवंतीप्रमाणेच मधुमतीनेही देवदूताला पाचारण केले. व पहिल्या रात्रीप्रमाणेच दुसऱ्या रात्रीही देवदूताने राजाच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

सकाळी राजाने पवनकुमारला बोलावले. राजा म्हणाला, ''मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. पण अजूनही तुला राजकन्येशी लग्न करता येणार नाही. माझ्या सर्वात लहान राजकन्येवर लक्ष ठेवण्यात तू यशस्वी झालास तरच तुझे लग्न राजकन्येशी होईल आणि तुझे डोकेही उडवले जाणार नाही.''

पवनकुमारला

राजाच्या धोकेबाजपणाची कल्पना आली. पण तो घाबरला नाही. तिसऱ्या रात्री तो सर्वात लहान राजकन्या मधुलिका हिच्या खोलीत गेला. मधुलिका सर्व बहिणींमध्ये अत्यंत सुंदर होती. निर्भय आणि रुबाबदार

पवनकुमारला पाहताच मधुलिका त्याच्या प्रेमातच पडली. पवन- कुमारलाही मधुलिका फार आवडली. मधुलिकानेही तिच्या बहिणींप्रमाणेच देवदूताला बोलवून पवनकुमारचे राजापासून रक्षण केले.

सकाळी राजाने पवनकुमारला बोलावले. राजाचा चेहरा उतरला होता. तो पवनकुमारशी राजकन्येचं लग्न करण्यास तयार नव्हता. म्हणून तो म्हणाला, ''राजपुत्रा, तुला अजून एक परीक्षा द्यावी लागेल. माझ्या राजवाड्याभोवती दाट जंगल आहे. जर तू एका रात्रीत

जंगलातील सर्व झाडे तोडून दाखवलीस तरच तुझे एका राजकन्येशी लग्न होईल. नाहीतर तुझे डोके उडवले जाईल.'

पवनकुमार खरे तर खूप चिडला होता. पण करणार काय? राजाने त्याला काचेची तलवार दिली. पवनकुमारने झाडे तोडण्यास सुरुवात केली आणि काचेची तलवार लगेचच तुटली!

तो मटकन् खाली बसला.

त्याला वाटले, 'आता काही आपण वाचत नाही!'

मध्यरात्री मधुलिका त्याच्यासाठी जेवण घेऊन आली. पवनकुमारला कसलीच इच्छा नव्हती. मधुलिकाच्या आग्रहाखातर त्याने चार घास खाल्ले. मधुलिका म्हणाली, 'पवन, तू खूप दमला आहेस, माझ्या मांडीवर थोडा वेळ झोप' पवन खरंच दमला होता. त्याने तिच्या मांडीवर डोके ठेवले आणि क्षणात गाढ झोपी गेला.

तो झोपल्यावर मधुलिकाने आपल्या जादूच्या रुमालाने जमिनीवर तीन वेळा थापटले. त्याबरोबर राक्षसांची सेना हजर झाली. मधुलिकाने त्यांना सांगितले, ''हे सगळे जंगल काचेच्या तलवारीने दोन तासात कापून काढा!''

'जशी आज्ञा.' राक्षसांचा सेनापती म्हणाला.

पवनकुमार उठला तेव्हा सगळे जंगल साफ झाले होते! तो म्हणाला, ''मधुलिका, केवळ तुझ्यामुळेच माझे प्राण वाचले, मी तुला काय देऊ?''

मधुलिका गोड लाजली.

सकाळ झाली. पवनकुमारने काम पूर्ण झाल्याचे सांगितले. पण अजूनही राजाचे समाधान झाले नाही. राजा म्हणाला, ''मधुलिकाच्या खिडकीतून समोर दिसणाऱ्या उंच टेकड्या एका रात्रीत सपाट करून तेथे एक राजवाडा बांधून दिलास तरच---''

आता मात्र मधुलिकाही राजावर खूप चिडली. तिने यातून मार्ग काढायचे ठरवले. नेहमीप्रमाणे राजाने पवनकुमारला काचेची हत्यारे दिली. आणि मधुलिकाने पुन्हा एकदा राक्षसांच्या सेनेला बोलावले आणि एका रात्रीत राजवाडा बांधून दिला.

आता पवनकुमार व मधुलिका एकमेकांचा हात घट्ट धरून एकत्रच राजाकडे गेले. आणि दोघांनी आम्ही काम पूर्ण केले आहे. असे एकदमच सांगितले.

मधुलिका म्हणाली, ‘बाबा, तुम्ही पवनकुमारची खूपवेळा परीक्षा घेतलीत आता मात्र तुम्ही परीक्षा न घेता आमच्या लग्नाला परवानगी दिली पाहिजे.’

राजा म्हणाला, ‘‘ठीक आहे बेटा. पण तुझ्या दोन मोठ्या बहिणींची लग्ने झाल्याशिवाय तू कसे लग्न करू शकशील? ते काही योग्य नव्हे!’’

मधुलिका काही बोलली नाही. ते दोघेही राजवाड्यातून बाहेर पडले. मधुलिका म्हणाली, ‘‘पवन, आता आपण लवकरात लवकर येथून निघून जायला पाहिजे.’’

‘‘मलाही तसेच वाटते, चल लवकर निघू या.’’ पवन म्हणाला.

पवनकुमार एका घोड्यावर स्वार झाला. मधुलिका त्याच्या पुढ्यात बसली. ते भरधाव वेगानं जाऊ लागले. थोडे अंतर गेल्यावर त्यांच्या लक्षात आले की राजा त्यांचा पाठलाग करीत आहे.

मधुलिकाने लगेच पवनला गुलाबाचे रोप

बनवले व स्वतः फूलाचे रूप घेतले. राजा काही त्यांना पकडू शकला नाही. तो परत राजवाड्यात गेला. राजा राजवाड्यात परतल्यावर मधुलिका व पवन पुन्हा मूळरूपात आले आणि भरधाव वेगाने पुढे पुढे जाऊ लागले.

राणीने राजाला परत त्या दोघांना पकडण्यासाठी पाठवले.

पुन्हा एकदा राजा त्यांच्याजवळ पोहोचणार एवढ्यात मधुलिकाने पवनला मंदीर बनवले व स्वतः मंदिरातली पुजारीण बनली. पुन्हा एकदा राजा त्यांना न घेताच परतला.

आता मात्र राणीही राजाबरोबर पाठलाग करण्यासाठी आली. तो पर्यंत पवनकुमार व मधुलिका बरेच लांब आले होते. पण तरीही राजा व राणी त्यांच्याजवळ पोहोचू शकत होते.

आईला पाहताच मधुलिकाने पवनकुमारचे एका तळ्यात रूपांतर केले व स्वतः मासा बनून राहिली. यावेळीही राजाराणीला दोघांना पकडता आले नाही. आता मात्र राणीचा राग निवळला तिने दोन अक्रोडाची फळे त्या तळ्यात टाकली आणि म्हणाली, ''बेटा, मधुलिका,' ही फळे जपून ठेव. अडचणीच्या वेळी ती तुझ्या उपयोगी पडतील.''

राजा राणी परत गेले. आता पवनकुमार व मधुलिका अवंतीनगरीच्या हद्दीत आले होते. दोघांनाही अतिशय आनंद झाला. जादूनगरीची हद्द संपल्यामुळे मधुलिकाची जादूची शक्तीही नाहिशी झाली होती. ते दोघे नगरीच्या वेशीपर्यंत आले. पवनकुमार म्हणाला, ''मधू, तू आता फार दमली आहेस. आपण आता आमच्या राज्यात प्रवेश केला आहे. आता आपल्याला कोणताही धोका नाही. मी प्रथम नगरीत जाऊन तुझ्यासाठी रथ घेऊन येतो. आपण रथात बसून नगरीत प्रवेश करू या. मी रथ घेऊन येईपर्यंत तू येथेच थांब.''

''ठीक आहे पवन, पण लवकर ये. मी तुझी वाट पाहते.''

काळजी करू नकोस. मी ताबडतोब रथ घेऊन येतो.

इकडे पवनकुमार गेल्यापासून अवंतीनगरी दुःखात बुडून गेली होती. आता आपला मुलगा पुन्हा आपल्याला दिसणार नाही या कल्पनेने राजा राणी अत्यंत दुःखी

झाले होते. राजवाड्यात कोणी हसत नसे की बोलत नसे.

पवनकुमार वेगाने राजवाड्याकडे निघाला. कधी एकदा राजवाड्यात पोहोचतो असे त्याला झाले होते. अचानकपणे परत आलेल्या पवनकुमारला पाहून अनंतसेन आणि सुप्रियाचा आनंद गगनात मावेना. सारा राजवाडा जणू पुन्हा जीवंत झाला. सारेजण आनंदाने बेहोश झाले. पवनकुमारने जादूनगरीची, मधुलिकाची सारी हकिकत सांगितली. आणि मधुलिका नगरीच्या वेशीपाशी वाट पाहत आहे असे सांगितले.

''तिला आणायला लवकर जायला हवे.'' पवन म्हणाला.

सुप्रियाने प्रेमाने पवनकुमारला जवळ घेतले. जेव्हा तिने आपल्या मुलाच्या गालाचा प्रेमाने मुका घेतला तेव्हा एक आश्चर्य घडले. पवनकुमारला मधुलिका,

आणि घडलेल्या सर्व घटनांचा विसर पडला! राजवाड्यातील सर्वजणही पवनकुमारने सांगितलेली सर्व हकीकत विसरून गेले!

इकडे मधुलिका वाट पाहून पाहून कंटाळून गेली. तिला रडू यायला लागले. ती रडत असताना तिथे एक प्रेमळ पण गरीब म्हातारा शेतकरी आला.

''बाळ, तू का रडते आहेस? मी तुला काही मदत करू का?''

मी माझ्या प्रियतमाची वाट पाहते आहे. तो आला नाही म्हणून मला रडू येतंय. यात तुम्ही मला काय मदत करणार?

''पोरी, तू खूप दमलेली आणि भुकेली दिसतेस. थोडावेळ माझ्या घरी चल. थोडी भाजी भाकरी खा. पाणी पी. आणि मग खुशाल वाट पहात बस.' चल बघू माझ्याबरोबर.'' शेतकरी म्हणाला.

तो मधुलिकेला आपल्या घरी घेऊन गेला. त्याचे घर म्हणजे एक छोटीशी झोपडी होती. पण शेतकऱ्याच्या प्रेमळ स्वभावामुळे मधुलिका त्याच्याबरोबर झोपडीत राहू लागली.

काही दिवसांनी पवनकुमारचे लग्न ठरल्याची बातमी समजली. या राजेशाही लग्नासाठी सर्वांना आमंत्रण होते. शेतकऱ्याने मधुलिकालाही लग्नाला येण्याचा आग्रह केला.

मधुलिकाला फार वाईट वाटले. 'असे कसे झाले? पवनकुमार मला कसे काय विसरला?' तिला काही सुचेना.

एवढ्यात तिला आईने दिलेल्या अक्रोडाची आठवण झाली.

तिने एक अक्रोड फोडला.

आणि काय आश्चर्य! त्यातून एक अत्यंत सुंदर रत्नजडित घागरा ओढणीचा पोशाख बाहेर आला. इतका

रत्नजडित घागरा जगात कुणाकडेच नव्हता! मधुलिका तो घागरा घालून लग्नाला गेली. तिच्याकडे पाहून सर्वांचे डोळे दिपत होते.

एका गरीब मुलीचा इतका सुंदर घागरा पाहून राजकन्येचा जळफळाट झाला. ती त्या घागरा ओढणीसाठी साठी हट्ट धरून बसली. ''तसा घागरा मिळाल्याशिवाय मी लग्नाला उभी राहणार नाही.''

राजकन्या म्हणाली.

मधुलिका म्हणाली, ''मी तुला हा घागरा द्यायला तयार आहे. पण मला फक्त राजपुत्राच्या खोलीबाहेर बसायची परवानगी मिळावी.''

''हात्तिच्या! एवढेच ना! जरूर जरूर!'' राजकन्या म्हणाली.

मधुलिकाने आपला घागरा राजकन्येला दिला. आणि ती पवनकुमारच्या खोलीच्या दाराबाहेर बसली. आता मात्र तिला खूप रडू फुटले.

रडता रडता तिच्या तोंडून सगळी कहाणी बाहेर पडू लागली.

पवनकुमारने ती कहाणी ऐकली मात्र! त्याला सर्व आठवले. तो बाहेर आला. त्याने मधुलिकाला उठवले. तिचे डोळे पुसले.

पवनकुमार म्हणाला, ''मधु---मधु---मला क्षमा कर. मी तुला कसा काय विसरलो हेच मला कळेनासं झालं आहे. पण आता काळजी करू नकोस. आता मी तुला कधीही एकटं सोडणार नाही.''

पवनकुमार मधुलिकाला घेऊन राजमहालात आला. सगळ्यांसमोर त्याने घोषणा केली, 'मधुलिका हीच माझी खरी राणी आहे. तिच्याशिवाय मी कोणाशीही लग्न करणार नाही. मी एवढे दिवस तिला विसरलो त्यामुळे तिला व मला खूप दुःख झाले आहे.

माझ्याकडून तिचे मन दुखावले गेले. म्हणून मी तिची जाहीर क्षमा मागतो.

मधुलिका, मला क्षमा करशील नां?''

''आपल्या माणसाची क्षमा मागायची नसते!'' मधुलिका लाजत म्हणाली.

सगळीकडे आनंदी आनंद झाला. आईने दिलेले दुसरे अक्रोडाचे फळ मधुलिकाने फोडले. त्यातून दुसरा रत्नजडित घागरा ओढणीचा पोशाख बाहेर आला.

तो सुंदर घागरा घालून मधुलिका लग्नाला उभी राहिली. पवनकुमार आणि मधुलिकाचे लग्न थाटामाटात पार पडले.

बिच्चारी हट्टी राजकन्या! तिला लग्नाशिवायच घरी परतावे लागले!

आपली जादूनगरी सोडल्यावरही प्रेमाच्या जादूने मधुलिकाने पवनकुमारला जिंकले होते!

मेहता मराठी ग्रंथ जगत

यंदाच्या दिवाळी अंकाची खास आकर्षणे

१.**माझे धडपडीचे पहिले दिवस**

विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी आपल्या आरंभीच्या धडपडीच्या दिवसांच्या स्मृतींना दिलेला उजाळा.

२. **झेप नव्या क्षितिजाची**

स्वत:ची वाट स्वत: चोखाळत नवीन क्षितिजे शोधणाऱ्या प्रतिभावंतांची उत्कंठावर्धक मनोगते.

३.**मुलांचे भावविश्व फुलवताना**

मुलांसाठी काही 'खास' कामे करणाऱ्या दिग्गजांचे अमोल मार्गदर्शन

४. **वाचकांची पत्रे हेच माझे टॉनिक**

लेखकांकडून वाचकांचा, रसिकांचा गौरव करणारे अनोखे सदर.

५. **आमचा साहित्यिक अड्डा**

वाङ्मयप्रेमी व्यक्तींनी पुस्तके,लेखक यांच्याबद्दल मोकळ्या मनाने गप्पा मारण्यासाठी जमवलेला अड्डा. अशा काही अड्ड्यांची ओळख.

६. **मराठीतील वाचकप्रिय पुस्तके**

मराठीतील वाचकांना विशेष आवडणारी पुस्तके कोणती याचा एक रॅण्डम सर्व्हे.

७. **बालनगरी**

मुलांसाठी खास रंगीत विभाग. यात परिकथा, कोडी, गमतीजमती, शब्दांच्या कसरती आणि मजेदार स्पर्धांची रेलचेल.

घरातल्या प्रत्येकाला
वाचावासा वाटेल,
संग्रही ठेवावासा
वाटेल असा
नाविन्यपूर्ण दर्जेदार
दिवाळी अंक.